'नॅककडून शिवाजीनगर येथील मॉडर्न महाविद्यालयाला (ए प्लस), मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालयाला (ए प्लस प्लस), गणेशखिंड येथील मॉडर्न महाविद्यालयाला (ए प्लस) आणि मॉडर्न विधी महाविद्यालयाला (ए) दर्जा मिळाला आहे. त्याचप्रमाणे संस्थेचे निगडी आणि वारजे येथे शैक्षणिक संकुल असून, तेथे विविध महाविद्यालये आहेत. त्यामुळे या कॉलेजांचे मिळून मॉडर्न क्लस्टर विद्यापीठ करण्याची तयारी सुरू केली आहे. त्यासाठी अंतर्गत समितीही स्थापन केली आहे. येत्या काही दिवसांत सविस्तर प्रस्ताव पाठविण्यात येईल. प्रस्तावाला मान्यता मिळाल्यास, येत्या शैक्षणिक वर्षापासून किंवा पुढील शैक्षणिक वर्षापासून मॉडर्न विद्यापीठाची स्थापना होऊ शकेल,' असे डॉ. एकबोटे यांनी स्पष्ट केले.

**■ 'नवा अभ्यासक्रम लवकरच'**

गणेशखिंड येथील मॉडर्न महाविद्यालयात आगामी शैक्षणिक वर्षापासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे. राज्य सरकार आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार, चार वर्षांचा अभ्यासक्रम टप्प्याटप्प्याने सुरू करण्याचे नियोजन आहे. त्याचाच एक भाग म्हणजे मॉडर्न महाविद्यालयात हा अभ्यासक्रम सुरू केला जाणार असून, त्यासाठी अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्यात येत आहे. हे करताना तीन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम सुरू राहील. विद्यार्थ्यांना दोन्ही पर्याय उपलब्ध असतील, अशी माहिती डॉ. एकबोटे यांनी दिली.

**■ 'मॉडर्न विधी'ला 'ए' श्रेणी**

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न विधी महाविद्यालयाने नुकतीच 'नॅक'ची 'ए' श्रेणी प्राप्त केली आहे. महाविद्यालयाला ३.२४ सीजीपीए गुणांक प्राप्त झाले आहेत. दोन दिवसांपूर्वी ही श्रेणी प्राप्त झाली. महाविद्यालयाकडून कौशल्य विकासावर आधारित कार्यक्रम घेण्यात येतात. महाविद्यालयात पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसासोबतच चार डिप्लोमा अभ्यासक्रम आहेत. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्या कौशल्य गुणांना वाव देण्यासाठी १२ कायदेविषयक अभ्यासक्रम सुरू आहेत. महाविद्यालयाकडून मोफत कायदा सल्ला केंद्र चालविले जात असल्याचे डॉ. खरात आणि डॉ. आढाव यांनी सांगितले.

Maharashtra Times 1.2.2023

---

**पुढारी**

# मॉडर्न क्लस्टर विद्यापीठाची स्थापना होणार

## राज्य सरकारकडे प्रस्ताव दाखल करणार : डॉ. एकबोटे

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीकडून येत्या काळात मॉडर्न क्लस्टर विद्यापीठाची स्थापना करण्यात येणार आहे. त्यासाठी येत्या काही दिवसांत राज्य सरकारकडे प्रस्ताव दाखल करण्यात येईल, अशी माहिती सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी मॉडर्न महाविद्यालय गणेशखिंडचे प्राचार्य डॉ. संजय खरात, मॉडर्न विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनीता आढाव, संस्थेचे सुरेश तोडकर, प्रकाश दीक्षित आदी उपस्थित होते. डॉ. एकबोटे म्हणाले, नॅककडून शिवाजीनगर येथील मॉडर्न महाविद्यालयाला (ए प्लस), मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालयाला (ए प्लस प्लस), गणेशखिंड येथील मॉडर्न महाविद्यालयाला (ए प्लस) आणि मॉडर्न विधी महाविद्यालयाला (ए) दर्जा मिळाला आहे.

त्याचप्रमाणे संस्थेचे निगडी आणि वारजे येथे शैक्षणिक संकुल असून, तेथे विविध महाविद्यालये आहेत. त्यामुळे या कॉलेजांचे मिळून मॉडर्न क्लस्टर विद्यापीठ स्थापन करण्याची तयारी सुरू केली आहे. त्यासाठी अंतर्गत समितीही स्थापन केली आहे. येत्या काही दिवसांत सविस्तर प्रस्ताव तयार करून पाठविण्यात येईल. याला मान्यता मिळाल्यास, येत्या शैक्षणिक वर्षापासून किंवा पुढील शैक्षणिक वर्षापासून मॉडर्न क्लस्टर विद्यापीठ स्थापन होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.




**चार वर्षांचा अभ्यासक्रम सुरू करणार...**

गणेशखिंड येथील मॉडर्न महाविद्यालयात आगामी शैक्षणिक वर्षापासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे. राज्य सरकार आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार चार वर्षांचा अभ्यासक्रम टप्प्याटप्प्याने सुरू करण्याचे नियोजन आहे. त्याचाच एक भाग म्हणजे मॉडर्न महाविद्यालयात हा अभ्यासक्रम सुरू केला जाणार असून, त्यासाठी अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्यात येत आहे. हे करताना तीन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम सुरू राहील. विद्यार्थ्यांना दोन्ही पर्याय उपलब्ध असतील, अशी माहिती डॉ. एकबोटे यांनी दिली.

Pune Edition
Feb 1, 2023 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

## चित्रकला स्पर्धेत 'मॉडर्न'चे यश

**पुणे :** राज्य कला संचालनालयातर्फे २०२२मध्ये घेण्यात आलेल्या एलिमेंट्री ड्रॉइंग ग्रेड परीक्षेत गणेशखिंड रस्त्यावरील मॉडर्न हायस्कूलचा निकाल ९४.६४ टक्के लागला आहे.

अनुष्का वावरे, प्रसाद सावंत यांना 'ए' ग्रेड, राजनंदिनी अस्वले, अवनी बटवाल, कार्तिकी गायकवाड, अस्मिता जाधव, स्नेहल काळे, सई रानवडे, वेदान्त देशमुख, आकाश दहिभाते, हर्षवर्धन खंडागळे, सत्यजित उंडे या विद्यार्थ्यांना 'बी' ग्रेड मिळाली आहे. ४१ विद्यार्थी 'सी' ग्रेड मिळवून उत्तीर्ण झाले आहेत.

इंटरमिजिएट ड्रॉइंग ग्रेड परीक्षेचा निकाल शंभर टक्के लागला आहे. ईश्वरी बराटे, सिद्धी सोनवणे, प्रीती शिंदे, महेश यादव यांना 'ए' ग्रेड, शुभम उबाळे 'बी' ग्रेड मिळाली आहे. 'सी' ग्रेड मिळवून १० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

मुख्याध्यापिका सुरेखा कामथे, उपमुख्याध्यापिका शारदा साबळे, कलाशिक्षक, पर्यवेक्षक शीलरतन बंगाळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष गजानन एकबोटे, कार्यवाह श्यामकांत देशमुख यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

Maharashtra Times 1.2.2023

## समूह विद्यापीठामध्ये रूपांतर करण्यासाठी मॉडर्न महाविद्यालयाचे पाऊल

**लोकसत्ता प्रतिनिधी**

पुणे : प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न महाविद्यालयाचे 'क्लस्टर युनिव्हर्सिटी'मध्ये रूपांतर करण्यासाठी पाऊल उचलले जात आहे. त्यासाठी महाविद्यालयाकडून राज्य सरकार आणि विद्यापीठ अनुदान आयोगाकडे (यूजीसी) लवकरच प्रस्ताव पाठवणार आहे.

क्लस्टर युनिव्हर्सिटीमध्ये रूपांतर होण्यासासाठी किमान दोन वर्षांचा कालावधी लागेल. परंतु, त्यासाठी आवश्यक ती प्रक्रिया आतापासून सुरू करण्यात आली आहे, अशी माहिती संस्थेचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे यांनी पत्रकार परिषदेत दिली. गणेशखिंड रस्त्यावरील मॉडर्न महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय खरात, मॉडर्न विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनीता आढाव यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी या वेळी उपस्थित होते.

डॉ. एकबोटे म्हणाले, मॉडर्न महाविद्यालयांमध्ये काही शाखांना स्वायत्त दर्जा तसेच अ श्रेणी प्राप्त झाली आहे. त्यामुळे क्लस्टर युनिव्हर्सिटीच्या दृष्टीने वाटचाल सुरू केली आहे. त्यासाठी आवश्यक सर्व प्रक्रिया येत्या काही दिवसांमध्ये सुरू करण्यात येईल. मॉडर्न विधी महाविद्यालयास स्वायत्त दर्जा मिळावा यासाठी प्रस्ताव पाठविण्यात येणार आहे. नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने महाविद्यालयाने चार वर्षांचा विधी पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी तयारी सुरू केली आहे. नवीन शैक्षणिक धोरणाच्या सुकाणू समितीच्या बैठकीत याबाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न विधी महाविद्यालयाने बेंगळुरू येथील राष्ट्रीय अधिस्वाकृती आणि मूल्यांकन परिषदेची (नॅक) अ श्रेणी प्राप्त केली आहे.

विद्यालयास ३.२४ सीजीपीए गुणांक प्राप्त झाले आहेत. महाविद्यालयाकडून कौशल्य विकासावर आधारित कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. शहरात विविध ठिकाणी चार मोफत कायदा सल्ला केंद्र चालविले जात असल्याचे डॉ. संजय खरात आणि डॉ. सुनीता आढाव यांनी सांगितले.

लोकसत्ता Thu, 02 February 2023 https://epaper.loksatta.com/c/

# *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

सकाळ

## शिक्षण

**- डॉ. गजानन एकबोटे, कार्याध्यक्ष, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी**



कौशल्य विकासाला चालना देणारे आणि त्यासाठीची रचनात्मक बांधणी करणारा हा अर्थसंकल्प आहे. शैक्षणिक संस्थांच्या पूरक व्यवस्थेची क्षमतावृद्धी करणाऱ्या या अर्थसंकल्पात संशोधन, नवोन्मेष आणि नवकल्पनांनाही योग्य न्याय दिला आहे.

**- अभय भुतडा, व्यवस्थापकीय संचालक, पूनावाला फिनकॉर्प**



हरित विकास, युवाशक्ती आणि पायाभूत सुविधांसाठी गुंतवणूक यांसह सात स्तंभांवर भर देणारा हा अर्थसंकल्प तंत्रज्ञान व ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्थेसाठी पाया रचणारा आहे. सरकारचा सातत्यपूर्ण पाठिंबा आणि एमएसएमईसाठी असलेली बांधिलकी कौतुकास्पद आहे.

**- डॉ. पी. डी. पाटील, कुलपती, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ वाहतूक**



अर्थसंकल्पात आरोग्य क्षेत्राशी संबंधित अनेक नवीन उपक्रमांचे आश्वासन दिले आहे. केंद्राने नव्या शैक्षणिक धोरणाला मंजुरी दिल्यानंतर राज्यात त्याची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, यासाठी शिक्षण क्षेत्रावरही भर दिला आहे. वैद्यकीय शिक्षणासाठी १५७ नवीन नर्सिंग महाविद्यालये बांधण्यात येणार आहे.

Pune, Main
02/02/2023 Page No. 4

## 'मॉडर्न'मध्ये सुरू होणार चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ३१** - प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या गणेशखिंड येथील मॉडर्न महाविद्यालयात २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे, अशी माहिती संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे यांनी दिली.

मॉडर्न महाविद्यालयातर्फे आयोजित पत्रकार परिषदेत डॉ. एकबोटे यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने संस्थेने पाऊल उचलले असल्याचे सांगितले. यावेळी मॉडर्न महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय खरात आणि मॉडर्न विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनीता आढाव उपस्थित होते.

राज्य शासन व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मार्गदर्शक तत्वानुसार चार वर्षांचा अभ्यासक्रम टप्प्याटप्प्याने सुरू करण्याचे नियोजन आहे. त्याचाच एक भाग म्हणजे मॉडर्न महाविद्यालयात हा अभ्यासक्रम सुरू केले जाणार असून, त्यासाठी अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्यात येत आहे. तसेच तीन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम सुरू राहील. विद्यार्थ्यांना दोन्ही पर्याय उपलब्ध असतील, अशी माहिती डॉ. एकबोटे यांनी दिली. संस्थेच्या मॉडर्न विधी महाविद्यालयास नॅककडून 'ए' श्रेणी प्राप्त झाली आहे. चार विविध ठिकाणी मोफत कायदा सल्ला केंद्र चालविले जात असल्याचे डॉ. सुनिता आढाव यांनी सांगितले.

### विद्यापीठासाठी प्रयत्न



संस्थेची शिवाजीनगर, गणेशखिंड, निगडी, वारजे आदी भागांत महाविद्यालये आहेत. महाविद्यालयांना स्वायत्ततेचा दर्जा प्राप्त आहे. त्यामुळे आता क्लस्टर विद्यापीठाचा प्रयत्न चालू आहेत. मात्र त्यासाठी असलेल्या नियमांत लवचिकता हवी. त्याबाबत उच्च शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्याशी बोलणे झाले आहे. त्यानंतर विद्यापीठासाठी पाऊल उचलले जातील, अशी माहिती डॉ. एकबोटे यांनी दिली.

प्रभात PuneCity, 01 Feb 2023, Page:005
https://epaper.dainikprabhat.com

# News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5

## 'नवीन शैक्षणिक धोरण हे क्रांतिकारी पाऊल'

### १ लाख २३ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी घेतली व्यसनमुक्तीची शपथ



**पुणे** : विद्यार्थ्यांमधील प्रतिभेला जागृत करण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरण उपयोगी ठरेल. प्रत्येक विद्यापीठ आणि शैक्षणिक संस्था आनंदाचे, नवनिर्मितीचे कॅम्पस झाले पाहिजे. नवीन शैक्षिणक धोरण हे क्रांतिकारक पाऊल आहे, असे मत आर्ट ऑफ लिव्हिंगचे संस्थापक श्री श्री रविशंकर यांनी व्यक्त केले.

आर्ट ऑफ लिव्हिंग फाऊंडेशनसह विविध नामवंत शैक्षणिक संस्थांच्या पुढाकाराने एज्युयूथ मीट हा कार्यक्रम कोथरूडमधील सूर्यकांत काकडे फार्म येथे आयोजित करण्यात आला होता. त्यामध्ये श्री श्री रविशंकर यांनी तरुणाईला मार्गदर्शन केले. करणार नाही आणि करु देणारही नाही... अशी शपथ घेत पुण्यातील १ लाख २३ हजारहून अधिक विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्तीचा संदेश दिला.

नॅकचे अध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन, खासदार विनय सहस्रबुद्धे, राजेश पांडे, माजी कुलगुरु डॉ. नितीन करमळकर, आर्ट ऑफ लिव्हिंगचे राजेश शास्तारे, एज्युयूथ मीटचे प्रमुख हिमांशू नगरकर, शेखर मुंदडा यांच्यासह संस्थाचालक आणि शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ उपस्थित होते. नव्या शैक्षणिक धोरण व तणावमुक्त शिक्षणासंदर्भात यासंदर्भात श्री श्री रविशंकर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड व एशिया बुक ऑफ रेकॉर्ड यावेळी झाला.

आर्ट ऑफ लिव्हिंग फाऊंडेशन, भारतीय सांस्कृतिक संबंध परिषद यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले असून, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, सिंबायोसिस, भारती विद्यापीठ, एमआयटी, डॉ. डी. वाय. पाटील संस्था, सूर्यदत्ता, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी, महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था, एसपी, सीओईपी अशी महाविद्यालये, एनआरडीसीएम आणि एमआरडीसी यांसारख्या संस्था यामध्ये सहभागी झाल्या होत्या. मानवी मूल्ये आणि व्यसनमुक्त भारत या गोष्टींवर सदर कार्यक्रमात भर देण्यात आला.

श्री श्री रविशंकर म्हणाले, भारताला नशामुक्त तरुणाईच करू शकते. यासाठी तरुणांनी नवीन उत्साह आणि उमंग सोबत घेऊन चालायचे आहे. प्रत्येक गोष्टीतील आव्हानांचा सामना करतो तो युवा असतो. युवकांनी मानसिक स्वास्थ्याकडे लक्ष द्यायला पाहिजे. यासाठी ध्यान आणि योग करा जीवन गमावून आत्महत्या करू नका, असेही त्यांनी सांगितले. विनय सहस्रबुद्धे व डॉ. भूषण पटवर्धन यांनी आपले मनोगत यावेळी व्यक्त केले. नवीन शैक्षणिक धोरणानुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि इतर शैक्षणिक संस्थांसोबत ५ सामंजस्य करार करण्यात आले. तसेच पद्मश्री मुरलीकांत पेटकर यांचा विशेष सन्मान करण्यात आला. माजी सैनिक यशवंत महाडीक, महाराष्ट्र केसरी शिवराज राक्षे यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

Kesari 6.2.2023

## स्वायत्त महाविद्यालयांना स्वायत्तता

### विद्यापीठाकडून सुधारित मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने सोमवारी स्वायत्त महाविद्यालयासाठी सुधारित नियमावली प्रसिद्ध केली आहे. त्यानुसार आता स्वायत्त महाविद्यालयांना नव्या अभ्यासक्रम सुरू करण्यास विद्यापीठाची परवानगी आवश्यक नसल्याचे, दोनपेक्षा अधिक अभ्यासक्रम सुरू करण्यास बंधन नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच अभ्यासक्रमांचे शुल्क ठरवण्याचे अधिकार महाविद्यालयांनाच देण्यात आले असून, सध्याच्या परीक्षा शुल्कात दोन वर्षांतून एकदा दहा टक्के शुल्कवाढ करता येणार आहे.

विद्यापीठाने दोन वर्षांपूर्वी स्वायत्त महाविद्यालयांसाठी मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध केल्या होत्या. मात्र अभ्यासक्रम सुरू करण्यापूर्वी विद्यापीठाची मान्यता, १५ टक्के परीक्षा शुल्क विद्यापीठाला देणे, एकावेळी दोनपेक्षा अधिक अभ्यासक्रम किंवा तुकड्या सुरू करू नयेत आदी बंधने स्वायत्त महाविद्यालयांवर घालण्यात आली होती. त्यामुळे स्वायत्त महाविद्यालयांनी या मार्गदर्शक सूचनांना विरोध केला होता. त्यामुळे विद्यापीठाकडून स्वायत्त महाविद्यालयांसदर्भात समिती नियुक्त करण्यात आली. त्यानंतर आता सुधारित मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध करण्यात आल्या.

विद्यापीठाने प्रसिद्ध केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार, स्वायत्त महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांची समकक्षता विद्यापीठाकडून दिली जात होती. आता त्यासोबत स्वायत्त संस्थांसाठी ह्यक्षपीआरएनक्ष म्हणजेच परमनण्ट रजिस्ट्रेशन नंबरही दिला जाणार आहे. त्याचा उपयोग ॲकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिटच्या अंमलबजावणीसाठीही होणार आहे. या पूर्वीच्या नियमावलीत अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी मर्यादा होत्या. आता स्वायत्त संस्थांना एकाच वेळी एका विद्याशाखेत दोन पेक्षा अधिक अभ्यासक्रम अथवा तुकड्या सुरू करण्यास मुभा आहे. मात्र त्यासाठी भौतिक सुविधा व आवश्यक मनुष्यबळाची पूर्तता करण्याची अट आहे. स्वायत्त महाविद्यालयांनी नवीन अभ्यासक्रम सुरू करताना, त्याचा मसुदा त्या त्या शैक्षणिक वर्षाच्या ३१ मार्चपर्यंत विद्यापीठाकडे पाठविणे आवश्यक आहे. अभ्यासक्रमासह प्रवेश क्षमता, प्रश्नपत्रिका, परीक्षेचे स्वरूप, गुणांकन, श्रेयांक आदी तपशीलही द्यायचा आहे. विद्यापीठाकडून संबंधित अभ्यासक्रमांना त्या शैक्षणिक वर्षाच्या ३१ मेपर्यंत प्रमाणित करण्यात येईल. त्यासाठी अभ्यास मंडळाच्या अध्यक्षांना निमंत्रित करण्यात येईल असे नमूद करण्यात आले आहे.

> विद्यापीठाकडून स्वायत्त महाविद्यालयांच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये सुधारणा करण्यात आल्या आहेत. सुधारित मार्गदर्शक स्वागतार्ह आहेत. पूर्वीच्या मार्गदर्शक सूचनांतील आक्षेप आता दूर झाले आहेत. मात्र संलग्नता शुल्क आणि पीएच.डी. प्रवेशांसंदर्भात अधिक स्पष्टता, सुधारणेला वाव आहे.
>
> - डॉ. गजानन एकबोटे, कार्याध्यक्ष, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी

अभ्यासक्रमासाठीचे शुल्क स्वायत्त महाविद्यालयांना त्यांच्या स्तरावर ठरवण्याची मुभा आहे. तसेच शिष्यवृत्तीसाठीचे प्रस्ताव महाविद्यालयांनी शासनाकडे सादर करायचे आहेत. पीएच.डी. अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया विद्यापीठाच्या नियमांनुसार करणे आवश्यक आहे. तर स्वायत्त महाविद्यालयांनी परीक्षा शुल्कातून १० टक्के रक्कम विद्यापीठाला द्यायची आहे. दोन वर्षांतून एकदा दहा टक्के परीक्षा शुल्कात वाढ करता येईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

लोकसत्ता Tue, 07 February 2023
https://epaper.loksatta.com/c/71615618

# *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

## नवराष्ट्र

### नवा अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी परवानगीची गरज नाही

# स्वायत्त महाविद्यालये आता निर्बंधमुक्त !

पुणे, (वा.) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने स्वायत्त महाविद्यालयासाठी सुधारित नियमावली प्रसिद्ध केली आहे. त्यानुसार आता स्वायत्त महाविद्यालयांना नवा अभ्यासक्रम सुरू करण्यास विद्यापीठाची परवानगी आवश्यक नसल्याचे, दोनपेक्षा अधिक अभ्यासक्रम सुरू करण्यास बंधन नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच अभ्यासक्रमांचे शुल्क ठरवण्याचे अधिकार महाविद्यालयांनाच देण्यात आले असून, सध्याच्या परीक्षा शुल्कात दोन वर्षांतून एकदा दहा टक्के शुल्कवाढ करता येणार आहे.

**आता सुधारित मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध :** विद्यापीठाने दोन वर्षांपूर्वी स्वायत्त महाविद्यालयांसाठी मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध केल्या होत्या. मात्र अभ्यासक्रम सुरू करण्यापूर्वी विद्यापीठाची मान्यता, १५ टक्के परीक्षा शुल्क विद्यापीठाला देणे, एकावेळी दोनपेक्षा अधिक अभ्यासक्रम किंवा तुकड्या सुरू करू नयेत आदी बंधने स्वायत्त महाविद्यालयांवर घालण्यात आली होती. त्यामुळे स्वायत्त महाविद्यालयांनी या मार्गदर्शक सूचनांना विरोध केला होता. त्यामुळे विद्यापीठाकडून स्वायत्त महाविद्यालयांसदर्भात समिती नियुक्त करण्यात आली. त्यानंतर आता सुधारित मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध करण्यात आल्या.

### स्वायत्त संस्थांसाठी 'पीआरएन' नंबर दिला जाणार

विद्यापीठाने प्रसिद्ध केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार, स्वायत्त महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांची समकक्षता विद्यापीठाकडून दिली जात होती. आता त्यासोबत स्वायत्त संस्थांसाठी "पीआरएन' म्हणजेच परमनण्ट रजिस्ट्रेशन नंबरही दिला जाणार आहे. त्याचा उपयोग अ‍ॅकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिटच्या अंमलबजावणीसाठीही होणार आहे. या पूर्वीच्या नियमावलीत अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी मर्यादा होत्या. आता स्वायत्त संस्थांना एकत्रच वेळी एका विद्याशाखेत दोन पेक्षा अधिक अभ्यासक्रम अथवा तुकड्या सुरू करण्यास मुभा आहे. मात्र त्यासाठी भौतिक सुविधा व आवश्यक मनुष्यबळाची पूर्तता करण्याची अट आहे. स्वायत्त महाविद्यालयांनी नवीन अभ्यासक्रम सुरू करताना, त्याचा मसुदा त्या त्या शैक्षणिक वर्षाच्या ३१ मार्चपर्यंत विद्यापीठाकडे पाठविणे आवश्यक आहे. अभ्यासक्रमासह प्रवेश क्षमता, प्रश्नपत्रिका, परीक्षेचे स्वरुप, गुणांकन, श्रेयांक आदी तपशीलही द्यायचा आहे. विद्यापीठाकडून संबंधित अभ्यासक्रमांना त्या शैक्षणिक वर्षाच्या ३१ मेपर्यंत प्रमाणित करण्यात येईल. त्यासाठी अभ्यास मंडळाच्या अध्यक्षांना निमंत्रित करण्यात येईल असे नमूद करण्यात आले आहे.

### दोन वर्षांतून एकदा दहा टक्के परीक्षा शुल्कात वाढ

- अभ्यासक्रमासाठीचे शुल्क स्वायत्त महाविद्यालयांना त्यांच्या स्तरावर ठरवण्याची मुभा आहे. तसेच शिष्यवृत्तीसाठीचे प्रस्ताव महाविद्यालयांनी शासनाकडे सादर करायचे आहेत.
- पीएच.डी. अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया विद्यापीठाच्या नियमांनुसार करणे आवश्यक आहे. तर स्वायत्त महाविद्यालयांनी परीक्षा शुल्कातून १० टक्के रक्कम विद्यापीठाला द्यायची आहे. दोन वर्षातून एकदा दहा टक्के परीक्षा शुल्कात वाढ करता येईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे.
- विद्यापीठकडून स्वायत्त महाविद्यालयांच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये सुधारणा करण्यात आल्या आहेत. सुधारित मार्गदर्शक स्वागतार्ह आहेत. पूर्वीच्या मार्गदर्शक सूचनांतील आक्षेप आता दूर झाले आहेत. मात्र संलग्नता शुल्क आणि पीएच.डी. प्रवेशांसंदर्भात अधिक स्पष्टता, सुधारणेला वाव आहे, असे मत प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे यांनी व्यक्त केले.



Pune Edition
08 February 2023 Page No. 6
epaper.navarashtra.com

## लोकमत



### 'लेट्स चेंज' उपक्रमातून मुली बनल्या स्वच्छतादूत

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** दोन ऑक्टोबरपासून सुरू झालेल्या राज्य शासनाच्या लेट्स चेंज या उपक्रमामध्ये पुण्यातील चार शाळांची निवड झाली असून त्यामध्ये प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या माडर्न गर्ल्स हायस्कूलचा समावेश आहे. या विद्यार्थिनींनी स्वच्छतादूत बनून या उपक्रमात लक्षवेधी काम केल्याची माहिती मुख्याध्यापक माया नाईक यांनी दिली.

शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी लेटस चेंज स्वच्छता मॉनिटर उपक्रम राबवण्यास सुरुवात केली होती. या आगळ्यावेगळ्या अभियानात, विद्यार्थ्यांकडून साफसफाई करून घेणे किंवा स्वच्छतेबाबत जनजागृती करणे हेही अपेक्षित नव्हते, तर कोणी निष्काळजीपणे कचरा फेकताना किंवा थुंकताना दिसले तर फक्त त्या व्यक्तीला तिथल्या तिथे थांबवून केलेली चूक लक्षात आणून देण्याचे काम करायचे आहे. यासाठी त्यासाठी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना स्वच्छता मॉनिटरगिरीची सवय लागण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प २४ डिसेंबरपर्यंत राबविण्यात आला. त्यासाठी प्रकल्प संचालक रोहित आर्या यांनी मार्गदर्शन केले.

महाराष्ट्रातील हजारो शाळांपैकी ४० शाळांची या उपक्रमासाठी निवड करण्यात आली. त्यामध्ये पुणे जिल्ह्यातील चार शाळांची निवड झाली आहे. यामध्ये प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे मॉडर्न गर्ल्स हायस्कूल, शिवाजीनगर या शाळेची निवड करण्यात आली. सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या निवडक विद्यार्थ्यांना स्वच्छता मॉनिटर सन्मानित करून राज्यात कुठेही कार्यरत राहण्याच्या दृष्टीने ओळखपत्र देण्यात येणार आहे. संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. एकबोटे, कार्यवाह देशमुख, सहकार्यवाह ज्योत्स्ना एकबोटे, महापालिकेच्या प्रशासकीय अधिकारी डॉ. मीनाक्षी राऊत, जिल्हा समन्वयक सुनील ताकवले, मुख्याध्यापिका माया नाईक, प्रकल्प समन्वयक पूनम सोमवंशी यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

Hello Pune
Page No. 10 Feb 11, 2023
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

पुढारी

# उत्कृष्ट अभिनय... मांडणीतही वेगळेपण

## 'फिरोदिया'ची प्राथमिक फेरी जल्लोषात; प्रेक्षकांकडून भरभरून दाद

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

विद्यार्थ्यांच्या गर्दीने फुललेले सभागृह... तरुण कलाकारांचा उत्कृष्ट अभिनय... सादरीकरणात अन् विषयाच्या मांडणीत दिसलेले वेगळेपण... तरुणाईच्या सादरीकरणाने जिंकलेली प्रेक्षकांची मने अन् तरुणाईचा सळसळता जोश... अशा जल्लोषपूर्ण वातावरणात शनिवारी (दि. ११) फिरोदिया करंडक स्पर्धेच्या प्राथमिक फेरीला सुरुवात झाली.

तरुणाईचा जोश अन् जल्लोष पुन्हा एकदा रंगमंचावर प्रेक्षकांना पाहायला मिळाला अन् त्यांच्या सादरीकरणाला प्रेक्षकांनीही भरभरून दाद दिली. वेगळ्या धाटणीचे विषय, वेगळी मांडणी, त्याला संगीताची अन् विविध कलाविष्कारांची जोड, असे महाविद्यालयांच्या सादरीकरणात पाहायला मिळाले अन् त्याने प्रेक्षकांना आश्चर्यचकित केले. आपल्या महाविद्यालयाला चिअरअप करणाऱ्या तरुणाईच्या 'अरे आव्वाज कुणाचा' या जयघोषाने सभागृह दुमदुमून गेले.

सामाजिक-आर्थिक विकास संस्था निर्मित, स्वप्नभूमी कृत आणि एचसीएल फाउंडेशन यांच्या सहकार्याने होणाऱ्या स्पर्धेचे यंदाचे ४९ वे वर्ष असून, स्पर्धेच्या प्राथमिक फेरीचे उद्घाटन परीक्षकांच्या उपस्थितीत करण्यात आले. परीक्षक प्राजक्ता राज, देवेंद्र गायकवाड, आदित्य इंगळे, गिरीश दातार यांच्यासह सूर्यकांत कुलकर्णी उपस्थित होते. मागील वर्षीच्या विजेत्या एआयएसएसएमएस अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सादरीकरणाने प्राथमिक फेरीला सुरुवात झाली. त्यानंतर पहिल्या सत्रात डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर महाविद्यालय (आकुर्डी) आणि पद्मभूषण वसंतदादा पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या संघाने सादरीकरण केले. सायंकाळच्या सत्रात पिंपरी-चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, झील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च आणि बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्सच्या संघांनी सादरीकरण केले. सादरीकरण करणाऱ्या संघांमधील तरुण कलाकारांमध्ये कमालीचा जोश अन् उत्साह पाहायला मिळाला. संघांचे सादरीकरण पाहण्यासाठीही पहिल्या दिवशी महाविद्यालयीन तरुणाईने गर्दी केली. कलाकारांनी स्पर्धेसाठी केलेली जोरदार तयारी सादरीकरणात पाहायला मिळाली, तर विविध प्रकारच्या कला एकाच रंगमंचावर दिसलेला आविष्कार प्रेक्षकांना थक्क करणारा ठरला. या स्पर्धेची प्राथमिक फेरी १५ फेब्रुवारीपर्यंत पुणे-सातारा रस्त्यावरील लोकशाहीर अण्णा भाऊ साठे सभागृहात सुरू आहे. दुपारी दीड आणि सायंकाळी सहा, अशा दोन सत्रांमध्ये स्पर्धेची प्राथमिक फेरी होत आहे. रविवारी (दि. १२) गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स, मराठवाडा मित्रमंडळाचे शंकरराव चव्हाण विधी महाविद्यालय, पीईएस मॉडर्न कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, एआयएसएसएमएस इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, पिंपरी-चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च (रावेत) आणि सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे सादरीकरण होणार आहे.



**फिरोदिया करंडक स्पर्धेच्या प्राथमिक फेरीत एआयएसएसएमएस कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचा संघ सादरीकरण करताना.**

My Pune Edition
Feb 12, 2023 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

# खासगी विद्यापीठांचे पुणे माहेरघर

## पुणे, पिंपरी-चिंचवडला मिळणार नवी ओळख

**मटा विशेष**

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

खासगी विद्यापीठांची संख्या देशात झपाट्याने वाढत असताना, पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात पुढील शैक्षणिक वर्षापासून चारपेक्षा अधिक खासगी (स्वयंअर्थसहाय्यित) विद्यापीठे कार्यान्वित होणार आहे. त्यातच काही नामांकित शैक्षणिक संस्थांकडून खासगी विद्यापीठांचे प्रस्ताव दाखल करण्यावर चर्चा सुरू आहे. त्यामुळे आगामी काळात पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील खासगी विद्यापीठांची संख्या २० पेक्षा अधिक होणार असून, शहराला 'खासगी विद्यापीठांचे शहर' म्हणून नवी ओळख मिळणार आहे.

> "पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये आगामी दोन वर्षांत एकूण खासगी विद्यापीठांची संख्या २० पेक्षा अधिक होईल. ही विद्यापीठे आल्यामुळे, पुण्यात शैक्षणिकदृष्ट्या चांगली स्पर्धा निर्माण होती. त्याचा फायदा विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण आणि रोजगार मिळण्यासाठी होईल. या विद्यापीठांमध्ये गरीबांना आणि आर्थिक दुर्बल घटकांमधील विद्यार्थ्यांना शिक्षण मिळाले पाहिजे; अन्यथा विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू शकतात. या विद्यार्थ्यांसाठी शिक्षण संस्थांसोबत सरकारनेही पुढाकार घेतला पाहिजे. आम्हीदेखील क्लस्टर विद्यापीठ स्थापन करण्यासाठी आग्रही आहोत. या विद्यापीठाद्वारे समाजातील सर्व घटकांना शिक्षण मिळेल, याची काळजी घेण्यात येईल.
>
> – डॉ. गजानन एकबोटे, कार्याध्यक्ष, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी

### आगामी शैक्षणिक वर्षात सुरू होणारी खासगी विद्यापीठे

- जेएसपीएम विद्यापीठ
- डॉ. पी. ए. इनामदार विद्यापीठ
- पिंपरी चिंचवड विद्यापीठ
- युनिव्हर्सल एआय विद्यापीठ




राज्यात नामांकित शैक्षणिक संस्था कार्यरत असून, त्यांच्याद्वारे चालविण्यात येणाऱ्या महाविद्यालयांना 'नॅक'च्या मूल्यांकनात 'ए' श्रेणी मिळत आहे. त्याचप्रमाणे स्वायत्तता मिळत आहे. केंद्र आणि राज्यानेही तीन ते चार महाविद्यालयांचे एकत्रीकरण करून, 'क्लस्टर' विद्यापीठांना मान्यता देण्याचे धोरण स्वीकारले आहे. त्यातून राज्यात खासगी विद्यापीठे निर्माण होत आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या माहितीनुसार राज्यात सध्या २२ खासगी विद्यापीठे असून, त्यातील सर्वाधिक १२ विद्यापीठे ही पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात कार्यरत आहेत. या विद्यापीठांच्या यादीत आणखी काही खासगी विद्यापीठांची भर पडणार आहेत. राज्य सरकारने गेल्या काही महिन्यात, शैक्षणिक संस्थांना विद्यापीठ स्थापन करण्यासाठी मान्यता दिली असून, ती येत्या शैक्षणिक वर्षापासून कार्यान्वित होणार आहे. त्याचप्रमाणे पुण्यातील काही संस्थांकडून खासगी विद्यापीठे स्थापन करण्याची पडताळणी सुरू आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत ही आणखी नवी विद्यापीठे पुणे आणि पिंपरी चिंचवड परिसरात सुरू होण्याची शक्यता आहे.

पुणे जिल्ह्यात अनेक प्रसिद्ध शैक्षणिक संस्था काही दशकांपासून कार्यरत आहेत. यापैकी काही शैक्षणिक संस्थांसाठी राज्य सरकारने छाननी समितीही स्थापन केली होती. या संस्थांच्या महाविद्यालयांना 'ए' श्रेणी असून, स्वायत्त म्हणून उत्तम काम करीत आहेत. या संस्थांकडून तीन ते चार विद्यापीठे आगामी दोन वर्षांत सुरू होऊ शकतात. त्यामुळे पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात खासगी विद्यापीठांची संख्या २० पेक्षा अधिक होईल, असे तज्ज्ञांकडून सांगण्यात येत आहे.

MaharashtraTimes 18.2.2023

# *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

## विविधांगी स्पर्धांमध्ये शिक्षकांचे यश

**पुणे :** धनंजय धडफळे आणि परिवाराने आदर्श मुख्याध्यापिका, आदर्श शिक्षिका, विद्यार्थ्यांसाठी अभिनय गीत स्पर्धा, शिक्षकांसाठी बालनाट्य स्पर्धा आणि 'पॉप-अप फाइल प्रोजेक्ट' या स्पर्धा आयोजित केल्या.

हे स्पर्धेचे सहावे वर्ष होते. पूर्व प्राथमिक विभागाच्या ८० शिक्षिका आणि १८५ विद्यार्थी स्पर्धेमध्ये सहभागी झाले होते. 'प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी'च्या नियामक मंडळाच्या सदस्य मृगजा कुलकर्णी प्रमुख पाहुण्या होत्या. स्पर्धेचे संयोजन डॉ. नीला धडफळे यांनी केले. प्राची पेंडसे, छाया दीक्षित आणि नेत्रा विद्वत यांनी स्पर्धा यशस्वी होण्यासाठी मेहनत घेतली.

'ज्ञानेश पूर्वप्राथमिक शाळे'च्या मुख्याध्यापिका वर्षा गुंजाळ यांना 'आदर्श मुख्याध्यापिका'; तर 'हुजूरपागा शिशू मंदिरा'च्या नम्रता मेहेंदळे यांना 'आदर्श शिक्षिका' या विभागात प्रथम क्रमांक मिळाला. शिक्षकांसाठीच्या बालनाट्य स्पर्धेत बारामतीच्या 'महात्मा गांधी बालक मंदिरा'ने पहिला नंबर पटकावला.

नाट्यलेखनाचे पारितोषिक याच शाळेच्या आशा बारटक्के यांना प्राप्त झाले. द्वितीय क्रमांक 'शि. प्र. मंडळी'च्या मुलींच्या शाळेला मिळाला; तर तृतीय क्रमांक 'चंद्रकांत दरोडे' शाळेला मिळाला. 'पॉप-अप फाइल प्रोजेक्ट'मध्ये 'एमव्हीएम'च्या ईशानी साठे यांना प्रथम, वंदना हिंगमिरे (मॉडर्न शिशू मंदिर) यांना द्वितीय, तर तृतीय क्रमांक श्रद्धा कुलकर्णी (ज्ञानप्रबोधिनी, निगडी) यांना मिळाला.

बाल अभिनय गीत स्पर्धेमध्ये १९ जणांना पारितोषिके मिळाली. या स्पर्धेतील सांघिक पारितोषिके एम. एस. एस. बालक मंदिर, चिंचवड येथील माटे शाळा आणि धनकवडीमधील ज्ञानेश पू. प्रा. शाळा यांना मिळाली.

Maharashtra Times 22.2.2023

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

पुणे

# स्वायत्त महाविद्यालये आता निर्बंधमुक्त

## एकावेळी सुरू करता येणार दोनपेक्षा अधिक अभ्यासक्रम

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ६ -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने सोमवारी स्वायत्त महाविद्यालयासाठी सुधारित नियमावली प्रसिद्ध केली आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने विद्यापीठाची नियमावली आहे. स्वायत्त महाविद्यालयांना दोन पेक्षा अधिक अभ्यासक्रम सुरू करण्यास कोणतेही बंधन नसल्याचे विद्यापीठाने स्पष्ट केले आहे.

स्वायत्त महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थांच्या समस्या व अडचणी लक्षात घेऊन प्रशासनाच्या सुकरतेसाठी मार्गदर्शक नियमावली तयार करण्यात आली होती. त्यानुसार अंमलबजावणी करताना काही स्वायत्त महाविद्यालयांना अडचणी येत असल्याचे दिसून आले. या महाविद्यालयांनी काही बदल सूचविले. त्या बदलांचा कुलगुरुंनी स्वीकार करून स्वायत्त महाविद्यालयांसाठी सुधारित मार्गदर्शक तत्वे प्रसिद्ध करण्यात आली.

स्वायत्त महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांची समकक्षता विद्यापीठाकडून दिली जात होती. आता त्यासोबत स्वायत्त संस्थांसाठी 'पीआरएन' म्हणजेच पर्मनेन्ट रजिस्ट्रेशन नंबरही दिला जाणार आहे. त्याचा उपयोग अॅकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिटच्या अंमलबजावणीसाठी सुद्धा होणार आहे.

यापूर्वीच्या नियमावलीत अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी मर्यादा होत्या. आता एकाच वेळी एका विद्याशाखेत दोन पेक्षा अधिक अभ्यासक्रम अथवा तुकड्या सुरू करण्यास मुभा आहे. मात्र त्यासाठी भौतिक सुविधा व आवश्यक मनुष्यबळाची पूर्तता करण्याची अट आहे. स्वायत्त महाविद्यालयांनी नवीन अभ्यासक्रम सुरू करताना, त्याचा मसुदा शैक्षणिक वर्षाच्या दि. ३१ मार्चपर्यंत विद्यापीठाकडे पाठविणे आवश्यक आहे. विद्यापीठाने संबंधित अभ्यासक्रमांना त्या शैक्षणिक वर्षाच्या ३१ मेपर्यंत मान्यता देणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

### शुल्क निश्चितीचे अधिकार

स्वायत्त महाविद्यालयांनी पाठ्यक्रमाचे शुल्क निश्चित करावयाचे आहे, असे नियमावलीत नमूद करण्यात आले. त्यामुळे स्वायत्त संस्थांना शुल्क ठरविताना कोणत्याही प्रकारचे बंधन राहणार नाही. मात्र विद्यापीठाच्या नियमानुसारच शुल्क निश्चित करणे आवश्यक राहणार आहे.

> “स्वायत्त महाविद्यालयाच्या सुधारित नियमावलीत सुस्पष्टता आहे. त्यामुळे नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करणे आता सुकर होणार आहे. या नियमावलीत संस्थांच्या सर्व अडचणी विचारात घेण्यात आल्या आहेत. त्यामुळे सुधारित नियमावलीत सुसूत्रता आहे.
>
> **- प्राचार्य राजेंद्र झुंजारराव,** मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर

प्रभात PuneCity, 07 Feb 2023, Page:005
https://epaper.dainikprabhat.com

# *News Paper Clippings During February 2023*

## *Section: Education*

WWW.LOKSATTA.COM
पुणे, शुक्रवार, ३ फेब्रुवारी २०२३
पुणे दिनांक

# शिक्षणासाठी थांबलेली तरतूद चिंताजनक

## 'लोकसत्ता'चे संपादक गिरीश कुबेर यांचे मत

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्याची वेळ येऊन ठेपलेली असताना शिक्षणासाठीची थांबलेली तरतूद चिंताजनक आहे, असे मत 'लोकसत्ता'चे संपादक गिरीश कुबेर यांनी गुरुवारी व्यक्त केले. परदेशी जाणाऱ्या भारतीय मुलांचे प्रमाण जगात सर्वाधिक आहे. या अर्थसंकल्पात केवळ आठ हजार कोटी तरतूद शिक्षणासाठी वाढवण्यात आली आहे. राष्ट्रीय उत्पन्नाच्या दोन-अडीच टक्क्यांपेक्षा जास्त तरतूद शिक्षणासाठी होत नाही, असे कुबेर यांनी सांगितले.

देशाच्या अर्थव्यवस्थेचा भविष्यपट मांडणारा २०२३-२४ चा केंद्रीय अर्थसंकल्प अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी बुधवारी लोकसभेत मांडला. अर्थसंकल्पातील घोषणा आणि त्यामागील अर्थ-अनर्थांची उकल 'लोकसत्ता विश्लेषण' या कार्यक्रमातून करण्यात आली. रावेतकर प्रस्तुत आणि 'लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड' सह-प्रायोजक असलेल्या 'अर्थसंकल्पानंतरचे विश्लेषण' कार्यक्रमात कुबेर आणि डॉ. दिलीप सातभाई यांनी मार्गदर्शन केले. त्या प्रसंगी कुबेर बोलत होते.

कुबेर म्हणाले, 'विज्ञान तंत्रज्ञानासाठी नगण्य तरतूद आहे. एक टक्के रक्कमही विज्ञान तंत्रज्ञानासाठी दिली जात नाही. चीन आणि पाकिस्तानशी संघर्ष सुरू असताना संरक्षणासाठी वाढीव तरतूद नाही. संरक्षण विभागाचा ६५ टक्के निधी वेतन-निवृत्ती वेतनावर खर्च होतो. कडू गोळी मधात घोळवून देण्याचे कौशल्य सरकारकडे आहे याची प्रचिती या अर्थसंकल्पाने आली आहे. निर्गुंतवणुकीचे लक्ष्य काय याचा तपशील अद्याप जाहीर झालेला नाही. विश्वासार्ह वाटण्याजोगी आकडेवारी आहे. अर्थसंकल्प बाह्य मार्गाने निधी उभारणी ही त्रुटी आहे. अधिभार हा त्याचाच एक भाग आहे. हा महसूल राज्यांना दिला जात नाही.'



'लोकसत्ता'च्या वतीने आयोजित 'अर्थसंकल्पानंतरचे विश्लेषण' कार्यक्रमात 'लोकसत्ता'चे संपादक गिरीश कुबेर आणि वरिष्ठ सनदी लेखापाल डॉ. दिलीप सातभाई यांनी गुरुवारी मार्गदर्शन केले. टिळक स्मारक मंदिर येथे झालेल्या या कार्यक्रमासाठी पुणेकरांनी गर्दी केली होती.

'भांडवली खर्चासाठी ३३ टक्क्यांनी केलेली वाढ ही मोठी गोष्ट असून मंदावलेल्या अर्थव्यवस्थेला गती देण्यासाठी असे उपाय आवश्यक असतात,' असे सांगून कुबेर यांनी उद्योगांकडून गुंतवणूक होत नसल्याने सरकारने स्वतःच गुंतवणूक केली याकडे लक्ष वेधले. स्वतंत्र अर्थसंकल्प असतानाही नव्हती इतकी गुंतवणूक रेल्वेमध्ये करण्याची घोषणा झाली आहे. प्रवासी वाहतुकीतून काहीही मिळत नाही. मालवाहतुकीतून मोठी उलाढाल. 'वंदे भारत'सारख्या गाड्यांचेही गणित नीट नाही. मालवाहतुकीत सर्वाधिक वाहतूक कोळशाची. हरित इंधनावर भर दिला जात असताना कोळशाचा वापर सर्वाधिक हा विरोधाभास असल्याचे कुबेर यांनी सांगितले.

ग्रामीण कारागिरांसाठी मोठी तरतूद करण्यात आली असून वित्तीय तूट न वाढण्याची काळजी सरकारने घेतली आहे. वित्तीय तूट नियंत्रणात राहणे गरजेचे आहे. पुढील दोन वर्षांत ती अडीच-तीन टक्क्यांनी कमी करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. १८ लाख कोटी रुपयांची जुळवाजुळव कशी होणार हे कळत नाही, असे सांगून कुबेर म्हणाले,की प्रत्येक अर्थसंकल्प निवडणुकीसाठी असतो. त्यामुळे हा अर्थसंकल्प निवडणुकीसाठी नाही असे म्हणता येत नाही. कर्नाटकातील 'अपर भद्रा' प्रकल्पासाठी पाच हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. हा केंद्रीय प्रकल्प झाल्यास एकूण सोळा हजार कोटी रुपये दिले जातील, असे माजी मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले होते. या प्रकल्पाला निवडणुकीच्या तोंडावर यश आले असे म्हणता येईल.

हरित ऊर्जा, सेंद्रिय शेती यावर देण्यात आलेला प्रचंड भर भीतीदायक आहे. एक कोटी शेतकरी सेंद्रिय खतांवर शेती करणे भयंकर आहे. श्रीलंकेत काय झाले ही पार्श्वभूमी विचारात घेतली पाहिजे. सेंद्रिय खतांवर भर दिला जात असताना रासायनिक खतांसाठीच्या अनुदानात गेल्या वर्षभरात मोठी तरतूद करण्यात आली. या अर्थसंकल्पात त्यात कपात केलेली नाही, या विरोधाभासाकडे कुबेर यांनी लक्ष वेधले.

सातभाई म्हणाले, की करदात्यांना आतापर्यंत जुनी आणि नवी करप्रणाली स्वीकारण्याचा पर्याय होता. त्यामुळे जुन्या कररचनेनुसार करकपातीचा लाभ मिळत होता. मात्र, पाश्चात्त्य राष्ट्रांप्रमाणे आपल्याकडे सामाजिक सुरक्षा व्यवस्था नसल्याने गुंतवणूक करणे शक्य असेल तरच नवी करप्रणाली फायदेशीर ठरेल. सरकारला करदात्यांना कोणत्याही सवलती द्यायच्या नाहीत. त्यामुळे आता नवी करप्रणाली सक्तीची करण्यात आली आहे. जुनी करप्रणाली हवी असल्यास त्याचा पर्याय स्वतंत्रपणे निवडावा लागेल. करदाता, ज्येष्ठ करदाता आणि अतिज्येष्ठ करदाता असे तीन प्रकार जुन्या कर प्रणालीत होते. तसे प्रकार नव्या करप्रणालीत नसले, तरी आता ७ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न करमुक्त असेल. क्रयशक्ती कमी झाल्याने कराचा स्तर बदलण्यात आला. जुन्या पद्धतीनुसार दहा लाखांपर्यंत उत्पन्न असलेल्यांनी तीन लाखांपर्यंत गुंतवणूक केल्यास प्राप्तिकर नाही. १२ लाखांपर्यंत उत्पन्न असलेल्यांनी सव्वातीन लाखांपर्यंत गुंतवणूक केल्यास प्राप्तिकर नाही. १५ लाख आणि त्यापुढे उत्पन्न असलेल्यांनी चार लाखांची गुंतवणूक केल्यास प्राप्तिकर नाही. गुंतवणूक करणार असाल तरच जुनी करप्रणाली आणि गुंतवणूक करायची नसल्यास नवी करप्रणाली फायद्याची ठरणार आहे. लोकांनी जास्तीत जास्त खर्च करावा, त्यातून अधिक कर संकलन होऊन भरभराट व्हावी हा सरकारचा उद्देश आहे.

एका वर्षात एका विमा पॉलिसीचा हप्ता पाच लाखांपेक्षा जास्त असल्यास परताव्याच्या वेळी ती रक्कम करपात्र असेल. धनाढ्य लोक गैरवापर करत असल्याचे कारण सरकारने दिले आहे. मात्र, पाच लाखांपेक्षा जास्त हप्ता असलेल्या विमाधारकाचे निधन झाल्यास ती रक्कम करमुक्त असेल, याकडे लक्ष वेधून सातभाई म्हणाले,की देशातील ६० टक्के लोक शेती, शेतीपूरक उत्पन्नावर अवलंबून असून हे उत्पन्न करमुक्त आहे. शेतकऱ्यांमध्ये गरीब, श्रीमंत, अतिश्रीमंत शेतकरी असे गट करून अतिश्रीमंत शेतकऱ्यांना किमान पाच टक्के कर लागू केला पाहिजे.

श्रोत्यांच्या प्रश्नांना कुबेर आणि सातभाई यांनी उत्तरे दिली. 'रावेतकर'चे अमोल रावेतकर यांनी कुबेर यांचे आणि 'लोकमान्य'चे भालचंद्र कुंटे यांनी सातभाई यांचे स्वागत केले. भक्ती बिसुरे यांनी सूत्रसंचालन केले.

Ravetkar
प्रस्तुत
लोकसत्ता विश्लेषण
लोकमान्य

लोकसत्ता Fri, 03 February 2023
https://epaper.loksatta.com/c/71580533

# *News Paper Clippings During February 2023*

## *Section: Education*

# पेपर द्यायचा, तर वेळेत या!

### परीक्षेला उशिरा येणाऱ्या १०वी, १२वी विद्यार्थ्यांना प्रवेश नाही

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या दहावी आणि बारावीच्या परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना परीक्षा सुरू होण्याच्या अर्धा तास आधी परीक्षा कक्षात पोहोचावे लागणार आहे. अन्यथा त्यांना परीक्षेला मुकावे लागेल. यंदाच्या परीक्षांसाठी मंडळाने नियम जारी केले आहेत.

बारावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते १ मार्च २०२३ या कालावधीत, तर दहावीची परीक्षा २ ते २५ मार्च या कालावधीत होणार आहे. या पार्श्वभूमीवर परीक्षेसंदर्भातील



विद्यार्थ्यांसाठीच्या सूचना राज्य मंडळाच्या सचिव अनुराधा ओक यांनी शिक्षासूची परिपत्रकाद्वारे मुख्याध्यापकांना दिल्या आहेत. त्यानुसार विद्यार्थ्यांना सकाळच्या सत्रामध्ये १०.३० वाजेपर्यंत, तर दुपारच्या सत्रातील परीक्षेसाठी २.३० वाजेपर्यंत परीक्षा कक्षात पोहोचावे लागणार आहे. परीक्षेवेळी गैरप्रकार केल्यास संबंधित विद्यार्थ्यांची संपादणूक रद्द करणे पुढील परीक्षेस प्रतिबंध, पोलिसात गुन्हा दाखल करणे यासारखी कारवाई करण्यात येईल, असेही परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे.

मुख्याध्यापकांनी या सूचना विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवाव्यात. शक्य झाल्यास प्रत्येक विद्यार्थ्याला शिक्षासूचीची प्रत उपलब्ध करून द्यावी आणि त्यांची स्वाक्षरी घेऊन ती प्रत दफ्तरी ठेवावी. विद्यार्थ्यांनी प्रवेशपत्र आणि ओळखपत्र परीक्षेच्या प्रत्येक दिवशी सोबत ठेवणे आवश्यक आहे. ओळखपत्र आणि प्रवेशपत्राची *(**पान ४ वर**)*

लोकसत्ता Fri, 03 February 2023
https://epaper.loksatta.com/c/71581229

# पेपर द्यायचा, तर वेळेत या!

*(पान १ वरून)* मागणी केल्यावर दाखवता आले पाहिजे, असेही परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे. गेल्या वर्षी करोना प्रादुर्भावामुळे राज्य मंडळाने विद्यार्थ्यांना काही सवलती दिल्या होत्या. त्यात शाळा-कनिष्ठ महाविद्यालयातच परीक्षा केंद्र, परीक्षेसाठी पंधरा मिनिटे ते अर्धा तास अतिरिक्त वेळ आदींचा समावेश होता. मात्र यंदा नियमित पद्धतीने परीक्षा होणार असल्याने या सवलती रद्द करण्यात आल्या आहेत.

लोकसत्ता Fri,
http

पुढारी

# परीक्षेमध्ये गैरप्रकार केल्यास कारवाई

### दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी राज्य मंडळाकडून शिक्षासूची

पुणे : पुढारी वृत्तसेवा

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या दहावी आणि बारावीच्या परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांनी कोणताही गैरप्रकार केला तर त्यांच्यावर कारवाईचा बडगा उगारण्यात येणार आहे. त्यासाठी राज्य मंडळाने शिक्षासूची तयार केली आहे. तसेच यंदा परीक्षेला सामोरे जाताना विद्यार्थ्यांवर अनेक बंधने राहणार असल्याचेही स्पष्ट झाले आहे.

राज्य मंडळातर्फे बारावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते १ मार्च २०२३ या कालावधीत, तर दहावीची परीक्षा २ ते २५ मार्च या कालावधीत होणार आहे.



- **केंद्रावर उशिरा आल्यास परीक्षा कक्षात प्रवेश नाही**

या पार्श्वभूमीवर परीक्षेसंदर्भातील विद्यार्थ्यांसाठीच्या सूचना राज्य मंडळाच्या सचिव अनुराधा ओक यांनी शिक्षासूची परिपत्रकाद्वारे मुख्याध्यापकांना दिल्या आहेत. त्यानुसार सकाळच्या सत्रात साडेदहा आणि दुपारच्या सत्रात अडीच वाजल्यानंतर परीक्षाकक्षात विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार नाही. परीक्षेवेळी गैरप्रकार केल्यास संबंधित विद्यार्थ्यांची संपादणूक रद्द करणे, पुढील परीक्षेसाठी प्रतिबंध करणे आणि पोलिसात गुन्हा दाखल करण्याची करणे अशी कारवाई करण्यात येईल. यासह अन्य सूचना विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे.

शक्य झाल्यास प्रत्येक विद्यार्थ्याला शिक्षासूचीची प्रत उपलब्ध करून द्यावी. विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घेऊन ती प्रत दप्तरी ठेवावी. विद्यार्थ्यांनी परीक्षेच्या प्रत्येक दिवशी आपले प्रवेशपत्र आणि ओळखपत्र सोबत ठेवणे आवश्यक आहे. ओळखपत्र आणि प्रवेशपत्राची मागणी केल्यावर ते दाखविले पाहिजे, असे नमूद करण्यात आले आहे.

गेल्या वर्षी कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे राज्य मंडळाने विद्यार्थ्यांना काही सवलती दिल्या होत्या. त्यात शाळा-कनिष्ठ महाविद्यालयातच परीक्षा केंद्र, परीक्षेसाठी पंधरा मिनिटे ते अर्धा तास अतिरिक्त वेळ आदींचा समावेश होता. मात्र, यंदा नियमित पद्धतीने परीक्षा होणार असल्याने या सवलती रद्द करण्यात आल्या आहेत. त्याचबरोबर विद्यार्थ्याने कोणती चूक केल्यानंतर त्यासाठी कोणती शास्ती लावावी यासंदर्भातील यादीच मुख्याध्यापकांना पाठविण्यात आलेली आहे.

Pune Edition
Feb 3, 2023 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

# परदेशी विद्यापीठांबाबत सूचनांसाठी मुदतवाढ

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** परदेशी विद्यापीठांना देशात केंद्र किंवा संकुल सुरू करण्यास परवानगी देण्याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमावलीवर हरकती, सूचना नोंदवण्यास दुसऱ्यांदा, २० फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

यूजीसीचे सचिव प्रा. रजनीश जैन यांनी या संदर्भातील परिपत्रक जारी केले. परदेशातील विद्यापीठांना भारतात केंद्र सुरू करण्याबाबतच्या नियमावलीचा मसुदा यूजीसीकडून ५ जानेवारीला जाहीर करण्यात आला. त्याबरोबरच या नियमावलीवर हरकती-सूचना मागवण्यात आल्या. याला मुदतवाढ देण्याची मागणी झाली होती. ugcforeigncollaboration@gmail. com या संकेतस्थळावर हरकती, सूचना सादर करता येतील.

लोकसत्ता Fri, 03
https:/,

# *News Paper Clippings During February 2023*

## *Section: Education*

### आराखड्यासाठी फेब्रुवारीअखेरपर्यंत मुदत

# चार वर्षांची पदवी जूनपासून, अभ्यासक्रमाचा मात्र पत्ताच नाही!

**चिन्मय पाटणकर, लोकसत्ता**



> विद्यापीठांमध्ये विद्या परिषद आणि अभ्यास मंडळ स्थापनेची प्रक्रिया सुरू आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणातील तरतुदीनुसार चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी आधी अभ्यासक्रम तयार झाला पाहिजे. अभ्यासक्रम आराखडा तयार करण्यासाठी फेब्रुवारीअखेरपर्यंत मुदत देण्यात आली आहे. अभ्यासक्रम तयार करण्यासाठी विद्या परिषद आणि अभ्यास मंडळांनी 'यूजीसी'च्या मार्गदर्शक सूचनांचा अवलंब केला पाहिजे. मात्र, जूनपासून नवा अभ्यासक्रम अमलात आणण्यासाठी युद्ध पातळीवर काम करण्याची गरज आहे.
> - डॉ. नितीन करमळकर, अध्यक्ष, शैक्षणिक धोरण अंमलबजावणी सुकाणू समिती

**पुणे :** राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम जूनपासून सुरू करण्याचे राज्य शासनाने जाहीर केले आहे. मात्र, नव्या रचनेनुसार पदवीसाठीच्या अभ्यासक्रमाचा आराखडाही अद्याप तयार नसून, आता या अभ्यासक्रमासाठी युद्धपातळीवर काम करावे लागणार आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मध्ये उच्च शिक्षणात बदल करण्यात आले आहेत. प्रचलित तीन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम आता चार वर्षांचा करण्यात आला आहे. तसेच मल्टिपल एंट्री, मल्टिपल एक्झिटचा पर्यायही विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आला आहे. राज्य शासनाच्या निर्णयानुसार, चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम जूनपासून लागू करण्यासाठी सध्याचा अभ्यासक्रम बदलावा लागणार आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या अभ्यासक्रमात आणखी एका वर्षाची भर असे त्याचे स्वरूप नाही. धोरणात व्यक्त केलेल्या अपेक्षेनुसार उद्योगस्नेही, संशोधनाला चालना देणारा, रोजगारक्षम असलेला संपूर्ण नवा अभ्यासक्रम तयार होणे आवश्यक आहे. शैक्षणिक वर्ष सुरू होण्यास जेमतेम पाच ते सहा महिने बाकी असताना अद्याप चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम तयार झालेला नाही.

राज्यातील विद्यापीठांच्या अधिकार मंडळांच्या निवडणुकांची प्रक्रिया काही दिवसांपूर्वीच पूर्ण झाली आहे. त्यामुळे विद्यापीठांमध्ये अद्याप विद्या परिषद, अभ्यास मंडळे अस्तित्वात आलेली नाहीत. आता चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम जूनपासून सुरू करण्यासाठी युद्धपातळीवर काम करून अभ्यासक्रमाचा आराखडा तयार करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

epaper.loksatta.com

लोकसत्ता Fri, 03 February 2023
https://epaper.loksatta.com/c/71581233

# शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे विद्यापीठात 'काम बंद' आंदोलन

### परीक्षा विभागाच्या कामकाजावर बहिष्कार



### आजच्या परीक्षा पुढे ढकलल्या

कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाचा फटका सत्र परीक्षांना बसला असून, आंदोलनामुळे गुरुवारी परीक्षेचे कामकाज झाले नाही. त्यामुळे आज, शुक्रवारी (३ फेब्रुवारी) होणाऱ्या सर्व परीक्षांचे फेरनियोजन (सुधारित वेळापत्रक) करण्यात येणार असून, या दिवशीच्या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. परीक्षेच्या फेर नियोजनाबाबतची माहिती विद्यापीठाच्या वेबसाइटवर प्रसिद्ध करण्यात येईल, अशा सूचना परीक्षा आणि मूल्यमापन मंडळाने दिल्या आहेत. याबाबतची माहिती प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना द्यावी, अशी सूचना मंडळाने केली आहे.



**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विविध मागण्यांसाठी आजपासून 'काम बंद' आंदोलनाला सुरुवात केली आहे. त्याचाच पहिला टप्पा म्हणून कर्मचाऱ्यांनी गुरुवारी लाक्षणिक आंदोलन करून परीक्षा विभागाच्या कामकाजावर बहिष्कार घालण्यात आला. त्यामुळे विद्यापीठातील परीक्षेशी संबंधित कामकाज ठप्प राहिले.

विद्यापीठ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करावी, रिक्त असलेली पदे भरण्यास मान्यता द्यावी आणि जुनी पेन्शन योजना लागू करावी, यांसह विविध मागण्यांसाठी कर्मचाऱ्यांनी आंदोलनाला सुरुवात केली आहे. पुणे विद्यापीठातील कर्मचाऱ्यांनी यापूर्वीही आंदोलन करून राज्य सरकारचे लक्ष वेधले होते. मात्र, राज्य सरकारने कोणतीही मागणी मान्य केली नाही. त्यामुळे विद्यापीठातील कर्मचाऱ्यांनी गेल्या आठवड्यात टप्प्याटप्प्यानुसार आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. याबाबत राज्य सरकारकडून कोणतीच दखल न घेतल्याने आजपासून कर्मचाऱ्यांनी आंदोलनास सुरुवात केली.

आंदोलनाचा भाग म्हणून विद्यापीठाच्या परीक्षा विभागाचे कामकाज आजपासून बंद ठेवण्याचा निर्णय कर्मचाऱ्यांनी घेतला आहे. त्यानंतर १४ ते १६ फेब्रुवारीपर्यंत निदर्शने, काळ्या फिती लावून काम केले जाईल. त्यानंतरही काहीच दखल न घेतल्यास २० फेब्रुवारीपासून बेमुदत काम बंद आंदोलन करण्यात येणार आहे, अशी माहिती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ शिक्षकेतर कृती समितीच्या वतीने देण्यात आली.

Maharashtra Times 3.2.2023

# News Paper Clippings During February 2023

## Section: Education

# Teachers will read out exam rules to HSC, SSC students

TIMES NEWS NETWORK

**Pune:** School teachers will have to read out the offences and punishments of board exam malpractices to students before the practical exam to make students aware of the consequences of committing the offences.

This is for the first time that the Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education has circulated a compilation of 32 offences during exams and liable punishments to curb exam malpractices.

Schools have also been told to circulate a copy of the offences to every student so that they don't indulge in cheating during exams. A statement issued by the board also added that students must report to the written examinations 30 minutes before the scheduled time.

Chairman of the state board Sharad Gosavi said, "Currently, the Std XII practical exams are going on. We have told school teachers to read out all the points with respect to malpractices to the students. Also, before the written exams begin, at least once the schools must read out the points so that each and every student is aware of the consequences."

The answer sheets that students receive during written board exams have rules and regulations with respect to the conduct of the exam printed on the back side of the cover page.

Apart from this, the state board has also told schools to send a signed receipt from students that they have read the rules with respect to malpractices and their consequences.

If possible, schools have also been told to give a copy of the 32 points to every student. A report by the school on actions taken with respect to awareness among students should be sent to respective divisions of the board, Gosavi said.

The statement added that students should report at 10.30am for the 11am paper and at 2.30pm for the 3pm paper in the second session. Students reporting to the examination hall after the assigned time will not be allowed inside the class.

Pic for representational purposes



## Celebrate Grandparents' Day in Sept, state government directs schools

**Mumbai:** With children of most working parents spending a major part of their time with their grandparents, the state government wants schools to honour them. In a notification issued on Thursday, the state government directed schools to celebrate Grandparents' Day, which falls on the first or second Sunday of September.

This year it falls on September 10. As it is a Sunday, schools can celebrate it on any working day in the week. Grandparents can be invited to schools where children can entertain them and even organise games, like musical chairs, for them. Skits, dance and music programmes can be organised and children can be made aware about the role of grandparents in their growing years. TNN

The Times of India 3.2.2023

# *News Paper Clippings During February 2023*

## *Section: Education*

**नवभारत**

## लाइब्रेरियन व शारीरिक शिक्षा निदेशक के पदों पर भर्ती पेंडिंग

**पुणे, नवभारत न्यूज नेटव.** सहायता प्राप्त सीनियर कॉलेज के अति महत्वपूर्ण एवं एकाकी संकाय में लाइब्रेरियन एवं शारीरिक शिक्षा निदेशक के पदों पर भर्ती प्रक्रिया में देरी हुई है. इस संबंध में उच्च शिक्षा मंत्री ने घोषणा की थी कि नागपुर में आयोजित शीतकालीन सत्र में जनवरी माह में निर्णय लिया जाएगा. लेकिन जनवरी बीत जाने के बाद भी अभी तक भर्ती शुरू नहीं होने से पात्र लोग बैचेन है. 3 नवंबर 2018 को गठबंधन सरकार के सहायता प्राप्त सीनियर कॉलेजों में विभिन्न पदों पर भर्ती का शासनादेश जारी किया गया था. लेकिन कोविड संक्रमण की वजह से इस

### सरकार का आश्वासन अधर में

लाइब्रेरियन और शारीरिक शिक्षा निदेशक के पदों पर भर्ती को लेकर जून 2022 में तत्कालीन उच्च शिक्षा मंत्री उदय सामंत और तत्कालीन वित्त मंत्री अजीत पवार के बीच बैठक हुई थी. इसमें लाइब्रेरियन व शारीरिक शिक्षा निदेशक के पदों पर भर्ती को हरी झंडी दिखाई गई थी, लेकिन इन दोनों पदों पर भर्ती के लिए सरकार के फैसले से पहले ही सरकार बदल गई और फिर से इन दोनों पदों पर भर्ती के फैसले को टाल दिया गया है.

भर्ती पर सरकार का आश्वासन अधर में रोक लगा दी गई.

Pune Edition
03-february-2023 Page No. 5
epaper.enavabharat.com

**पुढारी**

## सव्वा लाख विद्यार्थी शिष्यवृत्तीला मुकले

### महाविद्यालयांनी वेळेत अर्ज दाखल न केल्याने प्रश्न

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत अनुसूचित जाती, जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी महाडीबीटीच्या संकेतस्थळावर शिष्यवृत्तीचे ऑनलाइन अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मात्र, ऑनलाइन अर्ज करूनही राज्यातील १ लाख २३ हजार विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे अर्ज महाविद्यालयांनी प्रलंबित ठेवल्याची बाब समोर आली आहे. विशेष म्हणजे, समाजकल्याण विभागाने वारंवार सूचित करूनही महाविद्यालयांनी याकडे काणाडोळा केल्याने समाजकल्याण विभागाकडून आता कारवाईचा बडगा उगारला आहे.

याबाबत समाजकल्याण विभागाचे सचिव सुमंत भांगे व आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे यांनी आढावा घेतला असून, ज्या महाविद्यालयाकडे मोठ्या प्रमाणावर अर्ज प्रलंबित आहेत, त्यांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत नोटीस देऊन महाविद्याल्याची मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

**समाजकल्याण विभागाकडून होणार कारवाई**

अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी केंद्र व राज्य शासनाकडून संयुक्तपणे भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती प्रदान केली जाते. महाडीबीटी संकेतस्थळावर शिष्यवृत्तीचे नवीन अर्ज भरण्यासाठी अनुसूचित जाती प्रवर्गासाठी वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली आहे. सन २०२२-२३ मध्ये अनुसूचित जाती व नवबौद्ध संवर्गाची आतापर्यंत राज्यातून २ लाख ९० हजार अर्जांची ऑनलाइन नोंदणी झाली आहे. त्यापैकी समाजकल्याण विभागाकडे प्राप्त झालेले १ लाख ४२ हजार अर्ज मंजूर करण्यात आले, तर १ लाख २३ हजार अर्ज महाविद्यालयांकडेच प्रलंबित असल्याने त्यावर समाजकल्याण विभागास कार्यवाही करता आली नाही. तसेच २० हजार अर्ज हे विद्यार्थिस्तरावर प्रलंबित आहेत. त्यांनी महविद्यालयाकडे अर्ज सादर केले नाहीत, असेही तपासणीत दिसून आले आहे.

> अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्यास संबंधित महाविद्यालयावर जबाबदारी निश्चित करण्यात येऊन कार्यवाही करण्यासाठी शासनाकडे प्रस्तावित करण्यात येईल. यासंदर्भात कठोर पावले उचलली जातील.
>
> **डॉ. प्रशांत नारनवरे,** आयुक्त, समाजकल्याण विभाग

विशेष म्हणजे, सन २०२१-२२ मध्ये तब्बल ४ लाख २३ हजार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली होती. त्यापैकी ३० जानेवारी २०२३ अखेर फक्त २ लाख ९० हजार अर्जांची म्हणजेच ६९ टक्के अर्जांचीच ऑनलाइन नोंदणी झाली आहे. त्यामुळे लाखो विद्यार्थ्यांनी अद्याप भारत सरकार शिष्यवृत्तीसाठी नोंदणीच केली नसल्याचीही बाब समोर आली असून, नोंदणी केलेल्यांपैकी १ लाख २३ हजार अर्ज देखील महाविद्यालयाकडेच प्रलंबित आहेत. त्यामध्ये पुणे जिल्ह्यात सर्वाधिक १४ हजार अर्ज, औरंगाबाद व नागपूर जिल्हा १० हजार, नाशिक जिल्हा ७ हजार, अहमदनगर, नांदेड, अमरावती ६ हजार, अकोला, ठाणे, चंद्रपूर, बीड या जिल्ह्यांतील महाविद्यालयांकडे ४ हजारांहून अधिक अर्ज प्रलंबित आहेत.

महाविद्यालयांच्या चुकांमुळे विद्यार्थ्यांनी अर्ज वेळेत सादर केले नाहीत, तर शिष्यवृत्तीला मुकावे लागणार आहे. विद्यार्थ्यांनी अर्ज भरावेत, यासाठी महाविद्यालयस्तरावर जनजागृती करण्याचे निर्देश विभागातील सर्व सहायक आयुक्त यांना दिले आहेत. तसेच, जास्तीत जास्त विद्यार्थ्यांपर्यंत पोहाचण्यासाठी समाज माध्यमांचाही वापर करण्याचे निर्देश दिले आहेत. २०२२-२३ या वर्षात महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेतेलेले व शिष्यवृत्तीचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी त्यांचे अर्ज तत्काळ ऑनलाइन सादर करावेत, असे आवाहन समाजकल्याण विभागाकडून करण्यात आले आहे.

Pune Edition
Feb 4, 2023 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During February 2023*

### *Section: Education*



# ₹100-cr caution money scam unearthed in Maha

**Refundable deposits of students lying with govt, aided & unaided colleges used cash without approval**



Deposits given by students to colleges, if not claimed, lie with the institutions. It is supposed to be spent on facilities for EBC students. FILE PHOTO

**UNCLAIMED FUNDS SPENT BY GOVT & AIDED COLLEGES (IN RS)**

- Pune division: 8,80,56,000
- Mumbai division: 15,32,71,627
- Kolhapur division: 5,85,34,560
- Solapur division: 66,96,817
- Aurangabad division: 53,83,301
- Amravati division: 5,27,015
- Jalgaon division: 4,84,30,704
- Nanded division: NA
- Panvel division: 8,44,59,820
- Nagpur division: 70,30,058
- Total: 45,23,89,902

(Source: Directorate of higher education joint division-wise)

| Yashpal Sonkamble
yashpal@punemirror.com
TWEET @YashPune_Mirror

A Right To Information (RTI) query has revealed the possible involvement of government, aided and unaided colleges across the state in a scam estimated to be over Rs 100 crore. The fraud relates to the refundable caution money taken from students at the time of admission.

In the reply to the RTI query filed by a student leader, only details have been provided pertaining to the 28 government and 1,171 aided colleges by the director of higher education (DHE). The reply stated that over Rs 45 crore unclaimed refundable caution money has been spent by most aided, government colleges without taking the permission of the joint director of state higher education department.

It was learnt that the caution money deposits held by 1,936 private unaided colleges, data on which is not available with the DHE, has been illegally used by these private unaided institutions. Also, the caution money with the 28 government and 1,171 aided colleges amounting to Rs 45.23 cr has been spent on unnecessary work without the approval of the DHE joint directors. Now, student organisations have demanded that the money should be either refunded to the students or 30 percent of the funds should be spent on the students belonging to the economically backward classes (EBC), which has been mandated under the government rules.

> **I will issue a circular to all colleges to ensure that the caution money is refunded to the students. We will soon take a policy decision in this regard.**
>
> –Shailendra Devlankar, edu director

Amar Ekaad, president, Care of People Safety (COPS) student union, said, "Under the RTI application, we got details about only 28 government and 1,171 aided colleges' caution money. We have demanded details of private unaided colleges in the interest of students. It is clear that the private unaided college managements have least regard for state higher education minister Chandrakant Patil's letter, which has instructed them to utilise the funds only for the legitimate purpose. The proposal for spending 30 percent of the total balance deposit on the EBC students, in the case of the said colleges, has not been submitted by the DHE to the higher education minister's office. On the other hand, the directorate of technical education (DTE) has submitted a proposal in this regard to the minister's office for approval."

Alok Kanojia, a student representative, said, "When a student leaves the college after completing a 3-year degree course, the caution money is expected to be refunded to them immediately. Sometimes, the amount is not claimed, which must be allocated to facilities such as hostel, mess fees and educational material - notebooks, books, and stationery - for the needy EBC students. Also, these funds can also be made available for medical facilities or the earn-and-learn scheme."

Director of higher and technical education Shailendra Devlankar said, "I will issue a circular to all colleges to ensure that the caution money is refunded to the students. We will soon take a policy decision on non-utilisation of the unclaimed amount for the welfare of poor students by the colleges. We will submit a draft proposal to the state government and take action once it is approved."

Pune Mirror 4.2.2022

# News Paper Clippings During February 2023

## Section: Education

# Growth of Indian languages receives budgetary impetus

Fareeha Iftikhar
fareeha.iftikha@htdigital.in

**NEW DELHI:** In a push to promote indigenous languages and Indian Knowledge Systems (IKS) among the youth, finance minister Niramala Sitharaman in the Union Budget 2023-24 set aside ₹300.7 crore for national institutions for the promotion of Indian languages. The amount is an increase of 20% from 2022-23, and doubles the fund for the IKS scheme.

The Narendra Modi government has taken several steps to promote regional languages in educational institutions, including the introduction of technical and professional courses in these languages.

According to the Budget document, grants to institutes for promotion of Indian languages have increased to ₹300.7 crore in 2023-34 from ₹250 crore in 2022-23 and nearly 70% more than ₹176.5 crore in 2021-22.

These institutions include Central Sanskrit University, Kendriya Hindi Sansthan, National Council for Promotion of Urdu Language, National Council for Promotion of Sindhi Language, Central Institute of Classical Tamil, and National Initiative for Quality Higher Education in Indian Languages.



The Union Budget 2023-24 has set aside ₹300.7 crore for national institutions for the promotion of Indian languages. HT ARCHIVE

For the Central Institute of Indian Languages, Mysore, which works for the promotion of all Indian languages including Kannada, Telugu, Malayalam and Odia, the fund allocation has increased to ₹53.61 crore in 2023-24 from ₹43.50 crore in the revised estimate in 2022-23.

The allocation for the IKS scheme has also increased to ₹20 crore from ₹10 crore (budget estimate) in 2022-23. Under the scheme, the elements of knowledge from ancient India and its contributions to modern India are being incorporated in the curriculum at both the school and university levels.

In 2020, the government established an IKS division as an innovation cell at the All India Council for Technical Education (AICTE) to promote interdisciplinary research on aspects of indigenous knowledge. University Grants Commission (UGC) chairperson M Jagadesh Kumar said the Budget allocation has been done in line with the National Education Policy (NEP) 2020 which lays emphasis on imparting education in Indian languages and promoting the IKS among the youth.

"UGC has formed an apex committee to work with Indian authors to prepare textbooks at undergraduate and postgraduate levels in different Indian languages and disciplines. These books will be available in digital format and can be made accessible to the students on the national digital library announced in the budget," he said. "Besides, the budget allocates ₹300 crore to some institutes for promoting Indian languages, which is 20% higher than last year's allocation. It will further supplement our efforts in promoting Indian languages."

Kumar said that additional allocation to IKS will also boost the government's efforts of integrating the ancient Indian knowledge into our regular curricula. "For implementation of IKS, resource materials are required, and we need trained teachers to teach the Indian knowledge system," he said. "Recently, UGC has issued guidelines for training teachers in IKS. UGC will scale up its efforts in the coming months."

Besides, for the directorate of Hindi, the allocation has increased to ₹39.47 crore in 2023-24 from ₹36 crore in the current fiscal. The directorate, which has four regional centres, works with the objective of propagation and development of Hindi as a link language.

Hindustan Times 4.2.2023

# *News Paper Clippings During February 2023*

## *Section: Education*

# पदव्युत्तर अभ्यासक्रमही आता ऑनलाइन

## येत्या शैक्षणिक वर्षापासून पुणे विद्यापीठ करणार अंमलबजावणी

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ५ -** विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार, येत्या शैक्षणिक वर्षापासून पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या २० टक्के अभ्यासक्रम मूक अथवा स्वयम या ऑनलाइन माध्यमातून पूर्ण करण्यास विद्यार्थ्यांना परवानगी देण्याचा निर्णय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने घेतला आहे. पदवीच्या विद्यार्थ्यांना २० टक्के ऑनलाइन पद्धतीने अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी पुढील शैक्षणिक वर्षापासून मान्यता देण्यात आली आहे.

'यूजीसी'च्या नियमावलीनुसार मॅसिव्ह ओपन ऑनलाइन कोर्स (मूक) अथवा स्वयम किंवा तत्सम ऑनलाइन अभ्यासक्रम विद्यापीठ व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना लागू करण्यासाठी डॉ. सजीव सोनवणे यांची समिती नेमण्यात आली होती. या समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी व त्यासंदर्भात रूपरेषा ठरविण्यासाठी डॉ. एम. जी. चासकर यांच्या समितीने अहवाल सादर केला होता. त्यास मान्यता देण्यात आली आहे.

विद्यापीठ शैक्षणिक विभागातील सर्व अभ्यासक्रम व संलग्न महाविद्यालये तथा मान्यताप्राप्त संस्थांमधील पदव्युत्तर अभ्यासक्रमांना २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासून ऑनलाइन अभ्यासक्रम पूर्ण करण्याची मुभा देण्यात आली आहे. मात्र पदवी अभ्यासक्रमांसाठी ऑनलाइन पद्धतीची अंमलबजावणी २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून लागू होणार आहे. हा ऑनलाइन अभ्यासक्रम हे केवळ वैकल्पिक अथवा जादा क्रेडिटसाठी करण्यास परवानगी राहणार आहे, असेही विद्यापीठाने स्पष्ट केले आहे.



### विद्यापीठाकडून नियमावली

ऑनलाइन अभ्यासक्रमांसाठी प्रत्येक विद्यापीठातील विभाग व महाविद्यालयात समन्वयक म्हणून नेमणूक करावे लागेल. समन्वयकाने विषय निवडण्यापूर्वी विद्यार्थ्यांना संपूर्ण माहिती देणे आवश्यक आहे. तसेच शंकाचे निरसन करावे. विद्यार्थ्यांनी जे विषय निवडले आहेत, त्याची माहिती नियोजन, परीक्षा व पदव्युत्तर प्रवेश विभागाला कळवावीत. ऑनलाइन अभ्यासक्रम घेतल्यानंतर परीक्षा विभागाला त्याच्या निकालाच्या संगणक प्रणालीतध्ये योग्य ते बदल करावा. तसेच या विद्यार्थ्यांना शुल्कामध्ये सवलत देण्याचा विचार करावा, अशी नियमावली विद्यापीठाने प्रसिद्ध केली आहे.

### ऑनलाइन अभ्यासक्रम निवडण्यासाठी पर्याय

- मूक अथवा स्वयम अभ्यासक्रम
- यूजीसीने मान्यता दिलेले अभ्यासक्रम
- आंतरराष्ट्रीय स्तरावरील मूक अभ्यासक्रम
- पुणे विद्यापीठाने मान्यता दिलेले अभ्यासक्रम

प्रभात PuneCity, 06 Feb 2023, Page:005
https://epaper.dainikprabhat.com

सकाळ

# चार वर्षांच्या पदवीसाठी विद्यापीठ सज्ज

## 'मल्टिपल एंट्री-मल्टिपल एक्झिट'चा पर्यायही उपलब्ध

**पुणे, ता. ५ :** बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना आता थेट चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमाला प्रवेश मिळू शकणार आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) सूचनेनुसार चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम राबविण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ सज्ज झाले असून त्यादृष्टीने पावले उचलली जात आहेत. येत्या शैक्षणिक वर्षात (२०२३-२४) जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना या पदवी अभ्यासक्रमात सामावून घेण्याच्या दृष्टीने विद्यापीठाचे प्रयत्न सुरू आहेत.

येत्या शैक्षणिक वर्षापासून बारावीनंतर पदवी अभ्यासक्रमाला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमाला प्रवेश देण्यासाठीची तयारी सुरू असल्याची माहिती विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. कारभारी काळे यांनी दिली.

विद्यार्थ्यांना काही कारणाने शिक्षण अर्धवट सोडून पुन्हा काही काळाने शिक्षण घेण्याची मल्टिपल एंट्री-मल्टिपल एक्झिट'चा पर्यायही उपलब्ध असणार आहे. शिक्षण घेत असताना आतापर्यंत तुम्ही शिक्षण अर्धवट सोडले तर, तुम्हाला पदवी मिळत नव्हती. तुमचे शिक्षण हे बारावी उत्तीर्ण एवढेच असायचे. परंतु आता तुम्ही पदवी शिक्षण घेताना पहिल्या वर्षानंतर शिक्षण सोडले तर तुम्हाला सर्टिफिकेट मिळेल, दोन वर्षांनी शिक्षण सोडले तर पदविका मिळेल आणि तीन वर्षांचा अभ्यासक्रम झाला की त्याला पदवी मिळेल, चार वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर त्याला ऑनर किंवा संशोधन पदवी मिळेल, असे डॉ. काळे यांनी स्पष्ट केले.

डॉ. काळे म्हणाले, "चार वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण करताना एखाद्या विद्यार्थ्यांचा क्रेडिट स्कोअर हा जास्त असेल, तर त्या विद्यार्थ्याला संशोधनात पुढे शिक्षण घेता येईल. समजा, एखाद्या विद्यार्थ्याने अभ्यासक्रम सर्वसाधारण क्रेडिट स्कोअर मिळवित पूर्ण केल्यास, त्याला आणखी एक वर्षांचा पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम करत पुढे संशोधनासाठी पूरक शिक्षण घेता येईल."

### विद्यापीठाने उचललेली पावले

- तीन वर्षांचा अभ्यासक्रम चार वर्षांचा करण्यात येणार
- येत्या शैक्षणिक वर्षापासून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमात प्रवेश देण्याचा मानस
- येत्या दोन-तीन महिन्यांत या अभ्यासक्रमाच्या निर्मितीचे काम करण्यात येईल
- अभ्यास मंडळ नियुक्त करून अभ्यासक्रम निर्मितीची प्रक्रिया राबवणार
- चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमावर टप्प्या-टप्प्याने काम करणार

Pune, Main
06/02/2023 Page No. 5

# *News Paper Clippings During February 2023*

## *Section: Education*

पुढारी

# नव्या शैक्षणिक धोरणात मराठी ज्ञानभाषा होणार

### उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विश्वास

**वर्धा : पुढारी वृत्तसेवा**

मराठी ज्ञानभाषा होण्याच्या दृष्टीने आपण प्रयत्न करू शकलो नाही. नव्या पिढीचा ओढा मराठीकडे कमी झाला आहे. पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आणलेल्या नव्या शैक्षणिक धोरणात वैद्यकीय, तंत्र आणि सर्व प्रकारचे शिक्षण मराठीतून देऊ शकणार आहोत. त्यामुळे ज्ञान व्यवहारात मराठीचा समावेश होईल आणि ती ज्ञानभाषा होईल. मराठीबाबतची चिंता आता दूर होईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी रविवारी (दि. ५) व्यक्त केला.

वर्धा येथील महात्मा गांधी साहित्य नगरीत सुरू असलेल्या ९६ व्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाच्या अखेरच्या दिवशी शुभारंभाच्या सत्रात फडणवीस बोलत होते. व्यासपीठावर खा. रामदास तडस, खा. डॉ. अनिल बोंडे, आ. पंकज भोयर, आ. समीर कुणावार, आ. समीर मेघे, माजी आ. सागर मेघे, विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष व संमेलनाचे कार्याध्यक्ष प्रदीप दाते, अ. भा. मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष उषा तांबे, डॉ. उज्ज्वला मेहेंदळे आदी मान्यवर उपस्थित होते. फडणवीस म्हणाले, मराठीमध्ये साहित्य संमेलनाची उज्ज्वल अशी परंपरा आहे. मराठीमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे, विविध विचारांची साहित्य संमेलने उत्साहात पार पडतात. संमेलने ही उणिवांवर बोट ठेवण्यासाठी नव्हे तर जाणीवा समृद्ध करणारे असते. याप्रसंगी विदर्भ साहित्य संघाच्या शताब्दी महोत्सवानिमित्त आयोजित ९६ व्या साहित्य संमेलनाची स्मरणिका 'वरदा'चे प्रकाशन त्यांच्या हस्ते केले. प्रास्ताविक प्रदीप दाते यांनी केले, तर संचालन रेणुका देशकर यांनी केले.

### विदर्भ साहित्य संघाला १० कोटी

विदर्भ साहित्य संघाने मराठी साहित्य आणि साहित्यिकांचे संवर्धन करण्याचे कार्य स्वातंत्र्यपूर्व काळापासून केले आहे. शताब्दी वर्षानिमित्त शासनाकडून १० कोटींचा निधी देणार असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केली.

Pune Edition
Feb 6, 2023 Page No. 6
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During February 2023*

### *Section: Education*

# उच्च शिक्षण अहवाल काय सांगतो?

■ श्रीधर लोणी

देशात उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या प्रथमच चार कोटींवर गेली असून, त्यामध्ये मुलग्यांची संख्या २.१२ कोटी (५१.३%) आणि मुलींची संख्या २.०१ कोटी (४८.०७%) आहे. ही आकडेवारी २०२०-२१ या शैक्षणिक वर्षातील असून, देशपातळीवरील अहवालाद्वारे ती समोर आली आहे. देशातील उच्च शिक्षण संस्थांकडून माहिती घेऊन दर वर्षी 'ऑल इंडिया सर्व्हे ऑफ हायर एज्युकेशन' (एआयएसएचई) हा अहवाल केंद्रीय शिक्षण मंत्रालयाकडून जाहीर केला जातो. या अहवालातून समाजाच्या विविध घटकांच्या शैक्षणिक स्थितीचे; तसेच उच्च शिक्षणातील स्त्री-पुरुष प्रमाणाचे आणि विविध राज्यांतील शैक्षणिक प्रगतीचे विश्लेषण याद्वारे करता येते.

**■ देशात विद्यापीठे किती?**

देशात ११११३ विद्यापीठे, ४३,७९६ महाविद्यालये, ११,२९६ एकल संस्था आहेत. २०१९-२० या वर्षाच्या तुलनेत २०२०-२१ मध्ये विद्यापीठांची संख्या ७०ने वाढली आहे. १११३पैकी ६५७ विद्यापीठे सरकारी आहेत. त्यांपैकी २३५ केंद्राच्या आणि ४२२ राज्यांच्या आहेत. दहा खासगी विद्यापीठे अभिमत असून, त्यांना सरकारी अनुदान मिळते. ४४६ विद्यापीठे खासगी आहेत. महिला विद्यापीठांची संख्या १७ आहे, तर मुक्त विद्यापीठांची संख्या १६ आहे. ६१५ विद्यापीठे बहुविद्याशाखीत आहेत. तंत्रज्ञान विद्यापीठांची संख्या १८८, कृषी विद्यापीठांची संख्या ६३, वैद्यकीय विद्यापीठांची संख्या ७१, विधी विद्यापीठांची संख्या २६ आहे. संस्कृत भाषेसाठी १९ विद्यापीठे आहेत.

**■ देशात महाविद्यालये किती?**

२०२०-२१ या वर्षात आधीच्या वर्षाच्या तुलनेत १४५३ महाविद्यालयांची भर पडून त्यांची संख्या ४३ हजार ७९६ वर गेली. १८ ते २३ वर्षे या उच्च शिक्षण घेण्यायोग्य वयोगटातील एक लाख लोकसंख्येमागे देशात ३१ महाविद्यालये आहेत. २०१४-१५मध्ये हे प्रमाण २७ होते. एकूण महाविद्यालयांपैकी २१.४% सरकारी, १३.६% खासगी अनुदानित आणि ६५% खासगी महाविद्यालये आहेत. ४३% विद्यापीठे आणि ६१.४% महाविद्यालये ग्रामीण भागात आहेत.

अवलोकन

**■ विद्यार्थ्यांची संख्या किती?**

२०२०-२१ या शैक्षणिक वर्षात ४ कोटी १३ लाख ८० हजार ७१३ विद्यार्थी होते. उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींची संख्या वाढत असली, तरी मुलगे आणि मुली यांचे प्रमाण अद्याप सारखे झालेले नाही. मुलग्यांचे प्रमाण ५१.३%, तर मुलींचे प्रमाण ४८.०७% आहे. २०१९-२० या वर्षाच्या तुलनेत विद्यार्थिसंख्येत ७.४ टक्क्यांनी वाढ झाली. त्या आधीच्या वर्षी हे प्रमाण ३% होते. २०१४-१५ या वर्षाच्या तुलनेत विद्यार्थिसंख्येतील वाढ २०.९% आहे. ४.१३ कोटी विद्यार्थ्यांत १४.२% अनुसूचित जातीचे, ५.८% अनुसूचित जमातीचे, तर ३५.८% इतर मागासवर्गीय आहेत. या तिन्ही प्रवर्गातील विद्यार्थिसंख्येतील वाढ २०१४-१५च्या तुलनेत अनुक्रमे २७.९६%, ४७% आणि ३१.६७% आहे. या वयोगटाच्या २०११च्या एकूण लोकसंख्येच्या तुलनेत २०२०-२१मध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण (जीईआर) २७.३ होते. या आधीच्या वर्षीच्या प्रमाणाच्या (२५.६) तुलनेत त्यात १.७ने वाढ झाली असून, ती आतापर्यंतची सर्वांत मोठी वाढ आहे. मुलगे आणि मुली यांच्यासाठी ते अनुक्रमे २६.७ आणि २७.९ होते.

सरकारी विद्यापीठांचे प्रमाण ५१.१% असले, तरी त्यांत ७३.१% विद्यार्थी शिकतात. खासगी विद्यापीठे ४०% असली, तरी तिथे एकूण विद्यार्थ्यांपैकी २६.३% विद्यार्थी आहेत. खासगी विद्यापीठांचे शुल्क वसामान्यांना परवडणारे नसल्याने तेथील विद्यार्थ्यांचे प्रमाण कमी आहे. कला शाखेतील विद्यार्थिसंख्या सर्वाधिक (३३.५%) असून, त्याखालोखाल विज्ञान (१५.५%), वाणिज्य (१३.९%), अभियांत्रिकी (११.९%) आहेत.

**■ महाराष्ट्राचे स्थान काय?**

विद्यार्थी संख्येनुसार महाराष्ट्र दुसऱ्या स्थानावर आहे. (१०.९८% विद्यार्थी). उत्तर प्रदेश (१६.०७%) प्रथम स्थानी आहे. बेंगळुरूमध्ये सर्वाधिक म्हणजे १०५८ शिक्षणसंस्था आहेत. जयपूर (६७१) दुसऱ्या स्थानावर, तर पुणे (४८८) तिसऱ्या स्थानावर आहे. ३१८ संस्था असलेले नागपूर आठव्या स्थानी आहे.

Shridhar.loni@timesgroup.com

Maharashtra Times 6.2.2023

## *News Paper Clippings During February 2023*

### *Section: Education*

# स्वायत्त महाविद्यालये बंधनातून मुक्त

## नव्या कोर्ससाठी विद्यापीठाच्या परवानगीची गरज नाही

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न स्वायत्त महाविद्यालयांना यापुढे नवा अभ्यासक्रम सुरू करण्यास विद्यापीठाची परवानगी घ्यावी लागणार नाही. दोनपेक्षा अधिक अभ्यासक्रम सुरू करण्यास बंधन राहणार नाही, असे विद्यापीठ प्रशासनाने स्वायत्त महाविद्यालयांसाठी नियामावली प्रसिद्ध करून स्पष्ट केले आहे.

### शुल्क वाढणार?

अभ्यासक्रमांचे शुल्क ठरवण्याचे अधिकार महाविद्यालयांनाच देण्यात आले असून, सध्याच्या परीक्षा शुल्कात दोन वर्षांतून एकदा दहा टक्के शुल्कवाढ करता येणार आहे. त्यामुळे आगामी काळात स्वायत्त महाविद्यालयांच्या शुल्कात वाढ होण्याची शक्यता आहे. ही वाढ अवाजवी असल्यास, त्याचा मोठा आर्थिक फटका विद्यार्थ्यांना बसणार असल्याचे चित्र आहे. शिष्यवृत्तीसाठीचे प्रस्ताव महाविद्यालयांनी सादर करायचे आहेत. पीएचडी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया विद्यापीठाच्या नियमांनुसार करणे आवश्यक राहणार आहे. स्वायत्त महाविद्यालयांनी परीक्षा शुल्कातून १० टक्के रक्कम विद्यापीठाला द्यायची आहे, असेही नियमावलीत नमूद आहे.

**■ तक्रारीनंतर समितीची नियुक्ती**

पुणे विद्यापीठाने दोन वर्षांपूर्वी स्वायत्त महाविद्यालयांसाठी मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध केल्या होत्या. मात्र, या सूचना नसून, बंधन स्वायत्त महाविद्यालयांवर घातल्याची तक्रार सातत्याने प्राध्यापक आणि प्राचार्यांकडून करण्यात येत होती. अभ्यासक्रम सुरू करण्यापूर्वी विद्यापीठाची मान्यता, १५ टक्के परीक्षा शुल्क विद्यापीठाला देणे, एका वेळी दोनपेक्षा अधिक अभ्यासक्रम किंवा तुकड्या सुरू करू नयेत, अशी बंधने स्वायत्त महाविद्यालयांवर घालण्यात आली होती. या मुद्द्यांना भरपूर विरोध झाल्यानंतर, विद्यापीठाकडून स्वायत्त महाविद्यालयांसदर्भात समिती नियुक्त करण्यात आली. त्यानंतर आता सुधारित मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत.

**■ दोनपेक्षा अधिक तुकड्यांना मुभा**

स्वायत्त महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांची समकक्षता विद्यापीठाकडून दिली जात होती. आता स्वायत्त महाविद्यालयांसाठी 'परमनंट रजिस्ट्रेशन नंबर'ही (पीआरएन) दिला जाणार आहे. त्याचा उपयोग 'ॲकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट'च्या अंमलबजावणीसाठी करता येईल. स्वायत्त महाविद्यालयांना एकाच वेळी एका विद्याशाखेत दोनपेक्षा अधिक अभ्यासक्रम किंवा तुकड्या सुरू करण्यास मुभा राहणार आहे.

**■ ३१ मार्चपर्यंत मसुदा हवा**

स्वायत्त महाविद्यालयांनी नवीन अभ्यासक्रम सुरू करताना, त्याचा मसुदा संबंधित शैक्षणिक वर्षाच्या ३१ मार्चपर्यंत विद्यापीठाकडे पाठविणे आवश्यक आहे. विद्यापीठाकडून संबंधित अभ्यासक्रमांना त्या शैक्षणिक वर्षाच्या ३१ मेपर्यंत प्रमाणित करण्यात येणार असून, त्यासाठी अभ्यास मंडळाच्या अध्यक्षांना निमंत्रित करण्यात येईल.

## *News Paper Clippings During February 2023*

## *Section: Education*

# शिक्षण क्षेत्राला हवे भक्कम अर्थबळ

**समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत गुणवत्तापूर्ण शैक्षणिक सुविधा पोहोचल्याशिवाय विकासाची गाडी गतिमान होणार नाही. भारताकडे उपलब्ध असलेल्या मानवी भांडवलाचा पुरेपूर वापर करण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरणात तरतूदही आहे. मात्र, निधीची उपलब्धता हा कळीचा मुद्दा आहे.**

▸ डॉ. अशोक कुडले



देशाचा औद्योगिक, कृषी आणि एकूणच आर्थिक विकास भांडवल व अद्ययावत तंत्रज्ञानाबरोबरच कामगारांच्या दर्जावर (कार्यक्षमता व उत्पादकता) अवलंबून असतो. कामगारांची उत्पादकता व कार्यक्षमता प्रामुख्याने त्यांना मिळणाऱ्या शिक्षणावर अवलंबून असते. याला 'मानवी भांडवल' म्हणजेच 'लोकांनी प्राप्त केलेले ज्ञान आणि हे ज्ञान परिणामकारकपणे वापरण्याची लोकांची क्षमता' असे म्हणता येईल. देशाच्या मूलभूत विकासासाठी 'शिक्षण' अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. सुशिक्षित व प्रशिक्षित मनुष्यबळ देशाच्या आर्थिक विकासाचा वेग वाढविण्यासाठी बहुमूल्य योगदान देऊ शकते.

भारताच्या राष्ट्रीय सर्वेक्षण अहवालानुसार साक्षरता दर ७७.७ टक्के आहे, जो १९५१मध्ये केवळ १८.३ टक्के होता. ही आकडेवारी भारताने गेल्या बहात्तर वर्षांत शिक्षणक्षेत्रामध्ये केलेली नेत्रदीपक प्रगती दर्शवते. तथापि, लोकसंख्येच्या प्रमाणात पाहिल्यास १९५१मध्ये २९.१६ कोटी लोकसंख्या निरक्षर होती; आज ३१ कोटींपेक्षा अधिक लोक निरक्षर आहेत. म्हणजेच साक्षरता दर वाढला तरी वाढलेल्या लोकसंख्येत निरक्षरांची संख्या फारच मोठी आहे. या विशाल जनसमुदायाला साक्षर करण्याचे शिवधनुष्य पेलायचे आहे. शिक्षणक्षेत्र सर्वसाधारणपणे प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय स्तरांवर विभागलेले आहे. प्रत्येक स्तरावर काही ना काही समस्या, आव्हाने आहेत. जसे इमारत, जागा, शैक्षणिक साहित्य इत्यादी मूलभूत सुविधांचा अभाव. भारतीय भाषांकडे दुर्लक्ष, व्यापक ज्ञानाधारित व कौशल्याधारित शिक्षणाचा अभाव जाणवतो. औद्योगिक व सेवा क्षेत्राला अपेक्षित कौशल्य शिक्षण व शैक्षणिक संस्थांमध्ये दिले जाणारे शिक्षण यात तफावत जाणवते. सर्वसामान्यांसाठी महाग झालेले शिक्षण, आर्थिक निधीची कमतरता इत्यादी.

## उच्च शिक्षणाला निधीची गरज

केंद्र सरकारने मोफत शिक्षण हक्क कायदा-२००९ अन्वये सहा ते चौदा वयोगटातील मुलांसाठी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले असले तरी मूलभूत सुविधांच्या अभावाबरोबरच अपुरा शिक्षकवर्ग व कार्यरत शिक्षकांच्या तुटपुंज्या वेतनामुळे शिक्षकी पेशा स्वीकारण्यातील तरुण पिढीचा निरुत्साह यामुळे हे उद्दिष्ट साध्य करण्यात अडचणी येत आहेत. कारण प्रमुख समस्या आहे ती आर्थिक पाठबळाची. 'युनिसेफ' आणि 'यूडीआयएसई'च्या आकडेवारीनुसार २०२२मध्ये देशातील शाळांची एकूण संख्या १५.९ लाख आहे. यात १०.३२लाख सरकारी अनुदानित असून, उर्वरित खासगी अनुदानित व विनाअनुदानित शाळा आहेत. यापैकी जवळपास साडेबारा लाख ग्रामीण, तर अडीच लाख शाळा शहरांमध्ये आहेत. देशातील एकूण शिक्षक ९७ लाख आहेत. तथापि, 'युनेस्को'च्या अहवालानुसार २०२०मध्ये भारतात शिक्षकांच्या अकरा लाखपेक्षा अधिक जागा रिक्त होत्या. यात महाराष्ट्रातील चौऱ्याहत्तर हजार जागांचा समावेश आहे. ग्रामीण भागात शिक्षकांचा मोठा तुटवडा आहे. देशात एक लाखापेक्षा अधिक एकशिक्षकी शाळा असून यातील ८९ टक्के ग्रामीण भागात आहेत. अरुणाचल प्रदेश, तेलंगण, झारखंड, उत्तराखंड, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, राजस्थान आणि गोवा या राज्यांमध्ये याचे प्रमाण सर्वाधिक आहे. देशातील शिक्षक-विद्यार्थी सरासरी प्रमाण समाधानकारक असले तरी 'युनेस्को'चा 'स्टेट ऑफ द एज्युकेशन रिपोर्ट फॉर इंडिया २०२०'या अहवालानुसार भारतातील सरकारी व खासगी शाळांतील ४२ टक्के शिक्षक कामाच्या कराराविना आणि सरासरी दहा हजार रुपये मासिक वेतनावर काम करतात. खासगी शाळांमध्ये हे प्रमाण ६७टक्के आहे. शहरांपेक्षा ग्रामीण भागातील ही समस्या तीव्र आहे.

उच्च शिक्षणाची स्थिती याहून वेगळी नाही. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या अहवालानुसार देशातील केंद्रीय विद्यापीठे, आयआयटी आणि आयआयएममध्ये अकरा हजारावर शिक्षकांच्या (सहाय्यक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व प्राध्यापक) जागा रिक्त आहेत. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) अहवालानुसार देशात एक हजार ७० विद्यापीठे आहेत. तर स्टॅटिस्टा आकडेवारीनुसार महाविद्यालये आणि संस्थांची संख्या अनुक्रमे ४२ व ११ हजारापेक्षा अधिक आहे. केंद्रीय विद्यापीठांतील शिक्षकांच्या जागांची उपरोक्त स्थिती पाहता उर्वरित विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये या संदर्भात काय अवस्था असेल याची कल्पना येऊ शकते. शिक्षकांच्या मोठ्या प्रमाणातील कमतरतेमुळे शिक्षणाचा दर्जा खालावतो आहे. त्यामुळे भारतात शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक गरजेची आहे.

## शिक्षणातील गुंतवणुकीचे वास्तव

शिक्षण क्षेत्रामध्ये चीनने केलेल्या मोठ्या प्रमाणातील गुंतवणुकीने चीनच्या राष्ट्रीय विकासाचा पाया घातला गेला. १९५०मध्ये चीनमध्ये बालवाडी, शाळांची संख्या जेमतेम होती. चिनी सरकारने ग्रामीण भागातील शाळांना आर्थिक सहाय्याबरोबरच गरीब विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसह मोठी आर्थिक मदत दिली. सात दशकांमध्ये देशभर ग्रामीण आणि आर्थिक दुर्बल लोकांच्या शिक्षणावर भर दिल्याने चीनचा साक्षरता दर ९९.८३ टक्क्यांवर पोहोचला. तीन ट्रिलीयन डॉलरची अर्थव्यवस्था असलेल्या भारताचा २०२२-२३ आर्थिक वर्षासाठीच्या केंद्रीय अर्थसंकल्पात सुमारे एक लाख कोटी रुपयांची तरतूद शालेय व उच्च शिक्षणासाठी केंद्र सरकारने केली आहे. तथापि, अमेरिकेने शालेय शिक्षणावर ७६४ आणि उच्च शिक्षणावर ६५१ अब्ज डॉलर तर चीनने ८३१ अब्ज डॉलर शिक्षणावर खर्च केले आहेत. भारताची लोकसंख्या अमेरिकेच्या जवळपास पाचपट आहे, मात्र शिक्षण क्षेत्रातील गुंतवणूक अमेरिकेच्या केवळ सात आणि चीनच्या अकरा टक्के आहे. या भरीव गुंतवणुकीमुळे शालेय व उच्च शिक्षणाची पाळेमुळे या दोन्ही देशांमध्ये खोलवर रुजली आहेत. त्याचे प्रतिबिंब राष्ट्रीय विकासामध्ये उमटत आहे. भारतामध्ये शिक्षणाचा प्रसार खेडोपाडी व दुर्गम भागातील सर्व सामाजिक स्तरांमध्ये होण्यासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक गुंतवणुकीची आवश्यकता आहे. नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत शिक्षण क्षेत्रासाठी निर्धारित उद्दिष्टे, जसे- सर्वांना शिक्षण, शैक्षणिक समानता, दर्जा, सर्वसामान्यांना परवडणारे दर्जेदार शिक्षण आणि शैक्षणिक जबाबदारी गाठण्यासाठी आणि त्यायोगे मेक इन इंडिया, डिजीटल इंडिया, आत्मनिर्भर भारत, जागतिक उत्पादक, निर्यातोन्मुख व्यापार, वेगवान अर्थव्यवस्था यांसारखी उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सध्याची गुंतवणूक तुटपुंजी आहे. यात मोठी वाढ आवश्यक आहे.

**(लेखक सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)**

Sakaal 7.2.2023

## *News Paper Clippings During February 2023*

### *Section: Education*

लोकमत

# विद्यार्थ्यांच्या शिल्लक अनामत रकमेचा हिशेब द्या

## सहसंचालकांचे अकृषी विद्यापीठांच्या कुलसचिवांना आदेश

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : प्रवेशावेळी विद्यार्थ्यांकडून घेतलेल्या तसेच शिल्लक अनामत रक्कमेचा हिशेब विनाअनुदानित महाविद्यालयांना द्यावा लागणार आहे. राज्यातील अकृषी विद्यापीठांच्या कुलसचिवांनी संलग्नविना अनुदानित महाविद्यालयाकडे असलेल्या शिल्लक अनामत रकमेची माहिती पुढील दोन आठवड्यांत उच्चशिक्षण संचनालयाकडे सादर करावी, असे आदेश सहसंचालक डॉ. प्रकाश बच्छाव यांनी दिले आहेत.

### ईबीसी विद्यार्थ्यांसाठी रक्कम खर्च करा

राज्यातील अनेक महाविद्यालयांनी शिल्लक अनामत रक्कमेचा तपशील वेतन देयक सादर करताना केला नाही. या अनामत रकमेतील भ्रष्टाचार रोखणे तसेच अनामत रक्कमेच्या ३० टक्के रक्कम इबीसी विद्यार्थ्यांसाठी खर्च करण्याबाबतचे परिपत्रक काढावे आणि त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी.

\- अमर एकाड, कॉप्स विद्यार्थी संघटना

### राज्यात तीन हजार विनाअनुदानित महाविद्यालय

राज्यात २८ शासकीय, १ हजार १७८ अनुदानित तर तब्बल ३ हजार १४० विनाअनुदानित महाविद्यालये आहेत. त्यातील ३ हजार १४० विनाअनुदानित महाविद्यालयांसाठी हा आदेश लागू असणार आहे.

उच्चशिक्षण विभागाच्या कार्यकक्षेतील विद्यापीठांशी संलग्न कला, विज्ञान, वाणिज्य विधी व शिक्षणशास्त्र या अभ्यासक्रमांशी संबंधित महाविद्यालये प्रवेश घेताना विद्यार्थ्यांकडून अनामत रक्कम घेतात. उच्चशिक्षण विभागातील शासकीय व अनुदानित महाविद्यालयात विद्यार्थ्यांची ४५ कोटी अनामत रक्कम पडून आहे. तसेच उच्चशिक्षण विभागाच्या सहसंचालकांच्या परवानगीविनाच काही महाविद्यालयांनी शिल्लक अनामत रक्कम परस्पर खर्च केल्याचे उघडकीस आले होते. राज्यातील विनाअनुदानित महाविद्यालयातील शिल्लक अनामत रक्कम व त्याचा विनियोग कसा करावा? याबाबत शासनाने निर्णय घ्यावा मागणी कॉप्स विद्यार्थी संघटनेने केली होती.

दरम्यान, कुलसचिवांनी संलग्न अशासकीय विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालयांकडे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ अखेरपर्यंत शिल्लक असलेल्या अनामत रकमेची माहिती संकलित करून दि. २० फेब्रुवारी पर्यंत उच्चशिक्षण संचनालयाच्या ईमेलवर सादर करावी, असे सादर करण्यास सांगितले आहे.

Hello Pune
Page No. 2 Feb 07, 2023
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During February 2023*

## *Section: Education*

सकाळ

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे सुधारित नियमावली

# स्वायत्त महाविद्यालयांसाठी 'पीआरएन' तयार होणार

**पुणे, ता. ७ : स्वायत्त महाविद्यालयांसाठी 'पर्मनन्ट रजिस्ट्रेशन नंबर' म्हणजेच 'पीआरएन' क्रमांक हा पात्रता क्रमांकासोबत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून तयार करण्यात येईल. त्याचा उपयोग स्वायत्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना ॲकॅडमिक बॅंक ऑफ क्रेडिटसाठी होऊ शकणार आहे. विद्यापीठाने स्वायत्त महाविद्यालयासाठी प्रसिद्ध केलेल्या सुधारित नियमावलीत हे स्पष्ट केले आहे.**

स्वायत्त महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त संस्थांच्या समस्या व अडचणी लक्षात घेऊन प्रशासनाच्या सुकरतेसाठी मार्गदर्शक नियमावली तयार करण्यात आली होती. त्यानुसार अंमलबजावणी करताना काही स्वायत्त महाविद्यालयांना अडचणी येत असल्याचे दिसून आले.

दरम्यान, संबंधित महाविद्यालयांनी काही बदल सुचविले. या बदलांचा कुलगुरूंनी स्वीकार करून स्वायत्त महाविद्यालयांसाठी सुधारित मार्गदर्शक तत्त्वे प्रसिद्ध केल्याचे विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी परिपत्रकाद्वारे सांगितले.

### नव्या अभ्यासक्रमाबाबत...

- ✓ महाविद्यालयांनी नव्या अभ्यासक्रमांचा मसुदा ३१ मार्चपर्यंत विद्यापीठाकडे पाठवणे
- ✓ विद्यापीठाने अभ्यासक्रम ३१ मेपर्यंत प्रमाणित करून महाविद्यालयांना कळवणे
- ✓ नव्या अभ्यासक्रमाचे प्रस्ताव संबंधित अभ्यास मंडळाच्या सभेमध्ये ठेवले जातील
- ✓ महाविद्यालय अभ्यास मंडळाच्या अध्यक्षांना विशेष निमंत्रित म्हणून आमंत्रित केले जाईल

### परिपत्रकात काय नमूद?

स्वायत्त महाविद्यालयांना एकाच विद्याशाखेत दोनपेक्षा अधिक अभ्यासक्रम किंवा तुकड्या करण्यावर कोणतेही बंधन नाही, परंतु भौतिक सुविधा व आवश्यक मानव संसाधन यांची पूर्तता पाहून या महाविद्यालयांनी नवीन अभ्यासक्रम, तुकड्या सुरू कराव्यात, असे विद्यापीठाने परिपत्रकात नमूद केले आहे.

### 'स्वायत्त'साठीची मार्गदर्शक तत्त्वे

- पीएच.डी.ची प्रवेश प्रक्रिया विद्यापीठाच्या नियमावलीनुसार
- महाविद्यालयांनी परीक्षा शुल्कामधून १० टक्के रक्कम विद्यापीठाला द्यावी
- परीक्षा शुल्कात दोन वर्षांतून एकदा १० टक्के वाढीची परवानगी



"स्वायत्त महाविद्यालयांसाठी सुधारित नियमावली विद्यापीठाने जाहीर केली असली, तरीही त्यात फारसे बदल करण्यात आलेले नाहीत. त्यात केवळ स्वायत्त महाविद्यालयांना 'पीआरएन' देण्यात येणार असल्याचा महत्त्वपूर्ण बदल केला आहे. त्यामुळे भविष्यात विद्यार्थ्यांना 'पीआरएन'चा उपयोग ॲकॅडमिक बॅंक ऑफ क्रेडिटसाठी होणार आहे.

**- डॉ. गोविंद कुलकर्णी,**
संचालक, पिंपरी-चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग

Pune, Main
08/02/2023 Page No. 2

# *News Paper Clippings During February 2023*

## *Section: Education*

सकाळ

दोन वर्षांपासून विषय प्रलंबित; शासकीय, अनुदानित महाविद्यालयांमधील स्थिती

### तासिका तत्त्वावरील अध्यापक मानधनाविना

**पुणे, ता. ७ :** शासकीय व अनुदानित महाविद्यालयांमध्ये तासिका तत्त्वावर काम करणाऱ्या आम्हा अध्यापकांचे मानधन दोन वर्षांपासून प्रलंबित आहे. त्यामुळे आर्थिक कोंडी झाली असून, प्रलंबित मानधन केव्हा मिळेल याकडे डोळे लागले आहेत. आमच्यापैकी अनेकांनी प्रतीक्षेला कंटाळून रामराम केला आहे, असे अनेक अध्यापक सांगतात.

उच्च शिक्षण संचालनालयाच्या आधिपत्याखाली या महाविद्यालयातील विविध पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी तासिका तत्त्वावरील अध्यापकांची नियुक्ती केली आहे. पूर्वी त्यांना तीन किंवा चार महिन्यांनी मानधन मिळत होते. आता २०२२ पासून वर्षभर मानधन न मिळालेले नाही. लाखो रुपयांचे मानधन शासनाकडे थकीत आहे. मानधनावरच कुटुंब किंवा पुढील शिक्षण सुरू राहील, अशी स्थिती अनेकांची आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारितील उच्च शिक्षण संचालनालयाच्या आधिपत्याखाली पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी सैद्धांतिक, प्रात्यक्षिक आदी कामांसाठी संदर्भाधीन शासन निर्णयान्वये तासिका तत्त्वावरील अध्यापकांचे मानधनाचे दर निश्चित केले आहेत. या मानधनात शासन निर्णयान्वये आता वाढ केलेली आहे.

| अभ्यासाचा प्रकार सैद्धान्तिक प्रतितास दर | प्रात्यक्षिक दर |
|---|---|
| कला, वाणिज्य, विज्ञान (पदवी) | ६२५/२५० |
| कला, वाणिज्य, विज्ञान (पदव्युत्तर) | ७५०/३०० |
| शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षण (पदवी/पदव्युत्तर व्यावसायिक अभ्यासक्रम) | ७५०/३०० |
| विधी (पदवी/ पदव्युत्तर व्यावसायिक अभ्यासक्रम) | ७५०/३०० |

“ मानधन गेल्या दोन वर्षांपासून अदा करण्यात आले नाही. तरी तासिका तत्त्वावरील अध्यापकांचे प्रलंबित मानधन तत्काळ अदा करण्याची मागणी आम्ही करत आहोत.
- **अमर एकाड,** अध्यक्ष, कॉप्स विद्यार्थी संघटना

“ मी चार वर्षांपासून मानधनावर काम करत आहे. गेले वर्षभर मला आणि माझ्या सहकाऱ्यांना मानधन मिळालेले नाही. सुमारे एक लाखाहून अधिक रक्कम आम्हाला अद्याप मिळाली नाही.
- **भारती काळे,** अध्यापक

“ अशासकीय अनुदानित महाविद्यालये, अकृषिक विद्यापीठे, अभिमत विद्यापीठांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे २०२२-२३मधील थकीत वेतन अनुदान प्रस्ताव सादर करण्याच्या महाविद्यालयांना सूचना दिल्या आहेत. थकीत वेतनाची छाननी केल्यावर वितरण करण्यात येईल.
- **शैलेंद्र देवळाणकर,**
प्रभारी शिक्षण संचालक, उच्च शिक्षण

Pune, Pune-Today
08/02/2023 Page No. 4

### पदव्युत्तर कोर्स २० टक्के ऑनलाइन

**पुणे विद्यापीठाचा निर्णय**

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना २० टक्के अभ्यासक्रम ऑनलाइन माध्यमातून पूर्ण करण्याची मुभा मिळणार आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने पुढील शैक्षणिक वर्षापासून ही मुभा देण्याचा निर्णय घेतला आहे.

या ऑनलाइन अभ्यासक्रमाच्या माध्यमातून वैकल्पिक किंवा अधिक श्रेयांकासाठीचे शिक्षण पूर्ण करता येणार आहेत. पदवी अभ्यासक्रमांना हा निर्णय २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्यात येईल, असेही विद्यापीठाने स्पष्ट केले आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) मार्गदर्शक सूचनांनुसार मूक्स किंवा स्वयम ऑनलाइन अभ्यासक्रम विद्यापीठातील शैक्षणिक विभाग आणि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना लागू करण्यासाठी प्र-कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे यांची समिती नेमली होती. या समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी व त्यासंदर्भातील रूपरेषा ठरवण्यासाठी डॉ. मनोहर चासकर यांच्या समितीने सादर केलेल्या अहवालाला मान्यता देण्यात आली. पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक विभाग, संलग्न महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त संस्थांमधील पदव्युत्तर अभ्यासक्रमांना २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासून ऑनलाइन अभ्यासक्रम पूर्ण करण्याची मुभा देण्यात आली आहे.

**‘ऑनलाइन’ची कार्यप्रणाली**

- ऑनलाइन अभ्यासक्रमांसाठी गुणवत्तेवर आधारित मान्यता देण्यासाठीची यंत्रणा विषय आणि विद्याशाखानिहाय स्थापन करावी लागेल.
- अभ्यासक्रमांची माहिती देण्यासाठी प्रवेश प्रक्रियेनंतर १० दिवसांत कार्यशाळा घ्यावी.
- विद्यापीठातील विभाग आणि महाविद्यालयात समन्वयकाची नेमणूक करावी.
- विद्यार्थ्यांनी विषय निवडण्यापूर्वी समन्वयकाने विद्यार्थ्यांना संपूर्ण माहिती देणे आवश्यक आहे.
- विद्यार्थ्याने निवडलेल्या विषयांची माहिती, नियोजन, परीक्षा आणि पदव्युत्तर प्रवेश विभागाला कळवावीत.

**चौकट**



ऑनलाइन अभ्यासक्रमाचे शिक्षण घेतल्यानंतर परीक्षा विभागाला त्यांच्या निकालाच्या संगणक प्रणालीमध्ये योग्य ते बदल करावे लागणार आहे. या विद्यार्थ्यांना श्रेयांकवर आधारित शुल्क पद्धतीमध्ये सवलत देण्याचा विचार करावा, असे नमूद करण्यात आले आहे. कोणता विषय कोणत्या विषयाशी समकक्ष आहे, याबाबतचा अभ्यास मंडळाने निर्णय घ्यावा, असेही विद्यापीठाच्या नियमावलीत सांगितले आहे.

Maharashtra Times 8.2.2023

# *News Paper Clippings During February 2023*

## *Section: Education*

पुढारी

# स्वायत्त महाविद्यालये बंधमुक्त

## विद्यापीठाच्या परवानगीशिवाय अभ्यासक्रम सुरू करता येणार

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने स्वायत्त महाविद्यालयांसाठी सुधारित नियमावली प्रसिद्ध केली आहे. त्यानुसार आता स्वायत्त महाविद्यालयांना नवा अभ्यासक्रम सुरू करण्यास विद्यापीठाची परवानगी आवश्यक नसल्याचे, दोनपेक्षा अधिक अभ्यासक्रम सुरू करण्यास बंधन नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच, अभ्यासक्रमांचे शुल्क ठरविण्याचे अधिकार महाविद्यालयांनाच देण्यात आले असून, सध्याच्या परीक्षा शुल्कात दोन वर्षांतून एकदा दहा टक्के शुल्कवाढ करता येणार आहे.**

विद्यापीठाने दोन वर्षांपूर्वी स्वायत्त महाविद्यालयांसाठी मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध केल्या होत्या. मात्र, अभ्यासक्रम सुरू करण्यापूर्वी विद्यापीठाची मान्यता, १५ टक्के परीक्षा शुल्क विद्यापीठाला देणे, एकावेळी दोनपेक्षा अधिक अभ्यासक्रम किंवा तुकड्या सुरू करू नयेत आदी बंधने स्वायत्त महाविद्यालयांवर घालण्यात आली होती. त्यामुळे स्वायत्त महाविद्यालयांनी या मार्गदर्शक सूचनांना विरोध केला होता. त्यामुळे विद्यापीठाकडून स्वायत्त महाविद्यालयांसंदर्भात समिती नियुक्त करण्यात आली.



अभ्यासक्रमांचे शुल्क ठरविण्याचे अधिकार महाविद्यालयांनाच

त्यानंतर आता सुधारित मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत.

विद्यापीठाने प्रसिद्ध केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार स्वायत्त महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांची समकक्षता विद्यापीठाकडून दिली जात होती. आता त्यासोबत स्वायत्त संस्थांसाठी पीआरएन म्हणजेच परमनंट रजिस्ट्रेशन नंबरही दिला जाणार आहे. त्याचा उपयोग ॲकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिटच्या अंमलबजावणीसाठी होणार आहे. यापूर्वीच्या नियमावलीत अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी मर्यादा होत्या. आता स्वायत्त संस्थांना एकाच वेळी एका विद्याशाखेत दोनपेक्षा अधिक अभ्यासक्रम अथवा तुकड्या सुरू करण्यास मुभा आहे. मात्र, त्यासाठी भौतिक सुविधा व आवश्यक मनुष्यबळाची पूर्तता करण्याची अट आहे. स्वायत्त महाविद्यालयांनी नवीन अभ्यासक्रम सुरू करताना त्याचा मसुदा त्या त्या शैक्षणिक वर्षाच्या ३१ मार्चपर्यंत विद्यापीठाकडे पाठविणे आवश्यक आहे. अभ्यासक्रमासह प्रवेशक्षमता, प्रश्नपत्रिका, परीक्षेचे स्वरूप, गुणांकन, श्रेयांक आदी तपशीलही द्यायचे आहे. विद्यापीठाकडून संबंधित अभ्यासक्रमांना त्या शैक्षणिक वर्षाच्या ३१ मेपर्यंत प्रमाणित करण्यात येईल. त्यासाठी अभ्यास मंडळाच्या अध्यक्षांना निमंत्रित करण्यात येईल, असे नमूद करण्यात आले आहे.

अभ्यासक्रमासाठीचे शुल्क स्वायत्त महाविद्यालयांना त्यांच्या स्तरावर ठरविण्याची मुभा आहे. तसेच, शिष्यवृत्तीसाठीचे प्रस्ताव महाविद्यालयांनी शासनाकडे सादर करायचे आहेत. पीएच. डी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया विद्यापीठाच्या नियमांनुसार करणे आवश्यक आहे. स्वायत्त महाविद्यालयांनी परीक्षा शुल्कातून १० टक्के रक्कम विद्यापीठाला द्यायची आहे. दोन वर्षांतून एकदा दहा टक्के परीक्षा शुल्कात वाढ करता येईल, असे देखील स्पष्ट करण्यात आले आहे.

My Pune Edition
Feb 8, 2023 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

# Colleges must send report on unclaimed deposits by Feb 20

SwatiShindeGole
@timesgroup.com

**Pune:** The higher and technical education department has directed all senior colleges in Maharashtra to send a report of the unclaimed deposit amount paid by students at the time of admission by February 20.

TOI had reported that Rs 45 crore of deposit money was lying with aided senior colleges in Maharashtra. Following this report, the education department has acted and over 3,000 unaided colleges will have to send their status of the amounts with them.

Joint director of the higher and technical education department Prakash Bacchav issued an order on February 6 which stated: "All commerce, science, arts, law and other colleges affiliated to the universities are approved by the state government to collect deposit money at the time of admission. But later, either students forget to take their refund or colleges do not voluntarily give back the money. As a result, colleges are sitting on huge amounts of such unclaimed deposits. All such colleges have to submit a report of unclaimed money up to the academic year 2021-22 to the education department by February 20."

Aided colleges keep ₹45 crore in unclaimed deposit refunds




A refundable deposit collected from students at the time of admission in aided senior colleges has accumulated or remained unclaimed to the tune of Rs 45 crore, a Right to Information query by Care for Public Safety, a students' union in the city revealed.

The deposit ranges from Rs 5,000 and above per student. There are 28 government colleges, 1,178 aided colleges, 3,140 unaided colleges.

The Times of India 8.2.2023

# News Paper Clippings During February 2023

## Section: Education

सकाळ

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे सुधारित नियमावली

# स्वायत्त महाविद्यालयांसाठी 'पीआरएन' तयार होणार

**पुणे, ता. ७ : स्वायत्त महाविद्यालयांसाठी 'पर्मनन्ट रजिस्ट्रेशन नंबर' म्हणजेच 'पीआरएन' क्रमांक हा पात्रता क्रमांकासोबत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून तयार करण्यात येईल. त्याचा उपयोग स्वायत्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना ॲकॅडमिक बँक ऑफ क्रेडिटसाठी होऊ शकणार आहे. विद्यापीठाने स्वायत्त महाविद्यालयासाठी प्रसिद्ध केलेल्या सुधारित नियमावलीत हे स्पष्ट केले आहे.**

स्वायत्त महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त संस्थांच्या समस्या व अडचणी लक्षात घेऊन प्रशासनाच्या सुकरतेसाठी मार्गदर्शक नियमावली तयार करण्यात आली होती. त्यानुसार अंमलबजावणी करताना काही स्वायत्त महाविद्यालयांना अडचणी येत असल्याचे दिसून आले.

दरम्यान, संबंधित महाविद्यालयांनी काही बदल सुचविले. या बदलांचा कुलगुरूंनी स्वीकार करून स्वायत्त महाविद्यालयांसाठी सुधारित मार्गदर्शक तत्त्वे प्रसिद्ध केल्याचे विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी परिपत्रकाद्वारे सांगितले.

### 'स्वायत्त'साठीची मार्गदर्शक तत्त्वे

- पीएच.डी.ची प्रवेश प्रक्रिया विद्यापीठाच्या नियमावलीनुसार
- महाविद्यालयांनी परीक्षा शुल्कामधून १० टक्के रक्कम विद्यापीठाला द्यावी
- परीक्षा शुल्कात दोन वर्षातून एकदा १० टक्के वाढीची परवानगी

### नव्या अभ्यासक्रमाबाबत...

- ✓ महाविद्यालयांनी नव्या अभ्यासक्रमांचा मसुदा ३१ मार्चपर्यंत विद्यापीठाकडे पाठवणे
- ✓ विद्यापीठाने अभ्यासक्रम ३१ मेपर्यंत प्रमाणित करून महाविद्यालयांना कळवणे
- ✓ नव्या अभ्यासक्रमाचे प्रस्ताव संबंधित अभ्यास मंडळाच्या सभेमध्ये ठेवले जातील
- ✓ महाविद्यालय अभ्यास मंडळाच्या अध्यक्षांना विशेष निमंत्रित म्हणून आमंत्रित केले जाईल

### परिपत्रकात काय नमूद?

स्वायत्त महाविद्यालयांना एकाच विद्याशाखेत दोनपेक्षा अधिक अभ्यासक्रम किंवा तुकड्या करण्यावर कोणतेही बंधन नाही, परंतु भौतिक सुविधा व आवश्यक मानव संसाधन यांची पूर्तता पाहून या महाविद्यालयांनी नवीन अभ्यासक्रम, तुकड्या सुरू कराव्यात, असे विद्यापीठाने परिपत्रकात नमूद केले आहे.

"स्वायत्त महाविद्यालयांसाठी सुधारित नियमावली विद्यापीठाने जाहीर केली असली, तरीही त्यात फारसे बदल करण्यात आलेले नाहीत. त्यात केवळ स्वायत्त महाविद्यालयांना 'पीआरएन' देण्यात येणार असल्याचा महत्त्वपूर्ण बदल केला आहे. त्यामुळे भविष्यात विद्यार्थ्यांना 'पीआरएन'चा उपयोग ॲकॅडमिक बँक ऑफ क्रेडिटसाठी होणार आहे.

- डॉ. गोविंद कुलकर्णी,
संचालक, पिंपरी-चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग



Pune, Main
08/02/2023 Page No. 2

# *News Paper Clippings During February 2023*

## *Section: Education*

दहावी, बारावी परीक्षा

# गैरप्रकार रोखण्यासाठी २३८ सूचना

## अंमलबजावणीबाबत लवकरच चर्चा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** राज्य मंडळातर्फे होणाऱ्या दहावी आणि बारावीच्या परीक्षेदरम्यान गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी पालक, शिक्षक, विद्यार्थ्यांकडून विविध २३८ सूचना सुचवण्यात आल्या आहेत. या सूचनांच्या अंमलबजावणीबाबत कार्यकारी परिषदेत चर्चा करून निर्णय घेतला जाणार आहे.

राज्य मंडळातर्फे बारावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते १ मार्च २०२३ या कालावधीत, तर दहावीची परीक्षा २ ते २५ मार्च या कालावधीत होणार आहे. या दोन्ही परीक्षांदरम्यान विद्यार्थ्यांकडून होणारे गैरप्रकार रोखणे राज्य मंडळासाठी आव्हानात्मक असते. मात्र, हे गैरप्रकार रोखण्यासाठी राज्य मंडळाच्या मार्गदर्शनाखाली नऊ विभागीय केंद्रे आपापल्या स्तरावर उपाययोजना आणि उपक्रम राबवतात. या प्रयत्नांमध्ये एकसूत्रता आणण्यासाठी राज्य मंडळाने कृती कार्यक्रम तयार करण्याचे ठरवले. विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांकडून सूचना मागवण्यात आल्या. त्यानुसार राज्य मंडळाकडे २३८ सूचना विविध घटकांकडून देण्यात आल्या आहेत.



राज्य मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी म्हणाले, की राज्यभरातून २३८ सूचना मंडळाला प्राप्त झाल्या आहेत. त्यात परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही लावणे, मोबाइलद्वारे चित्रीकरण करणे अशा तांत्रिक उपायांसह प्रत्येक विद्यार्थ्याला वेगळी प्रश्नपत्रिका, विद्यार्थ्यांचे समुपदेशन, गैरप्रकार केल्यास विद्यार्थ्याला होणारी शिक्षा या बाबत जागृती आदींचा समावेश आहे. प्राप्त सूचनांपैकी काहींची अंमलबजावणी मंडळाने पूर्वीच केली आहे. तर गैरप्रकार केल्यास विद्यार्थ्यांवर होणाऱ्या कारवाईची 'शिक्षा सूची' तयार करून ती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

अन्य सूचनांच्या अनुषंगाने मंडळाच्या कार्यकारी परिषदेत चर्चा करून पुढील निर्णय घेण्यात येणार आहे.

# एमपीएससीच्या तीन परीक्षांचा सुधारित अभ्यासक्रम २०२३ पासून लागू

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे (एमपीएससी) अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा, वनसेवा मुख्य परीक्षा, कृषी सेवा मुख्य परीक्षा या तीन परीक्षांसाठी वर्णनात्मक स्वरुपाचा नवीन अभ्यासक्रम प्रसिद्ध करण्यात आला आहे. हा अभ्यासक्रम २०२३ मध्ये आयोजित परीक्षांपासून लागू केला जाणार आहे.

एमपीएससीने प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली. महाराष्ट्र नागरी सेवा संयुक्त परीक्षेअंतर्गत अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा, वनसेवा मुख्य परीक्षा, कृषी सेवा मुख्य परीक्षा या परीक्षा घेतल्या जातात. या परीक्षांसाठीचे सुधारित अभ्यासक्रम एमपीएससीने प्रसिद्ध केला आहे. त्यात अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षेसाठीचा अभ्यासक्रम आणि वनसेवा मुख्य परीक्षेचा अभ्यासक्रम २४ जानेवारीला, तर कृषी सेवा मुख्य परीक्षेचा अभ्यासक्रम १ फेब्रुवारीला प्रसिद्ध करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी २०२३ मध्ये होणाऱ्या परीक्षांपासून करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

लोकसत्ता Thu, 09 February 2023
https://epaper.loksatta.com/c/71633929

# *News Paper Clippings During February 2023*

## *Section: Education*

# आता पर्यावरण शिक्षण पदवी स्तरावर

## 'यूजीसी'कडून अभ्यासक्रमाचा मसुदा; २२ फेब्रुवारीपर्यंत हरकती नोंदविण्याचे आवाहन

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे** : देशातील उच्च शिक्षण संस्थांमध्ये पदवी स्तरावर आता पर्यावरण शिक्षण अभ्यासक्रम राबवण्यात येणार आहे. पर्यावरणाचे जतन आणि संसाधनाचे संवर्धन करण्यासाठी १७ शाश्वत विकास उद्दिष्टे अधोरेखित करणाऱ्या अभ्यासक्रमाचा मसुदा विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) प्रसिद्ध केला असून, या अभ्यासक्रमावर २२ फेब्रुवारीपर्यंत हरकती सूचना नोंदवता येतील.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मध्ये पर्यावरण शिक्षण हा अभ्यासक्रमाचा अविभाज्य घटक करण्याची, पर्यावरण संवर्धन, शाश्वत विकासाविषयी जागृती आणि संवेदनशीलता निर्माण करण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने यूजीसीकडून अभ्यासक्रमाचा मसुदा तयार करण्यात आला आहे. मानव आणि पर्यावरण, नैसर्गिक साधन संपत्ती आणि शाश्वत विकास, पर्यावरणीय प्रश्न : स्थानिक, प्रादेशिक आणि जागतिक, जैवविविधता आणि परिसंस्थेचे संवर्धन, प्रदूषण आणि आरोग्य, हवामान बदल : परिणाम, रुपांतर आणि प्रतिकार, पर्यावरण व्यवस्थापन, पर्यावरणविषयक करार आणि कायदे अशा घटकांचा या अभ्यासक्रमात समावेश आहे.

एकूण चार श्रेयांकांसाठी हा अभ्यासक्रम राबवला जाईल. वर्गातील १५ तासांसाठी एक श्रेयांक या प्रमाणे अभ्यासक्रमाची रचना असेल. त्यात समाजात जाऊन काम करणे, क्षेत्र भेटी, प्रयोगशाळेतील काम असा प्रात्यक्षिकाचे स्वरूप असेल. तीस तासांच्या प्रात्यक्षिकासाठी एक श्रेयांक दिला जाईल. प्रस्तावित श्रेयांक आणि श्रेयांक वितरणाबाबत उच्च शिक्षण संस्था त्यांच्या स्तरावर निर्णय घेऊ शकतात. सहा ते आठ सत्रांमध्ये श्रेयांक वितरण करता येऊ शकेल. जेणेकरून विद्यार्थ्यांचे किमान श्रेयांक पूर्ण होऊ शकतील, असे यूजीसीने नमूद केले आहे.

### या पूर्वीही अभ्यासक्रम...

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार यूजीसीने २००३ मध्ये पर्यावरणीय अभ्यास या विषयाची सक्तीने अंमलबजावणी करण्यासाठी अभ्यासक्रम प्रसिद्ध केला होता. त्यानंतर २०१७ मध्ये श्रेयांक निवड पद्धतीसाठी पर्यावरणीय अभ्यासाअंतर्गत क्षमतावृद्धी अनिवार्य अभ्यासक्रम आठ घटकांचे प्रारुप तयार केले होते. त्यानंतर आता सर्व विद्याशाखांतील विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रम तयार केल्याचे नमूद करण्यात आले आहे.

लोकसत्ता Thu, 09 February 2023
https://epaper.loksatta.com/c/71634396

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे आजपासून अमृत महोत्सवी वर्ष

## वर्षभरात विविध कार्यक्रमांचे नियोजन

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर ख्याती मिळवलेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे अमृत महोत्सवी वर्ष (७५ वे) शुक्रवारपासून सुरू होत आहे. विविध कार्यक्रम वर्षभर अमृत महोत्सवी वर्ष साजरे केले जाणार आहे.

'ऑक्सफर्ड ऑफ द ईस्ट' अशी ओळख असलेल्या तत्कालीन पुणे विद्यापीठाची स्थापना १० फेब्रुवारी १९४९ रोजी झाली होती. त्यामुळे विद्यापीठ स्थापनेला १० फेब्रुवारी रोजी ७४ वर्षे पूर्ण होत आहेत. बॅरिस्टर मुकुंद जयकर पुणे विद्यापीठाचे पहिले कुलगुरू होते. मराठी भाषेचा प्रचार प्रसार करण्याच्या उद्देशाने या विद्यापीठाची स्थापना करण्यात आली होती. २०१४मध्ये पुणे विद्यापीठाला सावित्रीबाई फुले यांचे नाव देण्यात आले. गेल्या ७४ वर्षांत विद्यापीठाने राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर नाममुद्रा उमटवली आहे.



विद्यापीठाचा वर्धापन दिन आणि अमृत महोत्सवी वर्ष प्रारंभ कार्यक्रम शुक्रवार (१० फेब्रुवारी) संध्याकाळी चार वाजता होणार आहे. या कार्यक्रमाला केंद्र सरकारच्या नीती आयोगाच्या उपसमितीचे सदस्य भिकूजी इदाते हे उपस्थित राहणार आहेत. तसेत कुलगुरू डॉ. कारभारी काळे, प्र.कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे आणि कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार उपस्थित राहणार आहेत.

> अमृत महोत्सवी वर्षात विविध विषयांवर शैक्षणिक परिषदा, माजी कर्मचाऱ्यांचे संमेलन आदी कार्यक्रम होतील. खास अमृत महोत्सवी वर्षासाठी विद्यापीठाच्या आर्थिक अंदाजपत्रकात विशेष तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे. अमृत महोत्सव वर्षासाठी विशेष समिती स्थापन करून अन्य कार्यक्रमांची आखणी पुढील काही दिवसांत केली जाईल. या वर्षात नगर, नाशिक केंद्रांच्या विकासाचा विचार केला जाईल. ७५ वर्षानंतरचा विचार करता देशाला आयात कराव्या लागणाऱ्या वस्तूंचे संशोधन विकास करण्यासारखे प्रकल्प हाती घेतले जातील. मराठी भाषा भवनाचे काम अमृत महोत्सवी वर्षात पूर्ण करण्यात येईल.
>
> - डॉ. संजीव सोनवणे,
> प्र.कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

लोकसत्ता Fri, 10 February 2023
https://epaper.loksatta.com/c/71644703

# *News Paper Clippings During February 2023*

## *Section: Education*

ओळख शिक्षण धोरणाची

प्रा. रवींद्र कुलकर्णी

# उच्च आणि व्यावसायिक शिक्षणासाठीचे श्रेयांक

सगळेजण नेहमीसारखे एकत्र झाल्यावर प्रा. रमेश यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अनुसार येऊ घातलेल्या तीन/चार वर्षांच्या बहुविद्याशाखीय पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांची रचना त्यासाठीची पात्रता, त्याचे विविध प्रकार, आवश्यक श्रेयांक, अभ्यासक्रमातील आगमन-निर्गमानाचे वेगवेगळे नियम आणि कालावधी याबद्दल माहिती देण्यास प्रारंभ केला. राष्ट्रीय श्रेयांक आराखड्याप्रमाणे (National Credit Framework) शालेय शिक्षणासाठी स्तर एक ते चार आहे. बारावीचे शिक्षण संपेपर्यंत विद्यार्थ्याला मिळणाऱ्या श्रेयांकाचा स्तर ४ असेल. तर उच्च शिक्षणासाठी हा स्तर ४.५ ते ८ असा असेल. पदवी पातळीवर हा स्तर ४.५, ५.०, ५.५, ६.० आणि पदव्युत्तर पातळीवर हा स्तर ६.०, ६.५, ७.० आणि पीएच.डी.साठी हा स्तर ८.० असेल. व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षणासाठी व्यावसायिक शिक्षण आणि तंत्रज्ञान याचा स्तर १ ते ८ असा आहे. (स्तर १ ही यास्वरूपाच्या शिक्षणाची क्षमता आणि जटीलतेच्या दृष्टिकोनातून सर्वात खालची पातळी आहे तर ८ ही पातळी अभ्यासक्रमाची क्षमता आणि जटीलतेच्या दृष्टिकोनातून सर्वोच्च पातळी आहे.) मुलांनो, मी तुम्हाला एक तक्ता दाखवतो. या तक्त्यात दिल्याप्रमाणे उच्च आणि व्यावसायिक शिक्षण/ कौशल्य यासाठी दिले जाणारे श्रेयांक, त्याचे विविध स्तर आणि शिक्षण पूर्ण करण्यासाठी आवश्यक सत्रांची संख्या आहे.

आगमन-निर्गमन पर्यायांसह चार वर्षीय बहुविद्याशाखीय पदवी अभ्यासक्रमांसाठी पात्रता प्रकार आणि श्रेयांकांची आवश्यकता दाखवणारा तक्ता सोबत आहे.

सरांनी मुलांना पुढे समजावून सांगितले, ''समजा एखाद्या विद्यार्थ्याने स्तर ४.५ आणि ५ अनुक्रमे ४० व ८० श्रेयांक पूर्ण केले तर तो भविष्यात ज्या मुख्य विषयामध्ये पदवी मिळवू पाहणार आहे त्या विषयातील पदवीपूर्व प्रमाणपत्र आणि पदवीपूर्व पदविका त्याला मिळेल. त्याला जर एक वर्षानंतर किंवा दोन वर्षानंतर अध्ययनामधून निर्गमन करावयाचे असेल तर त्याला प्रमाणपत्र किंवा पदविकेसाठी आवश्यक असे किमान ४० किवा ८० श्रेयांक यशस्वीरित्या मिळाल्यावर निर्गमन करता येईल.'' यावर शिरीषने विचारले, ''सर, समजा एखाद्या विद्यार्थ्याला याच स्तरावर निर्गमन करायचे असेल तर त्याला काही अतिरिक्त आवश्यकता पूर्ण करावी लागेल का? प्रमाणपत्र अथवा पदविका मिळवलेल्या विद्यार्थ्यांची रोजगार क्षमता कशी निश्चित/ वर्धीत करता येईल?''

| स्तर | पात्रता | किमान आवश्यक श्रेयांक | वर्ष आणि सत्र |
|---|---|---|---|
| ४.५ | पदवीपूर्व प्रमाणपत्र ( UG Certificate) | ४० | १ वर्ष, २ सत्रे |
| ५ | पदवीपूर्व पदविका ( UG Diploma) | ८० | २ वर्षे, ४ सत्रे |
| ५.५ | बॅचलर पदवी | १२० | ३ वर्षे, ६ सत्रे |
| ६.० | बॅचलर पदवी ऑनर्स | १६० | ४ वर्षे, ८ सत्रे |
| ६.० | बॅचलर पदवी संशोधनासह ऑनर्स | १६० | ४ वर्षे, ८ सत्रे |
| ६.० | बॅचलर पदवी- अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान | १६० | ४ वर्षे, ८ सत्रे |

रमेश सर उत्तरले, ''४० श्रेयांक मिळवल्यानंतर पहिल्या वर्षाच्या ४.५ स्तरला शैक्षणिक अभ्यासक्रमातून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना संबंधित विषयातील पदवीपूर्व प्रमाणपत्र दिले जाईल; पण त्यासाठी त्याला उन्हाळ्याच्या कालावधीत त्याच्या भविष्यातील नोकरीतील आवश्यक प्रावीण्य-आधारित व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये किंवा शिक्षुता (Internship) मध्ये, त्याने सत्र I आणि II मध्ये निवडलेल्या कौशल्याधारित अभ्यासक्रमातील ६ श्रेयांकांबरोबर, ४ श्रेयांक मिळवावे लागतील. निर्गमन करणाऱ्या विद्यार्थ्यांची रोजगार क्षमता व कौशल्ये सुसज्ज करण्यासाठी या अटी घातल्या आहेत. पदवी देणाऱ्या शैक्षणिक संस्थांना या ४ श्रेयांकांसाठी कार्याधारित व्यावसायिक अभ्यासक्रम किंवा शिक्षुता याची यंत्रणा व त्याद्वारे रोजगार नियुक्तीचीही यंत्रणा (Placement Cell) निर्माण करावी लागेल. याचप्रकारे शैक्षणिक अभ्यासक्रमातील द्वितीय वर्ष स्तर ५.० मधून निर्गमन करणाऱ्या विद्यार्थ्यांना संबंधित विषयामध्ये पदवीपूर्व पदविका प्रदान केली जाईल. परंतु त्यासाठी त्यांना प्रथम किंवा दुसऱ्या वर्षाच्या उन्हाळी सुट्टीत त्याने निवडलेल्या कौशल्याधारित अभ्यासक्रमामध्ये अतिरिक्त ४ श्रेयांकांची जोड द्यावी लागेल. आता, आपण मुख्य विषय वाणिज्य हा निवडून चार वर्षांचा बहुविद्याशाखीय अभ्यासक्रम निवडू इच्छिणाऱ्या शिरीषचे उदाहरण घेऊ. त्याला जर पहिल्या किंवा दुसऱ्या वर्षानंतर अध्ययनातून निर्गमन करायचे असेल तर त्याला टॅली/ ई-कॉमर्स/ लॉजिस्टीक/ वेअर हाऊस मॅनेजमेंट/ जीएसटी अशा विषयांवर आधारित व्यावसायिक अभ्यासक्रम निवडावे लागतील किंवा संबंधित लॉजिस्टीक संस्था, बँक किंवा वित्तीय संस्थांमध्ये चार आठवड्यांची शिक्षुता करावी लागेल.''

आनंदने लगेच विचारले, ''शिरीषने नोकरी केल्यानंतर आणि व्यावसायिक अनुभव घेतल्यानंतर पुन्हा अध्ययनाकडे येण्याची योजना आखली तर त्याला तशी परवानगी आहे का? आणि पुनःप्रवेशासाठी जास्तीत जास्त अनुज्ञेय अंतर किती आहे?'' सर म्हणाले, ''शिरीषने कोणत्याही स्तरावर बाहेर पडण्याचा पर्याय निवडला असता त्याला तीन वर्षांच्या आत पदवी कार्यक्रमात पुन्हा येता येईल आणि चार वर्षांच्या बहुविद्याशाखीय अभ्यासक्रमाचे उर्वरित स्तर निर्धारित कमाल सात वर्षांच्या कालावधीत पूर्ण करण्याची परवानगी आहे.''

अमरला अजूनही काही प्रश्न पडले होते पण रमेश सर म्हणाले, ''ते पुढच्या वेळी पाहू.''

लोकसत्ता Fri, 10 February 2023
https://epaper.loksatta.com/c/71644829

# News Paper Clippings During February 2023

## Section: Education

{ COLLEGES CAN SET FEES }

# Autonomous colleges can now start courses without varsity nod

**Dheeraj Bengrut**

dheeraj.bengrut@htlive.com

**PUNE:** According to the revised regulations for autonomous colleges and educational institutions released by the Savitribai Phule Pune University (SPPU), autonomous colleges no longer need university permission to start new courses, and there is no obligation not to start more than two courses at the same time either. Additionally, the authority to decide the course fees will be with the colleges hereon and the current examination fee can be increased by 10% once in two years.

According to the earlier guidelines, the equivalence of admitted students in autonomous colleges was being provided by the university. As per the revised regulations however, in addition to the equivalence being provided by the university, a permanent registration number (PRN) will also be given to the autonomous organisations. This PRN will be used for implementation of the academic bank of credit whereas the earlier guidelines had limitations for starting the course.

SPPU pro-vice chancellor professor Sanjeev Sonawane said, "Now, autonomous institutes are allowed to start more than two courses or modules in one faculty at the same time. However, there is a condition to meet the physical facilities and required manpower. Autonomous colleges, while starting a new course, must send its draft to the university by March 31 of that academic year. Along with the syllabus, details such as eligibility, marks etc. are also to be given. The courses will be made academic by the university."

"Autonomous colleges are allowed to decide the fee for the course at their level. Also, the colleges must submit proposals for scholarships to the government," Sonawane said. The PhD admission process must be carried out as per the university rules. Autonomous colleges must pay 10% of the examination fee to the university.

Two years ago, the SPPU had released guidelines for autonomous colleges. However, restrictions had been imposed on autonomous colleges such as approval of the university before starting courses, payment of 15% examination fee to the university, and not starting more than two courses or units at the same time. Hence, autonomous colleges opposed these guidelines after which a committee regarding autonomous colleges was appointed by the university.

Hindustan Times 10.2.2023

# *News Paper Clippings During February 2023*

## *Section: Education*



# विद्यापीठाचे अमृतमहोत्सवी वर्षात पदार्पण

## रँकिंग सुधारणा, नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणीकडे लक्ष

पुणे, ता. ९ : सात लाखांहून अधिक विद्यार्थी आणि ७०० हून अधिक महाविद्यालयांना सामावून घेणारे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आता अमृतमहोत्सवी वर्षात (७५ वर्ष) पदार्पण करत आहे. विद्यापीठासमोर जागतिक पातळीवरील रँकिंगमध्ये पहिल्या तीनशे विद्यापीठांमध्ये आपला ठसा उमटविण्याचे आव्हान आहे, तर नॅशनल इस्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्कमध्ये (एनआयआरएफ) झालेली घसरण भरून काढण्याचे आव्हानही विद्यापीठासमोर आहे.

### विद्यापीठाची स्थापना

ब्रिटिशकालीन गव्हर्नरच्या बंगल्याच्या वास्तूत पुणे विद्यापीठ सुरू होऊन तब्बल सात दशके उलटली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची (तत्कालीन पुणे विद्यापीठ) १० फेब्रुवारी १९४९ रोजी स्थापना झाली. बॅरिस्टर डॉ. मुकुंद रामराव जयकर हे विद्यापीठाचे पहिले कुलगुरू होते. विद्यापीठाच्या प्रारंभी काळात विद्यापीठाला बॅरिस्टर जयकर, रँग्लर र. पु. परांजपे, प्रा. धनंजयराव गाडगीळ, प्राचार्य दत्तात्रेय गोपाळ कर्वे असे दिग्गज कुलगुरू म्हणून लाभले.

### नॅक मानांकनप्राप्त महाविद्यालये...

| ए++ | ए+ | ए | बी++ | बी+ | बी |
|---|---|---|---|---|---|
| ०३ | १८ | १०६ | ६२ | ७६ | १४० |

### वाटचालीबाबत कुलगुरूंचे मत...

- विद्यापीठाला अधिक उंचीवर नेण्याचा मानस
- विद्यापीठाला जागतिक पातळीवर महत्त्व प्राप्त करून देणे
- विद्यार्थ्यांना रोजगारक्षम, उद्योगक्षम बनविणे
- नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीची तयारी
- क्रीडा, सामाजिक कार्यात प्रोत्साहन देणे
- जागतिक पातळीवर पहिल्या तीनशेमध्ये नेण्यास प्रयत्नशील
- संशोधन, दुहेरी पदवी, बँक ऑफ क्रेडिट यासाठी प्रयत्न करणार
- आत्मनिर्भर विद्यापीठ आणि विद्यार्थी बनविणे

### वैशिष्ट्ये

(संकलन : मीनाक्षी गुरव)

- ७०० पेक्षा अधिक वनस्पतींच्या प्रजाती, ४०० औषधी वनस्पती
- देशाबाहेर दोहा-कतार येथे शैक्षणिक केंद्र स्थापनेसाठी प्रयत्न सुरू
- राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषदेचा (नॅक) 'ए+' दर्जा प्राप्त
- १०६ देशांमधील १२ हजारांहून अधिक परदेशी विद्यार्थी
- जुलै २०१४ रोजी 'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ' नावाला मान्यता
- क्यूएस वर्ल्ड युनिर्व्हसिटी रँकिंगमध्ये जगात ५४० ते ५५० मध्ये
- टाईम्स हायर एज्युकेशन वर्ल्ड युनिर्व्हसिटी रँकिंगमध्ये विद्यापीठ जगात ६०१ ते ८०० मध्ये

### विद्यापीठाची माहिती...

विद्यापीठाची स्थापना १० फेब्रुवारी १९४९

विद्यार्थी संख्या जवळपास ७ लाख

| ४११ एकर | ४६ | ७०५ | २३४ | ७१ | २९३ | ४,२२,००० |
|---|---|---|---|---|---|---|
| विद्यापीठाचे आवार | शैक्षणिक विभाग | संलग्न महाविद्यालये | संलग्न परिसंस्था | संशोधन संस्था | विभागातील शिक्षक | जयकर ग्रंथालयातील पुस्तके आणि जर्नल्स |

### महाविद्यालयांचे वैभव

| ३० | ३५८ | ३९२ | ३१२ |
|---|---|---|---|
| स्वायत्त महाविद्यालये | व्यावसायिक शिक्षण देणारी महाविद्यालये | अव्यावसायिक शिक्षण देणारी महाविद्यालये | संशोधन केंद्र (महाविद्यालय/ परिसंस्था/ स्वायत्त) |

Sakal, Pune, 10/02/2023

# *News Paper Clippings During February 2023*

## *Section: Education*

# प्रश्नपत्रिका वाहतुकीवर 'जीपीएस'द्वारे लक्ष

## दहावी-बारावीच्या परीक्षेदरम्यान केंद्रांवर भरारी आणि बैठी पथके

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** राज्यात दहावी-बारावीच्या परीक्षेदरम्यान गैरप्रकार रोखण्यासाठी राज्य मंडळाकडून प्रश्नपत्रिकांच्या वाहतुकीवर जीपीएस प्रणालीद्वारे लक्ष ठेवले जाणार आहे. त्यासासाठी राज्य मंडळाने मुख्य परीक्षा केंद्रावर प्रश्नपत्रिका पोहोच करण्यासाठी आणि आणण्यासाठी नियुक्त केलेल्या सहायक परिरक्षकाने (रनर) प्रवासादरम्यान जीपीएस प्रणाली सुरू ठेवणे आवश्यक केले असून, परीक्षा केंद्रांवर भरारी पथके आणि बैठी पथकेही नेमली जाणार आहेत. राज्य मंडळाच्या सचिव अनुराधा ओक यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली.

> "राज्य मंडळ सर्व उच्चस्तरीय अधिकाऱ्यांसमवेत काटेकोरपणे दहावी-बारावीच्या परीक्षा पार पाडण्यासाठी प्रयत्नशील आहे. तसेच सर्व घटकांकडून सहकार्य अपेक्षित आहे.
> - शरद गोसावी, अध्यक्ष, राज्य मंडळ

दहावी बारावीच्या परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात होण्याच्या अनुषंगाने राज्य मंडळाची बैठक झाली. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या स्वीय सचिवांसह पोलीस महासंचालक, ग्रामविकास विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव, शिक्षण आयुक्त, राज्य मंडळाचे अध्यक्ष, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक, विभागीय मंडळ अध्यक्ष, विभागीय शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

परीक्षेदरम्यान गैरप्रकार होऊ नयेत या दृष्टीने शिक्षण विभागाकडून परीक्षा केंद्रावर नेमल्या जाणाऱ्या भरारी पथकांशिवाय जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या समन्वयातून भरारी पथके आणि बैठी पथके नियुक्त केली जाणार आहेत. तसेच मुख्य परीक्षा केंद्रावर प्रश्नपत्रिका पोहोच करण्यासाठी आणि आणण्यासाठी नियुक्त केलेल्या सहायक परिरक्षकाने (रनर) प्रवासादरम्यान जीपीएस प्रणाली सुरू ठेवणे आवश्यक केले आहे, असे ओक यांनी स्पष्ट केले.

लोकसत्ता Sat, 11 February 2023
https://epaper.loksatta.com/c/71651920

---

## दहावी-बारावीचे पेपर दहा मिनिटांआधी देण्याची सुविधा बंद

# आता परीक्षेच्या वेळेवरच प्रश्नपत्रिका

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने दहावी आणि बारावीच्या परीक्षेत होणारे गैरप्रकार रोखण्यासाठी मोठा निर्णय घेतला आहे. विद्यार्थ्यांना परीक्षेच्या निर्धारित वेळेच्या दहा मिनिटांआधी प्रश्नपत्रिका देण्याची सुविधा यंदाच्या परीक्षेपासून रद्द करण्यात येणार आहे. राज्य मंडळाच्या सचिव अनुराधा ओक यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली.

दहावी-बारावीच्या परीक्षेतील गैरप्रकार रोखण्यासाठी राज्य मंडळ आणि विभागीय मंडळांतर्फे उपाययोजना करण्यात येतात. यंदा राज्य मंडळाने अभिनव प्रयोग करत लोकसहभागातून गैरप्रकार रोखण्यासाठीचा कृतिआराखडा तयार करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी पालक, शिक्षक आदी घटकांकडून सूचनाही मागवण्यात आल्या होत्या. त्यानुसार राज्य मंडळाकडे २३८ सूचना प्राप्त झाल्या. त्यानंतर आता राज्य मंडळाने परीक्षेच्या निर्धारित वेळेपूर्वी दहा मिनिटे प्रश्नपत्रिका देण्याची सुविधा यंदाच्या परीक्षेपासून रद्द करण्याचा निर्णय घेतला.

### अर्धा तास आधी उपस्थिती आवश्यक



राज्य मंडळाने दहावी आणि बारावीच्या सर्व विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी परीक्षेच्या वेळेपूर्वी अर्धा तास परीक्षा केंद्रावर पोहोचण्याच्या सूचना यापूर्वीच दिल्या आहेत. याबाबत प्रवेशपत्रावरही नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी सकाळच्या सत्रात साडेदहा वाजता आणि दुपारच्या सत्रात अडीच वाजता परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

दहावी-बारावीच्या परीक्षेवेळी विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिकेचे नीट आकलन होण्यासाठी परीक्षेच्या निर्धारित वेळेपूर्वी दहा मिनिटे प्रश्नपत्रिका देण्याची पद्धत गेली काही वर्षे वापरण्यात येत होती. मात्र, परीक्षा सुरू होण्यापूर्वी प्रश्नपत्रिका समाजमाध्यमांमध्ये पसरण्याचे प्रकार निदर्शनास आले आहेत. तसेच पेपरफुटीच्याही चर्चा होतात. दहावी-बारावीच्या परीक्षा हा विद्यार्थ्यांच्या जीवनातील महत्त्वपूर्ण टप्पा असल्याने पालक आणि समाजघटकांचे या परीक्षांकडे लक्ष असते. पेपरफुटीच्या अफवांमुळे राज्य मंडळाची समाजातील प्रतिमा मलीन होते. त्यामुळे असे प्रकार रोखण्यासाठी, निकोप आणि भयमुक्त वातावरणात परीक्षा होण्यासाठी परीक्षेच्या निर्धारित वेळेपूर्वी दहा मिनिटे प्रश्नपत्रिका देण्याची सुविधा बंद करण्यात आली आहे. त्यामुळे सकाळच्या सत्रात अकरा वाजता, तर दुपारच्या सत्रात तीन वाजता परीक्षा दालनात प्रश्नपत्रिकेचे वाटप सुरू होणार असल्याचे ओक यांनी नमूद केले.

लोकसत्ता Sat, 11 February 2023
https://epaper.loksatta.com/c/71651928

# *News Paper Clippings During February 2023*

## *Section: Education*

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरूपद रिक्त

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे अमृतमहोत्सवी वर्ष सुरू झाले आहे. मात्र विद्यापीठाच्या अमृत काळात कुलगुरू पद रिक्त असल्याने अतिरिक्त कार्यभारावर विद्यापीठाचे कामकाज करावे लागत आहे.

डॉ. नितीन करमळकर यांचा कुलगुरू पदाचा कार्यकाळ १८ मे २०२२ रोजी संपला. त्यानंतर रिक्त झालेल्या कुलगुरू पदाचा अतिरिक्त कार्यभार डॉ. कारभारी काळे यांच्याकडे सोपवण्यात आला. त्यानंतर राज्य शासनाकडून कुलगुरू निवडीसाठी तीन सदस्यांची समिती नेमण्यात आली. या समितीने कुलगुरू पदाच्या निवडीसाठीची प्रक्रिया सुरू करून जाहिरातही प्रसिद्ध करण्यात आली. मात्र राज्य शासनाने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) मार्गदर्शक सूचनांनुसार कुलगुरू निवड प्रक्रिया राबवण्याचा निर्णय घेतला. शासन नियुक्त समितीमध्ये यूजीसीचा प्रतिनिधी नसल्याने ती समिती स्थगित करून कुलगुरू निवडही स्थगित करण्यात आली. काही दिवसांपूर्वी नवी समिती नियुक्त करण्यात आली. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे (एआयसीटीई) माजी अध्यक्ष डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांच्या अध्यक्षतेखालील समितीमध्ये 'आयआयटी कानपूर'चे संचालक डॉ अभय करंदीकर, जलसंपदा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कपूर; कर्नाटक राज्य महिला विद्यापीठाच्या माजी कुलगुरू डॉ. मीना चंदावरकर (यूजीसी प्रतिनिधी) यांचा समावेश आहे. या समितीतर्फे आता कुलगुरू निवडीची प्रक्रिया राबवली जाणार आहे.

या पार्श्वभूमीवर विद्यापीठाचे अमृतमहोत्सवी वर्ष शुक्रवारी सुरू झाले. त्यात विद्यापीठाला पूर्णवेळ कुलगुरू नसल्याने प्रभारी कार्यभारावरच विद्यापीठाचे कामकाज करावे लागत आहे.

लोकसत्ता Sat, 11 February 2023 https://epaper.loksatta.com/c/71

## १०-१२ वी परीक्षांवर बहिष्काराचा इशारा

### शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी सोमवारी मोर्चा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे** : शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मागण्यांकडे राज्य सरकारने दुर्लक्ष केल्यामुळे राज्यातील कर्मचाऱ्यांनी दहावी आणि बारावीच्या परीक्षांच्या कामकाजावर बहिष्कार टाकण्याचे जाहीर केले आहे. त्यामुळे परीक्षेच्या कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता आहे. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मागण्या पूर्ण न केल्यास परीक्षा काळात अनिश्चित काळासाठी संप पुकारण्यात येईल, असा इशारा महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा शिक्षकेतर संघटनांच्या महामंडळाने दिला. तसेच प्रलंबित मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी आणि संपाची पुढील दिशा ठरवण्यासाठी येत्या सोमवारी (१३ फेब्रुवारी) शनिवारवाडा ते शिक्षण आयुक्त कार्यालयापर्यंत मोर्चा काढण्यात येणार आहे.

महामंडळाचे सरकार्यवाह शिवाजी खांडेकर यांनी ही माहिती दिली. यावेळी पुणे जिल्हाध्यक्ष प्रसन्न कोतुळकर, कार्याध्यक्ष विनोद गोरे आदी या वेळी उपस्थित होते. राज्यातील शाळांमध्ये शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती २००५ पासून बंद आहे. त्यामुळे आता शाळांमध्ये बोटावर मोजण्याइतके शिक्षकेतर कर्मचारी राहिले आहेत. अशा परिस्थितीत शाळांमधील रिक्त पदे आकृतिबंधानुसार भरण्यासाठी सरकारने तत्काळ निर्णय प्रसिद्ध करण्याची आवश्यकता आहे. सरकारी कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळत असतांना, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जाणीवपूर्वक १०, २०, ३० (सेवा वर्षे) योजनेचा लाभ मिळत नसल्याचे चित्र आहे. जुनी पेन्शन योजना लागू होत नसल्याने नुकत्याच झालेल्या निवडणुकीत सत्ताधारी पक्षांच्या उमेदवारांना हार पत्करावी लागली. यापुढेही ही योजना लागू होणार नसल्यास निवडणुकीत मतांच्या माध्यमातून कर्मचारी आपली शक्ती दाखवतील. आतापर्यंत केवळ आश्वासने देऊन प्रत्यक्षात निर्णय घेण्यात आले नाही. त्यामुळे मागण्या पूर्ण न झाल्यास परीक्षा कालावधीत कोणतेही काम न करण्याचा इशारा खांडेकर यांनी दिला.

लोकसत्ता Sat, 11 February 2023 https://epaper.loksatta.com/c/71651937

# *News Paper Clippings During February 2023*

## *Section: Education*

**Several Steps In Place For Fair SSC, HSC Exams**

# Practice of giving question papers 10 mins early stops

SwatiShindeGole
@timesgroup.com

**Pune:** The Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education will stop the practice of distributing question papers for the board exams 10 minutes before the scheduled time from this year.

Following past instances of cases where question papers went viral before the official time of the exam led the state board to take decision on stopping early distribution.

The state board had been distributing question papers early to students appearing for secondary school certificate (SSC, Std X) and higher secondary certificate (HSC, Std XII) board exams so that students can understand the paper and the questions before they started writing.

Secretary of the state board Anuradha Oak said, "There were rumours and some cases when question papers were found on smartphones as soon as exams began. The papers went viral in some cases in the past. Since both these exams are very important in any student's life, rumours about paper leak create several doubts among students and their parents. Also, the image of the state board is also maligned to an extent due to these incidents."

The decision was taken on Friday to curb such incidents and conduct free and fair examinations.

"We reflected upon this rule of issuing question papers 10 minutes in advance and felt that it should be stopped immediately in this technologically-advanced world. Our aim is to conduct the exams in all fairness, and in an environment that is free from malpractices," added Oak.

Rule of reporting to the exam hall 30 minutes before the scheduled time would stay. So, for the morning paper at 11am, students will have to reach the exam hall maximum by 10.30am and for second session exam at 3pm, students will have to report by 2.30pm.

The same has also been put up in the instructions in the exam hall ticket.

**ALL SET FOR EXAMINATIONS**



- A meeting with chief secretary of state was conducted on Friday to review preparations of the exam and efforts made by districts for a copy-free exams
- The meeting was **attended by police commissioners, education officials, divisional commissioners**, district collectors among **other officials attended this meeting**
- The state board said that a team of flying squads was appointed by district collectors and it was ready to conduct the exam smoothly

# Edu board to monitor 'runners' through GPS

Mohammed.Akhef@timesgroup.com

**Aurangabad:** The state board has decided to monitor the live location of 'runners', who take sealed question papers and answer sheets from the respective assistant custodians to the tive examination centres, through the mobile-based GPS system for the HSC exams starting from February 21.

Board's secretary Anuradha Oak told **TOI**, "There are approximately 3,000 examination centres for the HSC exams. To ensure that question papers reach the examination centres on time and to keep a check on any sabotage, we have decided to track the live location of the runners."

Assistant custodians will alert the custodian and higher-ups if he or she finds anything amiss. "The runners will post live locations in the group formed. For any deviation in time, those monitoring will come into action," said Oak.

The Times of India 11.2.2023

## *News Paper Clippings During February 2023*

### *Section: Education*

पुढारी

# शैक्षणिक धोरणात बदल करून मातृभाषेतून शिक्षण देणार

## पंतप्रधान मोदी : अल जमीया-तुस-सफीया अरेबिक शैक्षणिक संस्थेच्या इमारतीचे लोकार्पण

**मुंबई :** युवा पिढीला पुढे नेणारी धोरणे शासनाकडून राबवली जात आहेत. कोणत्याही समाज घटकातील विद्यार्थी शिक्षणात मागे पडू नये यासाठी शिक्षण धोरणात बदल करून मातृभाषेतून शिक्षणाला महत्त्व दिले जात आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले.

अंधेरी मरोळ येथील अल जमीया-तुस-सफीया अरेबिक शैक्षणिक संस्थेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. पंतप्रधान मोदी म्हणाले की, दाऊदी बोहरा समाजाच्या चार पिढ्यांसोबत माझा संवाद आहे. कोणताही समाज वेळेनुसार कसा बदलतो करतो यावरच त्या समाजाचा विकास अवलबंबून असतो. दाऊदी बोहरा समाजही काळाप्रमाणे बदलत आहे. काळाप्रमाणे नावीन्यपूर्ण शिक्षणाची वाट धरत आहे. ही गोष्ट आनंदाची आहे. दाऊदी बोहरा समाज बांधव जगाच्या कुठल्याही देशात असले तरी देशाप्रती त्यांचे प्रेम आणि योगदान खूप आहे आणि भविष्यातही राहील. शिक्षण क्षेत्रात दाऊदी बोहरा समाजाचे खूप मोठे योगदान आहे. शिक्षणाविषयी स्वप्न पाहिल्यानंतर ते प्रयत्न करून पूर्ण करण्याची क्षमता या समाजामध्ये आहे. अल जमीया-तुस-सफीया अरेबिक शिक्षण संस्थेत महिलांच्या शिक्षणासाठी प्रयत्न करण्यात येत आहे ही चांगली गोष्ट आहे. यापुढेही महिलांचा विकास, आधुनिक शिक्षण महिलांना देण्यासाठी ही संस्था आपले योगदान देईल, अशी मला आशा आहे.



**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अल जमीया-तुस-सफीयाचे कुलगुरू डॉ. सय्यदन मुफद्दल सैफउद्दीन हस्तांदोलन करताना. याप्रसंगी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, मुंबई शहरचे पालकमंत्री दीपक केसरकर, पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, दाऊदी बोहरा समाजाचे शहजादा अलिअसगर कलीम ऊद्दीन, शहजादा कियद जोहर इज्जुद्दीन आदी उपस्थित होते.

Pune Edition
Feb 11, 2023 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

# News Paper Clippings During February 2023

## Section: Education

**सामना**

### प्रश्नपत्रिकेचे वाचन, अवलोकन, वेळेचे नियोजन कसे करणार?

## दहावी, बारावी परीक्षेत दहा मिनिटांचा वाढीव वेळ द्या!

**मुख्याध्यापकांची बोर्डाकडे मागणी**

मुंबई, दि. १२ (प्रतिनिधी) – दहावी, बारावीची परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी प्रश्नपत्रिका परीक्षेपूर्वी दहा मिनिटे अगोदर देण्याचा निर्णय यंदापासून रद्द करण्यात आला आहे. या दहा मिनिटांत विद्यार्थी प्रश्नपत्रिकेचे नीट वाचन करून पेपर कसा सोडवायचा याविषयी विचार करत होते. मात्र, आता विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिकेचे वाचन, अवलोकन तसेच प्रश्न सोडविण्यासाठी वेळेचे नियोजन कसे करावे? असा प्रश्न पडला आहे. त्यामुळे दहावी, बारावी परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना दहा मिनिटांचा वेळ वाढवून द्या, जेणेकरून विद्यार्थी प्रश्नपत्रिकेचे वाचन करू शकतील अशी मागणी होत आहे,

राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या गेल्या काही परीक्षांपासून प्रश्नपत्रिका मोबाइलद्वारे सोशल मीडियावर व्हायरल होण्याचे गैरप्रकार वाढले आहेत. यंदा या प्रकारांना आळा घालण्यासाठी शिक्षण मंडळाने विद्यार्थ्यांना वाचनासाठी परीक्षेच्या आधी प्रश्नपत्रिका न देण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात गोंधळाची अवस्था निर्माण झाली आहे. आतापर्यंत विद्यार्थ्यांना परीक्षेच्या नियमित वेळेआधी १० मिनिटे प्रश्नपत्रिका वाचनासाठी आणि उत्तरे कशी लिहायची याच्या नियोजनासाठी देण्यात येत होती, परंतु या वर्षी तसे न करता परीक्षेच्या वेळेतच म्हणजे सकाळ सत्रात सकाळी ११ वाजता आणि दुपार सत्रात दुपारी ३ वाजता प्रश्नपत्रिका विद्यार्थ्यांना मिळणार आहे. परीक्षेच्या वेळेतच प्रश्नपत्रिका हातात आल्यावर सुरुवातीची दहा मिनिटे तिचे वाचन करण्यात निघून जाणार आहेत. त्यामुळे पेपर सोडविण्याआधीच दहा मिनिटे कमी होणार आहेत.

एकीकडे कोरोना काळात ऑनलाइन शिक्षण सुरू असल्याने आधीच विद्यार्थ्यांच्या लेखनावर परिणाम झाला आहे. गेल्या वर्षीच्या बोर्डाच्या परीक्षेत विद्यार्थ्यांना पेपर सोडविण्यासाठी वेळ वाढवून देण्यात आला होता. तसेच अभ्यासक्रमही कमी करण्यात आला होता. यंदा मात्र प्रचलित वेळेतच संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित परीक्षा होणार असल्याने विद्यार्थ्यांचा पेपर वेळेत पूर्ण होईल का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

> बोर्डाच्या परीक्षेत पेपरफुटीच्या भीतीमुळे विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका वाचनासाठी मिळणारी दहा मिनिटे कमी करणे म्हणजे विद्यार्थ्यांना वेठीस धरण्यासारखे आहे. बोर्डाने पेपर फुटीला आळा घालण्यासाठी अधिक कडक सुरक्षा व्यवस्था तयार करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या हाती प्रश्नपत्रिका आल्यानंतर नीट वाचून, समजून, उमजून व वेळेचे नियोजन करून उत्तरे लिहिण्यास वेळ दिला पाहिजे.
>
> ▮ पांडुरंग केंगार, सचिव,
> बृहन्मुंबई माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघटना

Pune Edition
Feb 13, 2023 Page No. 2
Powered by : eReleGo.com

**लोकमत**

## कॉपी रोखण्यासाठी तहसीलदारांचे भरारी पथक

### जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांचे निर्देश

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून आयोजित करण्यात येणाऱ्या आगामी बारावी व दहावी परीक्षांमधील गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी जिल्ह्यात कॉपीमुक्त अभियानाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी दिले. कॉपीमुक्त परीक्षेसाठी व गैरप्रकारास प्रतिबंध करण्यासाठी जिल्ह्यामध्ये भरारी पथके नेमण्यात यावेत, तसेच त्यांना कोणत्याही परीक्षा केंद्रास आकस्मिक भेटी देऊन तपासणी करण्याच्या सूचना द्याव्यात. यासोबत तहसीलदार व गटविकास अधिकारी यांची तालुकास्तर अतिरिक्त भरारी पथके कार्यान्वित करावीत, असे आदेशही त्यांनी दिले आहेत.

परीक्षांमधील गैरप्रकार रोखण्यासाठी स्थापित केलेल्या जिल्हास्तरीय दक्षता समितीच्या जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी हिम्मत खराडे, माध्यमिक शिक्षणाधिकारी सुनंदा वाखारे उपस्थित होते. देशमुख म्हणाले, "आवश्यकतेप्रमाणे परीक्षा कामकाजाचे व्हिडीओ चित्रीकरण करावे. आवश्यकतेप्रमाणे पोलिस बंदोबस्त तैनात करावा. प्रवेश करण्यापूर्वी प्रत्येक विद्यार्थ्याची कसून तपासणी करावी. केंद्राच्या परिसरात अनधिकृत व्यक्तींना प्रवेश देऊ नये. परीक्षा केंद्रांचे अतिसंवेदनशील, संवेदनशील सर्वसाधारण असे वर्गीकरण करावे."

**१९१ परीक्षा केंद्रे**

बारावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते २१ मार्च या कालावधीत तर दहावीची परीक्षा २ मार्च ते २५ मार्च या कालावधीत आयोजित करण्यात येणार आहे. जिल्ह्यात बारावीसाठी ८८८ शाळांमधील १ लाख ३१ हजार ३१५ विद्यार्थी १९१ परीक्षा केंद्रावर परीक्षा देणार आहेत. तर दहावीसाठी १ हजार ६९४ शाळांमधील १ लाख ३४ हजार ३३० विद्यार्थी २८० परीक्षा देणार आहेत. यामध्ये शहरी भागातील २३३ तर ग्रामीण भागातील २३८ अशी एकूण ४७१ परीक्षा केंद्रे आहेत.

Pune Main
Page No. 2 Feb 16, 2023
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During February 2023*

### *Section: Education*

सकाळ

विद्यापीठे, महाविद्यालयांचे अपयश : हिवाळी परीक्षा मार्चपर्यंत लांबणार

# शैक्षणिक वेळापत्रक विस्कळीतच

▸ सम्राट कदम : सकाळ वृत्तसेवा

**पुणे, ता. १५ : कोरोनानंतर वर्ष उलटून गेले तरी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे शैक्षणिक वेळापत्रक 'अप्रगत' स्थितीत असून, मागील वर्षीप्रमाणे यंदाही हिवाळी सत्राच्या अर्थात ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यांतील परीक्षा मार्चपर्यंत लांबल्या आहेत. शैक्षणिक वेळापत्रक पूर्ववत करण्यासाठी परीक्षा विभागासह विद्यापीठ, महाविद्यालये आणि विद्यार्थी संघटना अपयशी ठरल्या आहेत.**

कोरोनामुळे २०१९ ते २०२२ पर्यंतचे शैक्षणिक वेळापत्रक कोलमडले होते. तब्बल तीन ते चार महिन्यांच्या पडलेला फरक एक वर्षानंतरही विद्यापीठाला मिटविता आलेला नाही. यामुळे सर्वसामान्य विद्यार्थ्यांचे थेट नुकसान होत आहे. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ चे ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या हिवाळी सत्र परीक्षा मार्च २०२३ पर्यंत लांबल्या आहेत. पर्यायाने उन्हाळी सत्राच्या परीक्षांतही हाच कित्ता गिरविला जाण्याची शक्यता आहे. विद्यापीठ प्रशासनातील समन्वयाचा अभाव, महाविद्यालये आणि विद्यार्थी संघटनांची बोटचेपी भूमिकांमुळे यंदाही सर्वसामान्य विद्यार्थी भरडला जाण्याची दाट शक्यता आहे. उशिरा लागणारे निकाल पुढील प्रवेश प्रक्रियेवर दूरगामी परिणाम करणार असून, अनेक विद्यार्थ्यांच्या संधी हुकण्याची शक्यता आहे. तेव्हा वेळीच जागे होत सर्वच घटकांनी एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे.

### आकडे बोलतात

**७०५** विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये

**६,५०,०००** (अंदाजे) परीक्षा देणारे विद्यार्थी

**२२४** अभ्यासक्रमांची संख्या

**५,०००** (सुमारे) प्रश्नपत्रिकांची संख्या

**परीक्षेनंतर ३० ते ४५ दिवसांत** निकाल लागणे अपेक्षित

**पेपर तपासणी कधी होते :** संबंधित विषयाचा पेपर झाल्यानंतर तिसऱ्या दिवसापासून

### हिवाळी सत्र परीक्षांचे वेळापत्रक

(ऑक्टोबर-नोव्हेंबर)

**शैक्षणिक वर्ष २०२१-२२**
मार्च-एप्रिल २०२२

**शैक्षणिक वर्ष २०२२-२३**
फेब्रुवारी-मार्च २०२३

### परीक्षा लांबण्याची कारणे

- प्रत्येक पेपरला दोन दिवस गॅप देण्याची भूमिका
- परीक्षा विभागासह महाविद्यालयांमध्ये मनुष्यबळाचा अभाव
- पेपर तपासणीसाठी अपुरे मनुष्यबळ
- शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संपाचाही परीक्षेवर विपरीत परिणाम
- काही महाविद्यालयांकडून अंतर्गत गुण वेळेवर भरले जात नाहीत

### काय झाला परिणाम?

- कोरोनानंतरही एक वर्षानि शैक्षणिक दर्जा सुमार राहणार
- अभ्यासक्रमांच्या सम सत्रांचा (उन्हाळी) शिकविण्याचा कालावधी कमी होईल
- कमी वेळेत जास्त अभ्यासक्रम शिकविण्याचे प्राध्यापकांसमोर आव्हान
- प्रात्यक्षिके, महाविद्यालयांतील विविध उपक्रम, सांस्कृतिक कार्यक्रमांना फटका बसणार
- पुढील सत्राच्या परीक्षा लांबण्याची शक्यता, परिणामी पुढील वर्षाच्या प्रवेशाला फटका

" विद्यापीठाच्या अधिकार मंडळांकडे इच्छाशक्तीचा अभाव असल्यामुळे शैक्षणिक वेळापत्रक वर्षभरानंतरही पूर्ववत झाले नाही. ऑगस्ट महिन्यात सुरू झालेले प्रथम वर्षाची हिवाळी परीक्षा पाच ते सहा महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर होत आहे. विद्यापीठ प्रशासनाच्या गैरव्यवस्थापनाचा थेट फटका विद्यार्थ्यांसह प्राध्यापकांनाही बसत आहे.

**- डॉ. के. एल. गिरमकर,** अध्यक्ष, एसफुक्टो

" परीक्षा विभाग प्रशासन म्हणून सर्व सकारात्मक सूचनांचे नेहमीच स्वागत करते. शैक्षणिक वेळापत्रक पूर्ववत करण्यासाठी महाविद्यालयाच्या प्रशासनासह प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांचेही सहकार्य आवश्यक आहे. प्रशासकीय पातळीवर आवश्यक त्या सर्व उपाययोजना आम्ही करत आहोत.

**- डॉ. महेश काकडे,**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

" सातत्याने कोणत्या ना कोणत्या कारणांमुळे परीक्षा पुढे ढकलल्या जातात. त्यामुळे निकाल उशिरा लागतात आणि नवीन ठिकाणी प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांना अडचणी येतात. गेल्या वर्षभरात परदेशात शिक्षण घेण्यासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना वेळेवर निकाल आणि पदवी प्रमाणपत्रे मिळाली नसल्यामुळे प्रवेश रद्द करावे लागले आहेत. परीक्षा विभाग आणि विद्यापीठ प्रशासनाने शैक्षणिक वेळापत्रकाची योग्य ती अंमलबजावणी करण्यासाठी आग्रही राहिले पाहिजे.

**- राहुल ससाणे,**
सदस्य, विद्यापीठ विद्यार्थी संघर्ष कृती समिती

Pune, Pune-Today
16/02/2023 Page No. 1

# *News Paper Clippings During February 2023*

## *Section: Education*

लोकमत

# १०वी, १२वी परीक्षेत दहा मिनिटे जास्त

## शिक्षण मंडळ : विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेत महत्त्वाचा निर्णय

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षा सुरू होण्याच्या निर्धारित वेळेच्या दहा मिनिटांपूर्वी प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी देण्याची पद्धत बंद केली. मात्र, परीक्षेच्या वेळेत दहा मिनिटांनी वाढ करण्याचा निर्णय बुधवारी मंडळाने घेतला. पालक, विद्यार्थ्यांनी केलेली मागणी आणि विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेत, हा निर्णय घेतला असल्याचे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने म्हटले आहे.

परीक्षा सुरू असताना मोबाइल, तसेच समाजमाध्यमांवर प्रश्नपत्रिका प्रसारित झाल्याचे काही प्रकार निदर्शनास आले होते. त्या



### विद्यार्थ्यांनी काय करावे?

विद्यार्थ्यांनी परीक्षेच्या निर्धारित वेळेपूर्वी किमान अर्धा तास आधी परीक्षा केंद्रावर पोहोचावे. सकाळच्या सत्रात साडेदहा आणि दुपारच्या सत्रात अडीच वाजता उपस्थित राहावे. त्यानंतर, परीक्षा दालनात सकाळी ११, तसेच दुपारी ३ वाजता प्रश्नपत्रिकांचे वितरण व लेखनास प्रारंभ होणार आहे.

पार्श्वभूमीवर पेपरफुटींच्या अफवांना प्रतिबंध घालणे, तसेच भयमुक्त आणि कॉपीमुक्त वातावरणात परीक्षा सुरळीतपणे पार पडाव्यात, यासाठी परीक्षेच्या निर्धारित वेळेपूर्वी दहा मिनिटे अगोदर प्रश्नपत्रिका वितरित करण्याची सुविधा बंद करण्याचा निर्णय १० फेब्रुवारी रोजी घेतला होता. विद्यार्थी आणि पालकांमध्ये या निर्णयाविरोधात नाराजीचा सूर दिसत होता. त्यामुळे मंडळाने पुन्हा प्रसिद्धीपत्रक काढले आणि परीक्षेच्या एकूण वेळेत दहा मिनिटे वाढवून देण्याचा निर्णय घेतला.

Pune Main
Page No. 3 Feb 16, 2023
Powered by: erelego.com

सकाळ

# बोर्डाच्या परीक्षेसाठी जादा १० मिनिटे

**पुणे, ता. १५** : इयत्ता दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षेसाठी दहा मिनिटे वाढवून दिली आहेत. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने यासंबंधीचे परिपत्रक प्रसिद्ध केले आहे.

प्रश्नपत्रिका मोबाईलवरून फुटण्याच्या अफवा आणि कॉपीच्या घटनांमुळे प्रश्नपत्रिका दहा मिनिटे आधी देण्याची पद्धत बंद केली होती. मात्र पालकांच्या आग्रहास्तव आणि विद्यार्थ्यांसाठी परीक्षा दालनात दहा मिनिटे अगोदर वाटप करण्याऐवजी नंतर दहा मिनिटे वेळ वाढवून देणार असल्याचे बोर्डाने स्पष्ट केले आहे. सकाळच्या सत्रात ११ वाजता आणि दुपारच्या सत्रात तीन वाजता प्रश्नपत्रिका वितरित करणार आहेत. आधीच्या वेळापत्रकात निर्धारित केलेल्या वेळेपेक्षा १० मिनिटे उशिराने उत्तरपत्रिका संकलित करणार आहेत.

Pune, Main
16/02/2023 Page No. 1

# *News Paper Clippings During February 2023*

## *Section: Education*

पुढारी

# शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सरकारला अल्टिमेटम

## मागण्या मान्य न झाल्यास मार्चपासून दहावी-बारावीच्या परीक्षांवर बहिष्कार

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र राज्य शिक्षकेतर महामंडळाच्या वतीने सरकारकडे तब्बल २२ मागण्यांसाठी नुकताच शनिवारवाडा ते सेंट्रल बिल्डिंग, असा महाआक्रोश मोर्चा काढला. या मागण्यांवर निर्णय घेण्यासाठी सरकारला फेब्रुवारीअखेरपर्यंत मुदत देण्यात येणार आहे. मागण्या मान्य न झाल्यास २ मार्चपासून सुरू होणाऱ्या दहावीच्या आणि सुरू असलेल्या बारावीच्या परीक्षांवर बहिष्कार घालण्यात येणार असल्याची माहिती संघटनेच्या वतीने देण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य शिक्षकेतर महामंडळाचे सरकार्यवाह शिवाजी खांडेकर म्हणाले की, राज्य मंडळाने दहावी-बारावीच्या परीक्षांबाबत तपशीलवार चर्चा करण्यासाठी राज्य मंडळ व शिक्षकेतर महामंडळाचे पदाधिकारी यांची संयुक्त सहविचार सभा शुक्रवारी राज्य मंडळात दुपारी अडीच वाजता आयोजित करण्यात आली आहे. या सहविचार सभेत आम्ही आमच्या मागण्या मांडणार आहोत. आमच्या मागण्या फेब्रुवारी महिना संपेपर्यंत मान्य झाल्या नाहीत, तर शिक्षकेतर कर्मचारी मार्च महिन्यापासून दहावी-बारावी परीक्षांचे काम करणार नाहीत. त्यामुळे परीक्षेत अडचणी आल्यास त्याची सर्व जबाबदारी राज्य शासनाची राहील.

### प्रात्यक्षिक परीक्षांवर परिणाम नाही

राज्यात २१ फेब्रुवारीपासून बारावीची परीक्षा सुरू होणार आहे. तसेच, सध्या प्रात्यक्षिक परीक्षा सुरू आहेत. संघटनेने मागण्यांवर विचार करण्यासाठी सरकारला वेळ दिला आहे. कामकाज सुरळीत सुरू राहणार असल्यामुळे प्रात्यक्षिक परीक्षांवर कोणताही परिणाम होणार नसल्याचे खांडेकर यांनी स्पष्ट केले.

२००५ पासून शाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती बंद आहे. कर्मचारीसंख्या दिवसेंदिवस कमी होत आहे. एकीकडे ७५ हजार पदे भरण्याचा आनंदोत्सव चालू असताना शिक्षक व शिक्षकेतर पदांची पदे भरण्याबाबत शासनाला विसर पडलेला आहे. शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे बक्षी समितीने खंड १ मध्ये शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी मंजूर केलेल्या १०/२०/३० च्या लाभाची योजना शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू करावी. शिक्षकेतर आकृतिबंधाबाबत नियुक्त केलेल्या समितीने सादर केलेला अहवाल जसाचा तसा मंजूर करून चतुर्थ श्रेणी कर्मचारी भरतीसह सर्व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भरतीस त्वरित परवानगी द्यावी.

माध्यमिक शाळेतील सर्व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी. राज्यातील शिक्षकेतरांच्या शिक्षणसेवक मानधनाद्वारे वाढ करावी. शिक्षकेतरांच्या अनुकंपा तत्त्वावरील नियुक्त्यांना तत्काळ मान्यता द्यावी, अशा २२ मागण्या केल्या आहेत. त्यातील प्रमुख पाच ते सहा मागण्या मान्य झाल्या नाहीत, तर संघटना परीक्षांवर बहिष्कार टाकून आक्रमक आंदोलन करण्यासाठी रस्त्यावर उतरणार आहे.

Pune Edition
Feb 16, 2023 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During February 2023*

### *Section: Education*

पुढारी

# राज्य मंडळाच्या स्वायत्ततेवर घाला!

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या दहावी-बारावीच्या परीक्षेत प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी दिलेली दहा मिनिटे रद्द करण्याचा निर्णय राज्य मंडळाने घेतला होता. मात्र, राज्य शासनाकडून दबाव टाकण्यात आल्याने राज्य मंडळाला दहावी-बारावीच्या परीक्षांसाठी दहा मिनिटे वाढवून द्यावी लागली आहेत. या निर्णयामुळे राज्य मंडळाच्या स्वायत्ततेवर राज्य सरकारकडून घाला घातला जात असल्याचे बोलले जात आहे.

राज्य मंडळातर्फे बारावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते २१ मार्च या कालावधीत, तर दहावीची परीक्षा २ ते २५ मार्च या कालावधीत होत आहे. या परीक्षांदरम्यान गैरप्रकार होऊ नयेत या दृष्टीने राज्य मंडळाने काही उपाययोजना करण्याचा निर्णय घेतला. त्या अनुषंगाने राज्याचे मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत परीक्षेच्या निर्धारित वेळेपूर्वी दहा मिनिटे प्रश्नपत्रिकांचे वितरण करण्याची सुविधा स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार मंडळाकडून संबंधित निर्णय जाहीर करण्यात आला. मात्र, या निर्णयानंतर नाराजीचा सूर व्यक्त होऊ लागला.

परीक्षेच्या निर्धारित वेळेपूर्वी प्रश्नपत्रिकांचे वितरण करण्याचा निर्णय विनोद तावडे शिक्षणमंत्री असतानाच्या काळात घेण्यात आला होता. तर परीक्षेच्या निर्धारित वेळेपूर्वी दहा मिनिटे प्रश्नपत्रिकांचे वितरण करण्याची सुविधा स्थगित करण्याचा निर्णयही आता भाजप सत्तेत असतानाच झाला. त्यामुळे विद्यार्थी आणि पालकांकडून राज्य शासनाकडे दाद मागण्यात आल्याने शासनाकडून वेळ वाढवून देण्याची सूचना राज्य मंडळाला करण्यात आली. आता दहा मिनिटे वाढवून देण्याच्या निर्णयामुळे पुन्हा एकदा राज्य मंडळाच्या स्वायत्ततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

Pune Edition
Feb 16, 2023 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During February 2023*

## *Section: Education*

सकाळ

### राष्ट्रीय शिक्षण धोरणाची अंमलबजावणी जूनपासून : शैलेंद्र देवळाणकर

पुणे, ता. १६ : ''विद्यार्थी केंद्रीभूत मानणाऱ्या नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाची अंमलबजावणी येत्या जूनपासून होणारच, त्यापासून कोणालाही कसलीही सवलत मिळणार नाही,'' याचा पुनरुच्चार राज्याचे उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी येथे केला.

मराठवाडा मित्र मंडळाच्या वाणिज्य महाविद्यालयाने 'नवीन शैक्षणिक धोरणांतर्गत शैक्षणिक संस्था व उद्योग यांच्यामधील सहयोग' या विषयावर आयोजित केलेल्या चर्चासत्रात डॉ. देवळाणकर बोलत होते. कायनेटिक कम्युनिकेशनचे संचालक डॉ. दीपक शिकारपूर, संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य बी. जी. जाधव, प्रा. तेज निवळीकर आणि महाविद्यालयाचे प्राचार्य देविदास गोल्हार उपस्थित होते.

महाराष्ट्रातील सर्व कृषक आणि अकृषक विद्यापीठ यांच्यामध्ये शैक्षणिक पातळीवर काही घटकांत समानता आणण्यात येणार आहे असे डॉ. देवळाणकर म्हणाले. 'रूसा'चे राज्य प्रकल्प संचालक डॉ. विनायक निपुण यांनी दृकश्राव्य माध्यमातून संवाद साधला. प्राचार्य डॉ. गोल्हार यांनी प्रास्ताविक केले. समन्वयक डॉ. अश्विनी कुलकर्णी यांनी आभार मानले.

**... तर अनुदान स्थगित होणार**

महाराष्ट्रातील ज्या महाविद्यालयांनी एकदाही नॅकची मान्यता मिळवलेली नाही, त्यांना ३१ मार्च ही अंतिम मुदत दिली आहे. राज्यात अजून ७० महाविद्यालयांनी नॅकची मान्यता मिळवलेली नाही. त्यांनी जर ३१ मार्चपर्यंत मान्यता मिळवली नाही, तर त्यांची विद्यापीठ संलग्नता रद्द करण्यात येईल, तसेच या महाविद्यालयांचे अनुदानही स्थगित करण्यात येईल. त्याचबरोबर राज्यातील सर्व महाविद्यालयांचा स्थाननिश्चिती नकाशा तयार करण्यात येत असल्याचे डॉ. देवळाणकर यांनी सांगितले.

Pune, Pune-Today
17/02/2023 Page No. 3

सकाळ

### शिक्षकांचा पेपर तपासणीवर बहिष्काराचा इशारा

पुणे, ता. १६ : राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या दीर्घकाळ प्रलंबित समस्यांच्या निराकरणासाठी वारंवार पत्रे देऊन, आंदोलने करूनही राज्य सरकारने दखल घेतलेली नाही. त्यामुळे कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक महासंघाला बारावीच्या उत्तरपत्रिका तपासणीवर बहिष्कार टाकावा लागत आहे. यंदाच्या बारावीच्या उत्तरपत्रिका शिक्षक तपासणार नाहीत, अशी भूमिका महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाने घेतली आहे.

राज्यात १ नोव्हेंबर २००५ पूर्वी विना अनुदानित, तसेच अंशतः अनुदानावरील नियुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, शासकीय कर्मचाऱ्यांसाठी असणारी आश्वासित प्रगती योजना लागू करावी, शिक्षकांची रिक्त पदे त्वरित भरावी, निवृत्तीचे वय ६० वर्षे करावे, कनिष्ठ महाविद्यालयीन उपप्राचार्यांना पदोन्नतीची वेतनवाढ देण्यात यावी, आयटी विषय अनुदानित करावा आणि कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थी पटसंख्येचे निकष शाळा संहितेनुसार असावेत, तसेच एम.फिल., एम.एड., पीएच.डी.धारक कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना उच्च शिक्षणातील शिक्षकांप्रमाणे वेतनवाढ लागू करावी, अशा मागण्यांसाठी महासंघातर्फे राज्य सरकारकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. याआधी कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाने आंदोलन केले. यापूर्वीही महासंघाने चर्चा करून समस्यांचे निराकरण करावे, यासाठी राज्य सरकारला वारंवार विनंतीपत्रे दिली आहेत. सरकारने काही मागण्या मान्य करूनही अद्याप त्याबाबत आदेश काढलेला नाही. त्यामुळे महासंघाला बारावीच्या उत्तरपत्रिका तपासणीवर बहिष्कार टाकावा लागत आहे, असे महासंघाचे समन्वयक प्रा. मुकुंद आंदळकर यांनी सांगितले.

Pune, Main
17/02/2023 Page No. 3

## *News Paper Clippings During February 2023*

### *Section: Education*

# महाविद्यालयांच्या संख्येत महाराष्ट्र दुसरा

## अखिल भारतीय उच्चशिक्षण सर्वेक्षणातील माहिती

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**



**नागपूर :** उच्च शिक्षण देणाऱ्या महाविद्यालयांच्या संख्येत महाराष्ट्र देशात दुसऱ्या क्रमांकावर आहे. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाद्वारा प्रकाशित अखिल भारतीय उच्चशिक्षण सर्वेक्षणात (एआयएसएसई) ही माहिती पुढे आली आहे.

सर्वेक्षणातील माहितीनुसार, उत्तर प्रदेशमध्ये ८,११४ तर महाराष्ट्रात ४,५३२ महाविद्यालये आहेत. राज्यात प्रतिलाख लोकसंख्येच्या प्रमाणात ३४ महाविद्यालये आहेत. तंत्रनिकेतन महाविद्यालयांच्या संख्येतही राज्य आघाडीवर आहे. राज्यात ७३४ तंत्रनिकेतन महाविद्यालये आहेत आणि २ लाख ४१ हजार विद्यार्थी तेथे शिक्षण घेतात. सर्वाधिक दोन लाख ४९ हजार विद्यार्थ्यांसह कर्नाटक प्रथम स्थानावर आहे.

२०११ पासून शिक्षण मंत्रालय उच्च शिक्षणाचे अखिल भारतीय सर्वेक्षण करीत आहे. या सर्वेक्षणात विद्यार्थ्यांची नाव नोंदणी, शिक्षकांचा 'डेटा', पायाभूत सुविधांची माहिती, आर्थिक माहिती यांसारख्या विविध बाबींची सविस्तर माहिती गोळा करण्यात येते. 'एआयएसएचई'ने २०२०-२१ मध्ये प्रथमच 'ऑनलाइन' माहिती संकलित करून अहवाल तयार केला आहे. या अहवालानुसार उच्च शिक्षणामध्ये महाराष्ट्राची स्थिती दर्जेदार असल्याचे दिसून येते. तांत्रिक शिक्षणामध्ये राज्य प्रगतीवर आहे. सर्वेक्षणानुसार, १८४ जिल्ह्यांत महाविद्यालयांची संख्या प्रत्येकी २० ते ५० दरम्यान आहे. १४५ जिल्ह्यांत ही संख्या ५१ ते १०० दरम्यान सांगण्यात आली. बहुतांश महाविद्यालयांमध्ये पदवी अभ्यासक्रम शिकवला जातो. २.९ टक्के महाविद्यालयांमध्ये पीएच.डी. करण्याची सोय आहे.

### पुणे चौथ्या तर, नागपूर आठव्या स्थानावर...

देशातील सर्वात जास्त महाविद्यालयांच्या यादीत नागपूर पहिल्या दहामध्ये आले आहे. ३१८ महाविद्यालयांसह देशात नागपूर आठव्या स्थानावर तर ४८८ महाविद्यालयांसह पुणे चौथ्या क्रमांकावर आहे. देशात सर्वाधिक १ हजार ५८ महाविद्यालये बंगळूरुमध्ये आहेत. यानंतर जयपूर (६७१), हैदराबाद (४८८), पुणे (४६६), प्रयागराज (३७४), रंगरेड्डी (३४५), भोपाळ (३५७), नागपूर (३१८), गाझीयापूर (३१६), सिकर(३०८), यांचा समावेश आहे.

**दूरस्थ शिक्षणप्रणालीत आघाडी**

देशातील विद्यापीठातील एकूण विद्यार्थी संख्येपैकी निम्मे विद्यार्थी दूरशिक्षण घेणारे आहेत. यामध्ये महाराष्ट्र आघाडीवर असून राज्यातील १७.७ टक्के विद्यार्थी दूरशिक्षण घेतात. यानंतर दिल्ली (१४.२३ टक्के), तमिळनाडू (९.६ टक्के) यांचा क्रमांक लागतो.

लोकसत्ता Fri, 17 February 2023
https://epaper.loksatta.com/c/71704314

# *News Paper Clippings During February 2023*

## *Section: Education*

### पुढील वर्षीपासून पुणे विद्यापीठात छत्रपती शिवाजी महाराजांवर नवा अभ्यासक्रम

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त पुढील वर्षीपासून 'छत्रपती शिवाजी महाराज कर्तृत्व, विचार आणि व्यवहार' हा नवीन अभ्यासक्रम विद्यापीठात सुरू करण्याची घोषणा विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे यांनी रविवारी केली.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त विद्यापीठातर्फे आयोजित कार्यक्रमात इतिहासाचे ज्येष्ठ अभ्यासक पांडुरंग बलकवडे यांचे व्याख्यान झाले. त्यावेळी डॉ. सोनवणे यांनी नव्या अभ्यासक्रमाची घोषणा केली. कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रवींद्र शिंगणापूरकर, अधिष्ठाता डॉ. विजय खरे, दीपक माने, आजीवन अध्ययन व विकास केंद्राचे संचालक व अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. विलास आढाव, जयकर ज्ञानस्त्रोत केंद्राच्या संचालिका डॉ. अपर्णा राजेंद्र, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. प्रभाकर देसाई, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. संतोष परचुरे या वेळी उपस्थित होते. ढोल ताशा पथक, लेझीम यांच्यासह पारंपरिक वेषातील शिवभक्तांच्या उपस्थितीत शिवजयंती मिरवणूक काढण्यात आली.

व्याख्यानात बलकवडे म्हणाले, की कृषी क्रांतीच्या माध्यमातून अर्थक्रांती आणि त्यातून समाजक्रांती करत छत्रपती शिवाजी महाराजांनी नवा राष्ट्रवाद निर्माण केला. शिवाजी महाराजांनी लोककल्याणकारी रयतेचे राज्य निर्माण केले. उद्याच्या सशक्त हिंदुस्तानासाठी त्यांनी दहशतमुक्त, भ्रष्टाचारमुक्त, विज्ञानवादी राज्य निर्माण केले. अन्याय करणारा कितीही शक्तिशाली असला तरी त्याच्याशी संघर्ष करणे हे आपले आद्य कर्तव्य त्यांनी मानले. त्यांनी अठरापगड जातींमधील मावळ्यांच्या साथीने स्वराज्य निर्माण केले.

लोकसत्ता Mon, 20 February 2023
https://epaper.loksatta.com/c/71

### कार्यशाळा घ्या, पैसे आम्ही देऊ



**राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी**

**पुणे विद्यापीठाच्या महाविद्यालयांना सूचना**

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १९ -** राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने संलग्नित महाविद्यालयांना निधी उपलब्ध करून देण्यासाठी पुढाकार घेतला आहे. त्या अनुषंगाने कार्यशाळा घेण्यासाठी विद्यापीठाने महाविद्यालयांना प्रोत्साहित करण्याचे धोरण स्वीकारले आहे. त्यासाठी पुन्हा एकदा मुदतवाढ देत महाविद्यालयांना दिलासा देण्यात आला आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची 'गुणवत्ता सुधार योजना' ही महाविद्यालयांच्या पायाभूत सुविधांसाठी कार्यान्वित आहे. त्याच योजनेंतर्गत राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांना निधी उपलब्ध करून देण्याची तरतूद केली आहे. या प्रकारचा निधी उपलब्ध करून देणारे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ हे एकमेव ठरले आहे. मागील वर्षीदेखील विद्यापीठाकडून दोन कोटींहून अधिक निधीचे वितरण करण्यात आल आहे.

> “ राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे केवळ विद्यापीठ व वर्तुळाभोवती मर्यादित न राहता व्यापक स्वरूपात, ग्रामीण भागातही त्याची तेवढीच अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. महाविद्यालयांनी या संधीचा लाभ घेत नव्या धोरणाची योग्य अंमलबजावणी करावी.
>
> **– डॉ. संजीव सोनवणे,** प्र– कुलगुरू

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी ज्या महाविद्यालयांनी प्रस्ताव सादर केले आहेत, त्यापैकी १६४ महाविद्यालये या योजनेसाठी पात्र ठरली आहे. असून त्यामध्ये राष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळा आयोजित करण्यासाठी पुणे शहर येथील ४९, पुणे ग्रामीण येथील १६, नाशिक येथून १९, नगर येथून १५, दादर हवेली येथील १ अशा शंभर महाविद्यालयांचा समावेश आहे. यांच्यासाठी प्रत्येकी एक लाख रुपयांचे अनुदान देण्यात येणार आहे. राज्यस्तरीय कार्यशाळेसाठी पुणे शहर येथील २७, पुणे ग्रामीण येथील १७, नाशिक येथील १२ व नगर येथील ८ असे एकूण ६४ महाविद्यालयांचे अर्ज पात्र ठरले आहेत.

प्रभात PuneCity, 20 Feb 2023, Page:007
https://epaper.dainikprabhat.com

# *News Paper Clippings During February 2023*

## *Section: Education*

पुढारी

पुणे

री २०२३

तापमान 34°C पुणे | 36°C चिंचवड | आजचा अंदाज: आकाश निरभ्र राहील.



# परराज्यातील विद्यापीठांच्या पदव्यांना पिंपरी-चिंचवडमध्ये बंदी, पुण्यात संधी !

### दोन महापालिकांचे परस्परविरोधी निर्णय

**पुढारी वॉच**

पांडुरंग सांडभोर
पुढारी प्रतिनिधी

**पुणे : परराज्यातील विद्यापीठांच्या पदव्यांच्या आधारे पदोन्नती घेणाऱ्या कर्मचाऱ्यांना पिंपरी-चिंचवड महापालिकेने दरवाजे बंद केले आहेत. पुणे महापालिकेने मात्र अद्याप याबाबत ठोस निर्णय घेतलेला नाही. नियमबाह्य पदव्यांच्या आधारे अभियंते होण्याची स्वप्ने बघणाऱ्यांना पिंपरी-चिंचवडने चाप लावला असला, तरी पुणे महापालिकेने मात्र संधी कायम ठेवलेली आहे. दोन्ही महापालिकांनी घेतलेल्या परस्परविरोधी निर्णयाबद्दल आश्चर्य व्यक्त केले जात आहे.**

महापालिकेच्या सेवा प्रवेश नियमावलीनुसार वर्ग तीन व चारमधील पात्र कर्मचाऱ्यांना कनिष्ठ अभियंतापदावर पदोन्नती देण्याची तरतूद आहे. या नियमाच्या आधारे गेल्या पाच ते सात वर्षांत पुणे महापालिकेत रखवालदार, बिगारी, शिपाई, क्लार्क, आरोग्य निरीक्षक अशा कर्मचाऱ्यांना कनिष्ठ अभियंता होण्याची संधी मिळाली आहे. मात्र, ही पदोन्नती मिळविताना अनेक कर्मचाऱ्यांनी परराज्यातील म्हणजेच राजस्थान, केरळ, कर्नाटक, आसाम या राज्यांतील विद्यापीठांच्या पदव्या घेतल्या आहेत. या सर्व कर्मचाऱ्यांनी बहिस्थ पध्दतीने शिक्षण घेऊन या पदव्या मिळविलेल्या आहेत. विशेष म्हणजे विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी) आणि अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (एआयसीटीई) आदेशानुसार अभियांत्रिकीसह, वैद्यकीय, कृषी, हॉटेल मॅनेजमेंट आदींच्या दुरस्थ शिक्षणाला परवानगी नाही. तसेच संबंधित विद्यापीठांना इतर राज्यांतील विद्यार्थ्यांना अशा पदव्या देण्याचे अधिकार नाहीत.

याबाबत यूजीसी आणि एआयसीटीईने वेळोवेळी आदेश काढून या पदव्या नियमबाह्य असल्याचे स्पष्ट केले आहे. असे असताना या परराज्यातील विद्यापीठांकडून बोगस पदव्यांची खैरात वाटप सुरू आहे आणि त्याआधारे राज्यातील महापालिकांमध्ये पदोन्नती प्रक्रिया देण्याचे काम सुरू आहेत. आता पिंपरी-चिंचवड महापालिकेने यापुढे पदोन्नतीसाठी परराज्यातील पदवी आणि पदविका ग्राह्य धरली जाणार नसल्याचे स्पष्ट लेखी आदेश काढले आहेत.

"परराज्यातील पदव्यांबाबत अद्याप निर्णय झालेला नाही. पिंपरी-चिंचवड महापालिकेने काढलेल्या आदेशाबाबत माहिती घेऊन कार्यवाही करण्यात येईल.
-सचिन इथापे,
उपायुक्त, सेवकवर्ग विभाग.

### पिंपरी-चिंचवड महापालिकेचा काय आहे आदेश

राज्याबाहेरील विद्यापीठामार्फत दुरस्थ तंत्रशिक्षण अभ्यासक्रमाच्या माध्यमातून धारण केलेली पदवी/पदविका विधी ग्राह्य आहे की नाही याबाबत शासनाच्या विविध प्राधिकरणामार्फत आलेले आदेश आणि सूचना यांचा एकत्रित अभ्यासानुसार राज्याबाहेरील मान्यता नसलेल्या विद्यापीठ व शैक्षणिक संस्थेची पदवी किंवा पदविका ग्राह्य धरली जाणार नाही, असे लेखी आदेश आयुक्त शेखर सिंह यांनी काढले आहेत.

### पुणे महापालिकेतील निर्णयाचे घोंगडे भिजतच

पुणे महापालिकेने डिसेंबर २०२१ मध्ये ४१ जागांसाठी पदोन्नती प्रक्रिया राबविली. त्यात १८ कर्मचाऱ्यांनी परराज्यातील विद्यापीठांच्या पदवी आणि पदविका प्रमाणपत्र सादर केले. मात्र, पदव्यांना 'आप'सह काही राजकीय पक्षांनी विरोध केल्याने ही प्रक्रिया थांबविण्यात आली. अद्याप त्यावर काहीच निर्णय घेण्यात आलेला नाही. जर पिंपरी-चिंचवड महापालिकेने याबाबत आता स्पष्ट भूमिका घेऊन परराज्यातील पदव्यांना बंदी घालण्याचा निर्णय घेतला असेल, तर पुणे महापालिकेने यासंबंधीच्या निर्णयाचे घोंगडे भिजत का ठेवले आहे, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

My Pune Edition
Feb 20, 2023 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During February 2023*

### *Section: Education*

पुढारी

# परीक्षार्थींचा टक्का वाढला

## पाच वर्षांतील सर्वाधिक विद्यार्थी नोंदणी, आजपासून बारावीची परीक्षा

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (राज्य मंडळ) आजपासून (दि. २१) राज्यात बारावीची परीक्षा सुरू होणार आहे. परीक्षेसाठी यंदा गेल्या पाच वर्षांतील सर्वाधिक विद्यार्थी नोंदणी झाली असून, ३ हजार १९५ मुख्य केंद्रांवर १४ लाख ५७ हजार २९३ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. परीक्षेच्या तयारीबाबत राज्य मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. मंडळाच्या सचिव अनुराधा ओक, माणिक बांगर यांच्यासह अन्य पदाधिकारी या वेळी उपस्थित होते.**



**सदाशिव पेठेतील भावे स्कूलमध्ये सोमवारी बाकावर नंबर टाकताना शिक्षक.**

राज्यात २१ फेब्रुवारी ते २१ मार्च या कालावधीत बारावीची परीक्षा होत आहे. १० हजार ३८८ कनिष्ठ महाविद्यालयांमधून परीक्षेसाठी नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये ७ लाख ९२ हजार ७८० मुले, ६ लाख ६४ हजार ४४१ मुली आहेत. विद्यार्थ्यांवर परीक्षेचा मानसिक ताण येऊ नये, यासाठी दहा समुपदेशकांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच, राज्य मंडळ आणि विभागीय मंडळात नियंत्रण कक्षाद्वारे हेल्पलाइनची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

गोसावी म्हणाले की, कोरोनाकाळात दिलेल्या सवलती यंदा रद्द केल्या आहेत. त्यामुळे प्रचलित पद्धतीने परीक्षा घेतली जाईल. कॉपीमुक्त अभियान राबविण्यासाठी यंदा पहिल्यांदाच उच्चस्तरीय बैठक झाली. परीक्षेच्या निर्धारित वेळेपूर्वी विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका आकलनासाठी दहा मिनिटे देण्याऐवजी परीक्षेच्या शेवटी दहा मिनिटे दिली जातील. केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाकडून (सीबीएसई) विद्यार्थ्यांना वीस मिनिटे आधी दिली जातात. त्यामुळे पालक-विद्यार्थ्यांची मागणी लक्षात घेऊन निर्धारित वेळेनंतर दहा मिनिटे वाढवून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. गैरप्रकार रोखण्यासाठी राबविल्या जाणाऱ्या कृती कार्यक्रमासाठी विविध घटकांकडून २३८ सूचना प्राप्त झाल्या. त्यातील काही सूचनांची अंमलबजावणी करण्यात आली आहे.

### गैरप्रकार रोखण्यासाठी उपाययोजना

- विभागीय मंडळ, जिल्हाधिकारी स्तरावरून प्रत्येक परीक्षा केंद्रावर भरारी आणि बैठे पथक
- परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरातील झेरॉक्स सेंटर बंद ठेवणार
- जीपीएसद्वारे सहायक परिरक्षकाकडील प्रश्नपत्रिकांच्या वाहतुकीवर लक्ष. प्रश्नपत्रिका वितरणापर्यंत मोबाईलद्वारे चित्रीकरण.
- नव्या केंद्रांवर सीसीटीव्ही बंधनकारक.

### ...२१ मार्चनंतर प्रात्यक्षिक परीक्षा

उच्च शिक्षण शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा संप असला, तरी बारावीच्या विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक परीक्षा पूर्ण झाली आहे. मात्र, विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक परीक्षा झाल्या नसल्यास त्या २१ मार्चला लेखी परीक्षा संपल्यावर घेतल्या जातील, असे गोसावी यांनी स्पष्ट केले आहे.

### संपाचा परीक्षेवर परिणाम नाही

शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा संप, परीक्षा कामकाजावर बहिष्काराच्या इशाऱ्याबाबत गोसावी म्हणाले की, संघटनांशी चर्चा केली आहे. त्यांच्या मागण्यांतील काही मुद्दे धोरणात्मक असल्याने त्याबाबत शिक्षणमंत्र्यांकडून निर्णय घेतला जाईल. शिक्षणमंत्र्यांसोबतच्या चर्चेतून तोडगा निघेल, अशी अपेक्षा आहे. त्यामुळे या संपाचा परीक्षेवर परिणाम होणार नाही.

| शाखा | नोंदणी झालेले विद्यार्थी |
|---|---|
| विज्ञान | ६ लाख ६० हजार ७८० |
| कला | ४ लाख ४ हजार ७६१ |
| वाणिज्य | ३ लाख ४५ हजार ५३२ |
| व्होकेशनल | ४२ हजार ९५९ |
| टेक्निकल सायन्स | ३ हजार २६१ |
| एकूण | १४ लाख ५७ हजार २९३ विद्यार्थी |

Pune Edition
Feb 21, 2023 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During February 2023*

## *Section: Education*

पुढारी

## बारावीची परीक्षा आजपासून

**पुणे** : राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे मंगळवार (दि. २१)पासून बारावीची परीक्षा सुरू होणार आहे. परीक्षेच्या निर्धारित वेळेपूर्वी किमान अर्धा तास अगोदर केंद्रावर पोहोचण्याच्या सूचना परीक्षार्थींना देण्यात आल्याचे मंडळाच्या सूत्रांनी स्पष्ट केले.

परीक्षेसाठी एकूण तीन हजार १९५ केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. कृती आराखड्याद्वारे यंदा परीक्षेतील गैरप्रकार रोखण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. बारावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते २१ मार्च या कालावधीत सर्वसाधारण, द्विलक्षी विषय आणि उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम यांची परीक्षा होईल.

**(सविस्तर वृत्त पान ३ वर)**



Pune Edition
Feb 21, 2023 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

लोकमत

## इंग्रजीच्या पेपरात प्रश्नांऐवजी उत्तरे!

### बारावी परीक्षा : बोर्डाची लक्तरे वेशीवर

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई/पुणे** : बारावी परीक्षेच्या पहिल्याच दिवशी राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा गोंधळ समोर आला असून, इंग्रजीच्या पेपरमधील तीन प्रश्नांमध्ये चक्क उत्तरच (मॉडेल अँन्सर) छापून आले.

प्रश्नपत्रिकेतील त्रुटीबाबत संयुक्त सभेच्या अहवालानुसार विद्यार्थ्यांना योग्य तो न्याय देण्यात येईल, असे राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या सचिव अनुराधा ओक यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे या चुकांचे सहा गुण परीक्षार्थीला मिळण्याची शक्यता आहे.

**पेपर व्हॉट्सअॅपवर :** वाशिम जिल्ह्यात मालेगाव तालुक्यातील शिरपूर जैन येथे २२ मिनिटांतच इंग्रजीच्या पेपरची १२ ते १५ छायाचित्रे मोबाइलवर व्हायरल झाली. यवतमाळ जिल्ह्यातील मुकुटबन (ता. झरी) येथील महाविद्यालयातील केंद्रावरूनही पेपर व्हायरल झाला असून पोलिसांनी केंद्रप्रमुखासह तिघांविरुद्ध गुन्हे दाखल केले.

### विषयतज्ज्ञांची बैठकच नाही...

मुलांना पेपर सोपविण्यापूर्वी त्यात चुका नाहीत ना, यासाठी बोर्डाच्या विषयतज्ज्ञांची विशेष बैठक होत असते. यात पेपरमधील छपाईदोष व चुकांबाबत पडताळणी होते. यावेळी मात्र शिक्षकांचे बहिष्कार आंदोलन सुरू असल्याने अशी विषयतज्ज्ञांची बैठक होऊ शकली नाही.

### झाले काय?

- ८० गुणांच्या इंग्रजीच्या कृतिपत्रिकेत प्रश्न क्रमांक ३ मध्ये कवितेवर आधारित १४ गुणांचे प्रश्न विचारले जातात.
- मात्र प्रश्नपत्रिकेत ए-३, ए-४, ए-५ या तीन कृतींमध्ये दोन प्रश्न छापण्यात आलेले नाहीत, तर प्रश्नाऐवजी उत्तर छापण्यात आले. त्यामुळे विद्यार्थी संभ्रमात पडले.
- मंडळाने तयार केलेल्या नमुना उत्तरपत्रिकेतील ए-३, ए-४, ए-५ ही उत्तरे सूचनांसह जशीच्या तशीच कृतिपत्रिकेत छापून आली आहेत.

Pune Main
Page No. 3 Feb 22, 2023
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During February 2023*

### *Section: Education*

लोकमत

# पहिलाच इंग्रजीचा पेपर गेला सोप्पा, पण वेळ पुरला नाही...

## परीक्षा सभागृहातून बाहेर पडताच मुलांच्या चेहऱ्यावर झळकला आनंद ; पालकही झाले चिंतामुक्त

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** दहावीच्या परीक्षा झाल्या नसल्याने आयुष्यात पहिल्यांदाच बोर्डाची परीक्षा दिली. पहिलाच पेपर इंग्रजीचा असल्याने मनात धाकधूक होती. परीक्षा सुरू झाल्यानंतर परीक्षेची भीती दूर झाली आणि मग बिनधास्त प्रश्नपत्रिका सोडवीत उत्तरे लिहिली. मात्र, वेळ पुरला नाही, असेही यावेळी परीक्षा देऊन कॉलेजबाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर झळकलेला आनंद पाहून महाविद्यालयांबाहेर त्यांची प्रतीक्षा करणारे पालकही चिंतामुक्त झाल्याचे चित्र पाहावयास मिळाले.

राज्य मंडळाच्या बारावीच्या परीक्षा मंगळवारपासून (दि. २१) सुरू झाल्या आहेत. दरम्यान, पहिल्याच दिवशी इंग्रजीचा पेपर होता. यामुळे काहींना तो सोपा तर काही जणांना कठीण गेल्याच्या संमिश्र प्रतिक्रीया विद्यार्थ्यांनी दिल्या आहेत. यावर्षी बारावीची परीक्षा देणारे विद्यार्थी पहिल्यांदा बोर्डाच्या लेखी परीक्षेला सामोरे जात होते.

विद्यार्थ्यांसह त्यांना केंद्रावर सोडायला आलेल्या पालकांच्या चेहऱ्यावरही तणाव दिसत होता. परीक्षा झाल्यानंतर निर्धारित वेळेत उत्तरपत्रिका लिहिताना त्यांची दमछाक झाली असल्याचे अनेकांनी सांगितले. दरम्यान, बारावीच्या परीक्षेसाठी शहरातील महाविद्यालयांकडून जय्यत तयारी करण्यात आली होती. परीक्षेदरम्यान शहरात कोठेही गैरप्रकार घडला नाही. सर्वत्र शांततेत परीक्षा पार पडल्या.



इंग्रजीचा पहिला पेपर सुटल्यानंतर विद्यार्थ्यांसह पालकांनी समाधान व्यक्त केले.

### पालकांच्या चेहऱ्यावर खुलले हास्य

पहिला पेपर असल्याने पालकांनीही परीक्षा केंद्रावर मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. साधारण दोन वर्षांनंतर मुले शंभर टक्के अभ्यासक्रमासह परीक्षा देत आहेत. त्यामुळे मुलांसोबत त्यांचे पालकही तणावात दिसून आले. अनेकजण परीक्षा संपेपर्यंत केंद्राबाहेर उभे होते. मात्र, परीक्षा झाल्यानंतर मुलांसह त्यांच्या चेहऱ्यावर हास्य खुलले.

### वाहतूककोंडीमुळे परीक्षा केंद्र गाठताना पळापळ

बारावी परीक्षेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांसह पालकांना शहरातील विविध भागात रस्त्यांवरील वाहतूककोंडीला सामोरे जावे लागले. वाहतूककोंडीची पूर्वकल्पना असल्याने अनेकजण दोन तासांपूर्वी घरातून निघाले होते. पुणे विद्यापीठ चौक, नळस्टॉप चौक, सिंहगड रस्ता, डेक्कन परिसर तसेच परीक्षा केंद्राजवळील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली होती. त्यामुळे अनेकांनी परीक्षा केंद्रापासून दूर अंतरावर वाहन उभे करून पायी जात परीक्षा केंद्र गाठले.

आज पहिला पेपर, तोही इंग्रजीचा असल्याने



सकाळपासून थोडा ताणावात होतो. मात्र, चांगली तयारी करून आल्याने पेपर सोपा गेला. आता बारावीच्या परीक्षेचा अर्धा ताण संपल्यासारखे वाटत आहे.

- रणजित शिंदे

दोन - तीन वर्षांनंतर आज बोर्डाची परीक्षा झाली. यामुळे



आज कॉलेजमधील वातावराण थोडे वेगळेच जाणवले. मी अभ्यास चांगला केलेला असल्यामुळे मला हा पेपर चांगला गेला आहे.

- नियती गजमल

पेपर सुरू होईपर्यंत प्रश्नपत्रिका कशी असेल? काय प्रश्न



असतील? याची उत्सुकता होती. मात्र, पेपर खूप सोपा होता. मला उत्तरे लिहिण्यासाठी वेळ कमी पडला. मात्र, तरीही मला चांगले मार्क पडतील.

- शाहिस्ता शेख

पहिल्यांदा बोर्डाच्या परीक्षेला सामोरा गेलो. उत्तरपत्रिका



लिहिण्यासाठी वेळ लागला. परीक्षेच्या दृष्टीने मागील सहा महिन्यांपासून अभ्यास केला. पूर्वतयारी म्हणून प्रश्नपत्रिका सोडविल्या त्याचा आज फायदा झाला.

- ध्रुव पाटील

Pune Main
Page No. 2 Feb 22, 2023
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During February 2023*

### *Section: Education*

सकाळ

# बारावीच्या पहिल्याच पेपरमध्ये चूक

## राज्य मंडळाचा ढिसाळ कारभार; विद्यार्थ्यांना मिळणार सहा गुण

**पुणे, ता. २१ :** राज्यात बारावीच्या बोर्डाच्या परीक्षेला मंगळवारपासून (ता. २१) सुरुवात झाली. मात्र, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या ढिसाळ कारभारामुळे पहिल्याच दिवशी इंग्रजीच्या प्रश्नपत्रिकेत चूक आढळली. या चुकीबद्दल विद्यार्थ्यांना सहा गुण द्यावे लागणार आहेत.

बारावीच्या विद्यार्थ्यांचा मंगळवारी इंग्रजीचा (०१) पहिला पेपर होता. या पेपरमध्ये कवितेवर आधारित तिसऱ्या क्रमांकाच्या प्रश्नात ए-३ आणि ए-५ क्रमांकाचे प्रश्न राज्य

**पान ८ वर >>**

> प्रथमदर्शनी प्रश्नपत्रिकेत छपाईची चूक झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे संबंधित प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केलेल्या विद्यार्थ्यांनाच संबंधित प्रश्नांचे गुण दिले जातील. प्रश्नपत्रिकेत दोन प्रश्न छापलेले नाहीत, तर एका प्रश्नाऐवजी उत्तरच छापले आहे. याबाबत परीक्षेच्या मुख्य नियामकांचा अहवाल घेण्यात येईल. त्यात चूक निदर्शनास आल्यानंतर संबंधित प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केलेल्या विद्यार्थ्यांना गुण दिले जाणार आहेत.
>
> **- शरद गोसावी,** अध्यक्ष,
> महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ

Pune, Main
22/02/2023 Page No. 1

सकाळ

# बारावीच्या पहिल्याच पेपरमध्ये चूक

**>> पान १ वरून**

मंडळाकडून छापण्यातच न आल्याचा प्रकार समोर आला. तर याच प्रश्नात ए-४ क्रमांकाचा प्रश्न विचारण्याऐवजी त्याठिकाणी उत्तर छापण्यात आले. त्यामुळे परीक्षेदरम्यान विद्यार्थ्यांमध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. हे तिन्ही प्रश्न प्रत्येकी दोन गुणांचे असून, एकूण सहा गुणांच्या प्रश्नांत परीक्षेच्या पहिल्याच दिवशी चूक आढळून आली.

याबाबत राज्य मंडळास विचारणा केली असता, प्रश्नपत्रिकेच्या छपाईत चूक झाल्याचे स्पष्टीकरण त्यांनी दिले आहे. यावर राज्य मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी म्हणाले, ''प्रश्नपत्रिकेत छपाईची चूक झाल्याचे खरे आहे. याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार राज्य मंडळाला नाही, तर परीक्षेच्या नियामकांकडून याबाबत अहवाल मागविण्यात येईल. त्यांच्या अहवालात प्रश्नपत्रिकेत चूक झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर संबंधित प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करणाऱ्या विद्यार्थ्यांना सहा गुण दिले जातील.''




बारावीच्या इंग्रजी विषयाच्या प्रश्नपत्रिकेत आढळलेली चूक.

याशिवाय बारावीच्या पहिल्याच दिवशी झालेल्या इंग्रजीच्या प्रश्नपत्रिकेत आणखी एक चूक झाल्याचे शिक्षकांचे म्हणणे आहे. प्रश्नपत्रिकेत तीन क्रमांकाच्या 'बी' प्रश्नांमध्ये कवितेचे 'अॅप्रीसिएशन' करण्यास सांगणारा चार गुणांचा प्रश्न विचारला आहे. हे 'अॅप्रीसिएशन' कशाच्या आधारे करायचे, यासंदर्भात प्रश्नांमध्येच मुद्दे देणे अपेक्षित होते. परंतु, हे मुद्दे प्रश्नपत्रिकेत दिलेले नाही, असे इंग्रजीच्या शिक्षकांचे म्हणणे आहे. मात्र, याबाबत राज्य मंडळाने अद्याप कोणताही खुलासा केलेला नाही. परीक्षेच्या नियामकांच्या अहवालानंतर याबाबतही चित्र स्पष्ट होण्याची चिन्हे आहेत.

प्रचलित पद्धतीप्रमाणे इंग्रजी विषयाची संयुक्त सभा विषयतज्ज्ञ, सर्व विभागीय मंडळाचे प्रमुख नियामक यांच्या समवेत आयोजित केली होती. परंतु, शिक्षकांच्या धोरणात्मक मागण्यांबाबत बहिष्कार असल्यामुळे ही सभा होऊ न शकल्याचे स्पष्टीकरण राज्य मंडळाने दिले आहे. ''इंग्रजी विषयाच्या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांमध्ये निदर्शनास आलेल्या त्रुटीबाबत मुख्य नियामकांची संयुक्त सभा पुन:श्च आयोजित करण्यात येणार आहे. प्रश्नपत्रिकेतील त्रुटीबाबत संयुक्त सभेच्या अहवालानुसार विद्यार्थ्यांना योग्य तो न्याय देण्यात येईल,'' असे राज्य मंडळाच्या सचिव अनुराधा ओक यांनी प्रकटनाद्वारे स्पष्ट केले आहे.

Pune, Main
22/02/2023 Page No. 8

## *News Paper Clippings During February 2023*

### *Section: Education*

# बारावीची परीक्षा 'शिस्तीत' सुरू

## साखर, पेढे, गुलाबपुष्प देऊन विद्यार्थ्यांचे शिक्षकांकडून स्वागत

पुणे, दि. २१ - महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात येणाऱ्या बारावीच्या परीक्षेला मंगळवार (दि.२१) पासून सुरूवात झाली. परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या काही सवलती यंदाच्या परीक्षेत रद्द करण्यात आल्या. कॉपीमुक्तीच्या पार्श्वभूमीवरील नियमावलीनुसार आता परीक्षा 'शिस्तीत' सुरू झाली आहे.

बारावीच्या परीक्षेसाठी राज्यातील नऊ विभागीय मंडळातून एकूण १४ लाख ५७ हजार २९३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. यात ७ लाख ९२ हजार ७८० मुले, तर ६ लाख ६४ हजार ४४१ मुलींचा समावेश आहे. ३ हजार १९५ परीक्षा केंद्रांवर परीक्षेला सुरुवात झाली आहे. करोनाच्या प्रादुर्भावाच्या कालावधीत झालेल्या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना काही सवलती देण्यात आल्या होत्या. यंदाच्या परीक्षेत या सर्व सवलती रद्द करण्यात आल्या. नियमीतपणे होणाऱ्या परीक्षेप्रमाणेच नियमावलीनुसार आता परीक्षा सुरू झाली आहे. पहिला इंग्रजी विषयाचा पेपर सोपा असल्याची प्रतिक्रिया विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.



**एस.पी. कॉलेज** : बारावी परीक्षेचा पहिला पेपर इंग्रजी विषयाचा असल्याने परिक्षा सुरू होण्यापूर्वी विद्यार्थिनी नोट्स पाहताना.

प्रभात PuneCity, 22 Feb 2023, Page:013
https://epaper.dainikprabhat.com

# *News Paper Clippings During February 2023*

## *Section: Education*

# उत्तरपत्रिका तपासणीवर बहिष्कार

म. टा. प्रतिनिधी, पुणे

राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयाच्या शिक्षकांच्या मागण्या जैसे-थे असल्याने, त्यांनी बारावी परीक्षेच्या उत्तरपत्रिका तपासणीवर बहिष्कार टाकला आहे. त्यानुसार परीक्षेच्या पहिल्याच दिवशी इंग्रजीच्या उत्तरपत्रिका तापसणीवर मुख्य नियामकांनी (मॉडरेटर) बहिष्कार घातला असून, यापुढील विषयांच्या उत्तरपत्रिकांही न तपासण्याची भूमिका महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाच्या शिक्षकांनी मांडली. अशाने बारावीचा निकाल रखडण्याची शक्यता आहे.



**महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाच्या शिक्षकांनी मागण्यांचे निवेदन राज्य मंडळाच्या सचिव अनुराधा ओक यांना मंगळवारी दिले.**

**मागण्या काय?**

- १ नोव्हेंबर २००५ पूर्वी विना; तसेच अंशतः अनुदानावरील शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करावी.
- १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त झालेल्या शिक्षकांना जुनी पेन्शन योजना द्यावी.
- वाढीव पदांना रुजू दिनांकापासून मंजुरी द्यावी आणि आयटी विषय अनुदानित करावा.

**संयुक्त सभेवर बहिष्कार**

महासंघाच्या पुणे विभागाच्या वतीने शिक्षकांनी उत्तरपत्रिकांच्या तपासणीवर बहिष्कार टाकण्याचे आंदोलन मंगळवारी केले आहे. त्यानुसार इंग्रजी विषयाच्या मुख्य नियामकांची सभा रद्द करण्यात आली आहे. मागण्या पूर्ण होईपर्यंत उत्तरपत्रिका तपासण्यात येणार नाही; तसेच संयुक्त सभेवरही बहिष्कार घालण्याचे धोरण स्वीकारण्यात आले आहे. त्यामुळे यापुढील सभाही होणार नसल्याचे शिक्षकांनी सांगितले.

**आज होणार बैठक**

या वेळी शिक्षकांनी आपल्या मागण्यांचे निवेदन राज्य मंडळाच्या सचिव अनुराधा ओक यांना दिले. महासंघाचे पदाधिकारी संतोष फाजगे, अविनाश तळेकर, एम. एस. शहापुरे, तुकाराम साळुंखे, राहुल गोलांदे आदी उपस्थित होते. प्रलंबित मागण्या सोडविण्याबाबत शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांची शिक्षकांसोबत आज, बुधवारी बैठक होणार आहे. यात तोडगा निघण्याची शक्यता आहे.

Maharashtra Times 22.2.2023

"On February 19, a resi- deputy conservator of forest, death. Later in the evening, sic examination.

# Colleges keen to award degrees may have to 'delink' from jr sections

Yogita Rao@timesgroup.com

**NEP SCRIPTS A SEPARATION**

**What National Education Policy says about delinking junior and senior sections**

Curricular and pedagogical structure and curricular framework for school education will be guided by a 5+3+3+4 design, consisting of

- foundational stage (in two parts, that is, 3 years of anganwadi/pre-school + 2 years in primary school in grades 1-2, for ages 3-8)
- preparatory stage (grades 3-5, covering ages 8-11)
- middle stage (grades 6-8, covering ages 11-14)
- secondary stage (grades 9-12 in two phases covering ages 14-18)

Autonomous degree-granting College (AC) will refer to a large multidisciplinary institution of higher learning

- that grants undergraduate degrees
- is primarily focused on undergraduate teaching though not restricted to that
- it would generally be smaller than a



Mumbai: Admissions to degree courses will be based on merit or preferably on the Common University Entrance Test (CUET) in colleges seeking to confer degrees, in line with the National Education Policy (NEP).

To attain this status, degree-awarding colleges need not de-link from junior colleges under their roof but consider having a merit-based quota for in-house students, said University Grants Commission chairman M Jagadesh Kumar speaking to TOI. The junior college will be part of the school education structure. He said the state government can decide to reserve a certain number of seats for in-house class XII students based on the CUET merit list. "UGC will not recommend any percentage for such in-house admissions," he said. Leading autonomous colleges in Mumbai are aspiring to become degree-awarding institutions. SVKM's Mithibai College has already initiated the delinking process.

"Grades 11th and 12th are an integral part of school education and the qualifications will continue to be awarded per their affiliation with national or state-level boards. The undergraduate-level programmes are part of higher education and the universities award the degrees. However, the delineation of physical infrastructure is entirely optional," said Kumar. While the NEP mandates an autonomous degree-granting college to primarily focus on undergraduate education, Kumar said the policy states it need not be restricted to it. "In the earlier system, the 10+2 structure included grades 11 and 12 as higher secondary, pre-university or junior college, but in NEP 2020, restructuring of school education was done starting from age three and will be guided by the 5+3+3+4 design, where the last four years of schooling includes grades 9 to 12. But the described stages are purely curricular and pedagogical, designed to optimise learning based on cognitive development, but parallel changes to physical infrastructure will not be required. The management can offer grades 9&10 along with grades 11&12, but it is not mandatory," said Kumar. Delinking will make the junior and senior section independent entities; whether in-house admissions after class XII will continue will be decided by the state. Direct in-house admissions to traditional courses such as BA, BCom and BSc gives in-house students an edge in leading colleges.

An official said the department is planning a meeting with the autonomous colleges soon to discuss the policy.

The Times of India 22.2.2023

# *News Paper Clippings During February 2023*

## *Section: Education*

{ HSC EXAMS } STATE BOARD SAYS NO INJUSTICE WILL BE DONE WITH STUDENTS

# 3 errors in English exam; board to consult experts

The error was in the poetry section. In one question, answers were given. Two included instruction meant for examiners

**Dheeraj Bengrut**

dheeraj.bengrut@htlive.com

**PUNE:** The Higher Secondary Certificate (HSC) examinations commenced on Tuesday with much fanfare, however, an error was recorded in the first paper, as the state board erroneously printed the synoptic answers in place of three sub-questions. Despite the error in three questions, state board says no injustice will be done with students.

The error was noticed in the poetry section of the English paper, which was held from 11 am to 2 pm. In Question 3, students were unable to decipher sub-questions no. A3, A4, and A5. In one question, answers were given. Two other questions included instruction meant for examiners while assessing the answer sheet. These questions were allotted two marks each, totalling six marks.

Speaking to HT, Anuradha Oak, secretary of the state board said, "I have come to know about the error. A joint meeting of the Board of Studies in English and chief moderators of all divisions was to take place today, but they couldn't meet. Once the experts meet, the board will come to know about the issue exactly and will take a decision accordingly. However, I assure that no injustice will be done to students and they should not worry about it."

In a statement issued on Monday, the state board said, "On February 21, three errors were found in the English paper of Class 12 students. A meeting of the board members will be held and decision will be taken."

In the absence of any clarification, many students did not solve the questions. Parents have demanded that students be granted full marks.

Pranjali Mhetre a student said, "While going through the question paper, we were surprised to see answers written instead of questions in the poetry section. Many students at our exam centre asked authorities for clarifications, but they were unable to address our issues. Some students did not solve the questions."

Archana Kalantri a parent whose daughter is appearing for HSC exams said, "It is surprising that the board made such an error. Lakhs of students got confused, and every single mark matters in the board exams. So, loosing six marks will be a major problem for students.State board either should give 6 marks to all those students who have attempted the question or find a better solution on this issue."



Class 12 exams began on Tuesday. Students seen writing the paper at SP College. RAHUL RAUT/HT PHOTO

# Colleges welcome students with flowers, sweets on first day

**Dheeraj Bengrut**

dheeraj.bengrut@htlive.com

**PUNE:** The Higher Secondary Certificate (HSC) or Class 12 exams began in the city on Tuesday. This will be the first HSC exams to be held with full syllabus after Covid-19. Last year's exams were held with only 75% syllabus.

At several junior colleges in the city, students were welcomed with flowers, sweets as college administration cheered and wished them luck.

At all prominent colleges in the city, students were seen reaching well before time for the 11 am paper. Students were also given 10 minutes extra.

Ravindrasinh Pardeshi, principal of Fergusson College said, "We had made all necessary arrangements at our college for students coming for the HSC board exams. As it was the first day, the staff welcomed the students. All classroom and bench arrangements were made day prior, and only students were allowed at the examination centre."

Kavita Jain, a Class 12 student said, "We had English paper on Tuesday and it was quite easy. However, since we haven't had writing practice for the past two years, we struggled to complete the paper on time. We were also given ten extra minutes at the end of the paper."

A total of 14,57,293 students will be appearing for Higher Secondary Certificate (HSC) or Class 12 exams at 10,388 centres in the state.

Hindustan Times 22.2.2023

# News Paper Clippings During February 2023

## Section: Education

# कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांचे बहिष्कार आंदोलन सुरूच

**पुणे :** विविध प्रलंबित मागण्यांसाठी बारावीच्या उत्तरपत्रिका तपासणीवर बहिष्कार घातलेल्या महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक महासंघाच्या पदाधिकाऱ्यांशी शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी बुधवारी बैठक घेतली. या बैठकीचे इतिवृत्त मिळाल्यानंतरच महासंघाच्या कार्यकारिणीच्या बैठकीत पुढील निर्णय घेतला जाणार असून, तोपर्यंत बहिष्कार कायम ठेवला जाणार आहे.

वाढीव पदांना रूजू दिनांकापासून मंजुरी द्यावी, आयटी हा विषय अनुदानित करावा, १ नोव्हेंबर २००५पूर्वी विना तसेच अंशतः अनुदानित शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करावी आणि सेवानिवृत्तांना तातडीने लाभ द्यावा, १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, १०,२०,३० वर्षांची आश्वासित प्रगती योजना शिक्षकांना त्वरित लागू करावी, निवडश्रेणीसाठीची २० टक्क्यांची अट रद्द करावी, शिक्षकांची रिक्त पदे तातडीने भरावीत, निवृत्तीचे वय साठ वर्षे करावे आदी मागण्या संघटनेने केल्या आहेत. या मागण्यांसाठी बारावीच्या उत्तरपत्रिका तपासणीवर बहिष्कार घालण्यात आला आहे. या बहिष्कारामुळे इंग्रजी विषयाच्या प्रश्नपत्रिकेतील चुकांबाबत राज्य मंडळ, मुख्य नियामकांची बैठक होऊ शकली नाही. त्यामुळे चुकांसाठीचे गुण देण्याचा निर्णय झालेला नाही.

या पार्श्वभूमीवर शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी महासंघाच्या पदाधिकाऱ्यांसह बैठक घेऊन मागण्यांबाबत चर्चा करत बहिष्कार मागे घेण्याचे आवाहन केले. महासंघाचे सरचिटणीस प्रा. संतोष फाजगे आणि समन्वयक प्रा. मुकुंद आंदळकर म्हणाले, की बैठकीत मागण्यांबाबत सकारात्मक चर्चा झाली. मात्र या बैठकीचे इतिवृत्त मिळाल्यावर महासंघाच्या कार्यकारिणीची बैठक होईल. त्या बैठकीत बहिष्कार सुरू ठेवायचा की मागे घ्यायचा या बाबत निर्णय घेतला जाईल. त्यामुळे सध्या बहिष्कार कायम राहणार आहे.

लोकसत्ता Thu, 23 February 2023 https://epaper.loksatta.com/c/

लोकमत

# शिक्षण मंडळाचा बारावी परीक्षेत चुकांचा पाढा

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्य शिक्षण मंडळाच्या इंग्रजी प्रश्नपत्रिकेत याही वर्षी चुका झाल्याचे समोर आल्यानंतर सर्व स्तरांतून संताप व्यक्त केला जात आहे. इंग्रजी प्रश्नपत्रिकेत गेल्या वर्षी सात, तर या वर्षी तीन चुका झाल्याचे निदर्शनास आले. राज्य मंडळाच्या विविध विभागीय मंडळांचे तज्ज्ञ शिक्षक मिळून एक अचूक प्रश्नपत्रिका तयार करू शकत नाहीत का, असा सवाल पालक उपस्थित करीत असून, राज्य शिक्षण मंडळ लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळत असल्याचा संताप व्यक्त केला आहे.

दहावीची परीक्षा न दिल्यामुळे विद्यार्थी पहिल्यांदाच बोर्डाच्या परीक्षेला सामोरे जात होते. पहिलाच पेपर इंग्रजीचा असल्याने विद्यार्थी तणावात होते. त्यामध्ये प्रश्न विचारण्यातच चुका केल्याने अनेकजण संभ्रमात पडले. प्रश्न समजून घेण्यात अनेकांचा वेळ गेला. प्रश्न न समजल्याने असंख्य विद्यार्थ्यांनी हा प्रश्नच सोडून दिला. त्यामुळे विद्यार्थ्यांचे ६ गुणांचे नुकसान होणार आहे. इंग्रजी विषयाच्या प्रश्न क्रमांक-3 अंतर्गत ए-३, ए-४ व ए-५ या प्रश्नांऐवजी 'मॉडेल अॅन्सर'मधील ए-३ व ए-५ यात शिक्षकांना देण्यात येणाऱ्या सूचना व ए-४ कृतीमध्ये मॉडेल अॅन्सरचे उत्तर छापण्यात आले. दरम्यान, विद्यार्थ्यांना योग्य तो न्याय देण्यात येईल, असे मंडळाने जाहीर केले आहे.

## ही अधिकाऱ्यांची चूक : मनविसे

प्रश्नपत्रिकेत झालेल्या चुका छपाई विभागाची नसून, अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे झाली आहे. प्रश्नपत्रिकांचे प्रुफ तपासणीकडे अधिकाऱ्यांनीही लक्ष दिले पाहिजे, त्यामुळे दोषी अधिकाऱ्यावर कारवाई करावी आणि सर्व विद्यार्थ्यांना सरसकट सहा गुण द्यावेत अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेतर्फे करण्यात आली. सचिव अनुराधा ओक यांची भेट घेऊन मागणीचे निवेदन दिले. या वेळी राज्य संघटक प्रशांत कनोजिया, सचिव आशिष साबळे, सदस्य रुपेश घोलप, सारंग सराफ, पुणे शहराध्यक्ष अमोल शिंदे, उपाध्यक्ष विक्रांत भिलारे, अॅड. सचिन ननावरे, सागर कुलकर्णी, केतन डोंगरे, आशुतोष माने, नीलेश जोरी उपस्थित होते.



इंग्रजी विषयासाठी विषयतज्ज्ञ व सर्व विभागीय मंडळाचे प्रमुख नियामक यांची संयुक्त बैठक आयोजित केली होती; पण शिक्षकांच्या बहिष्कारामुळे ती होऊ शकली नाही. इंग्रजी प्रश्नपत्रिकेतील त्रुटीबाबत मुख्य नियमकांची संयुक्त सभा आयोजित केली आहे. त्या संयुक्त सभेच्या अहवालानुसार विद्यार्थ्यांना योग्य तो न्याय देण्यात येईल.

\- **अनुराधा ओक**, सचिव, शिक्षण मंडळ

## हिंदीच्या पेपरमध्येही चुका

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** इंग्रजीच्या प्रश्नपत्रिकेत प्रश्नाची उत्तरेच छापून आल्याचा प्रकार ताजा असतानाच, बारावी परीक्षेच्या दुसऱ्या दिवशी बुधवारी हिंदीच्या प्रश्नपत्रिकेतही घोळ झाल्याचे उघडकीस आले.

राज्य शिक्षण मंडळाकडून या संदर्भात रात्री उशिरापर्यंत कोणतेही स्पष्टीकरण देण्यात आले नव्हते. मंडळाने किमान या प्रश्नांचे गुणदान कसे करणार, याची माहिती द्यावी, अशी मागणी पालक करीत आहेत.

### नेमका घोळ काय?

- हिंदीच्या प्रश्नपत्रिकेत प्रश्न क्रमांक दोनमध्ये चार शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहायचे होते. मात्र, या शब्दांचे क्रमांक १,२,१,२ असे देण्यात आले. ते १,२,३,४ असे असायला हवे होते.
- तर चार समानार्थी शब्द लिहिण्यासाठी दिलेल्या चारही शब्दांना १,१,१,१ असे क्रमांक देण्यात आले आहेत. हे १,२,३,४ असे असायला हवे होते.
- परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांना प्रश्न क्रमांक लिहून उत्तरे लिहिणे अपेक्षित असताना, प्रश्न क्रमांकातच घोळ झाल्यावर गुणदान कशाचे आणि कसे होणार, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.
- दरम्यान, हिंदीच्या पेपरवेळी राज्यात आठ गैरप्रकार समोर आले आहेत. त्यातील ४ औरंगाबाद, १ पुणे, तर ३ नागपूर येथील आहेत.

Pune Main
Page No. 2 Feb 23, 2023
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During February 2023

## Section: Education

लोकमत



# नवीन शैक्षणिक धोरणात ग्रंथालयांची उपेक्षा

ग्रंथालय हा महाविद्यालयाचा आत्मा आहे, असे म्हटले जाते. परंतु नवीन शैक्षणिक धोरणामध्ये ग्रंथालयांनी आपली भूमिका बदलणे गरजेचे आहे का?, यावर खूपच कमी प्रमाणात चर्चा झाली आहे. तरीही ग्रंथालय शास्त्रातील सर्व घटकांनी पुढे विचार करणे गरजेचे आहे, ते म्हणजे ग्रंथालयांचा या नवीन शैक्षणिक धोरणात महत्त्वाचा वाटा कसा असणार? ग्रंथालयाचे महत्त्व वाढविण्यासाठी का प्रयत्न करता येतील? ग्रंथालयामध्ये असणाऱ्या पुस्तक साठ्याचा कशाप्रकारे विकास करता येईल याचा विचार नवीन धोरणात व्हायला हवा.

देशात किमान शिक्षणाचा टक्का वाढत असला तरी गुणवत्तेच्या बाबतीत काही प्रमाणात प्रश्नचिन्ह आहेत. विद्यार्थी नाव नोंदणीमध्ये प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाच्या तुलनेत उच्च शिक्षणाचे प्रमाण २०१८ मध्ये २६.३ टक्के होते, नव्या शैक्षणिक धोरणात ते २०३५ साली किमान ५० टक्क्यांपर्यंत वाढविण्याचे उद्दिष्ट आहे. १९८६च्या शैक्षणिक धोरणातील अनेक मुद्दे मागील ३४ वर्षांत पूर्ण न होऊ शकल्याने त्यांचे पुनरावलोकन करून ज्या बाबी अपूर्ण आहेत, त्यात काही सुधारणा करण्याच्या संधी आहेत.

महिलांच्या शिक्षणासाठी विशेष प्रयत्न, पूर्व प्राथमिक शिक्षणाकडे विशेष लक्ष, व्यावसायिक शिक्षणाची आवश्यकता या मुद्द्यांचाही विचार नवीन शैक्षणिक धोरणात केलेले आहे.

शिक्षणात तयार झालेली गरीब-श्रीमंत ही विषमता दूर करण्याचा विचार नवीन शैक्षणिक धोरणात आहे. म्हणून सरकारी आणि खासगी शाळेमध्ये शिक्षणात समानता आणायची भूमिका मांडण्यात आली आहे. तसेच खासगी शाळांना अनियंत्रित फी वाढविण्यापासून रोखण्याची शिफारस नवीन शैक्षणिक धोरणात केलेली आहे. शिक्षणाचा आकृतिबंध बदलण्यात आला आहे. हे धोरण बालवाडी, अंगणवाडीपासून ते उच्च शिक्षणामध्ये लागू असणार आहे. पूर्व प्राथमिक शिक्षणाचा समावेश आता औपचारिक शिक्षणात केला आहे.

बालकांची जडणघडण हाच काळ महत्त्वाचा असतो, प्राथमिक स्तरावर भाषा, विज्ञान, वाचन, लेखन, गणित ते पायाभूत कौशल्ये विकासावर या नवीन धोरणात केलेला विचार हा भारताचे भविष्य घडविणार आहे. पाचवीपर्यंत दिले जाणारे शिक्षण हे मातृभाषेतून दिले जाणार असले तरीही ज्ञान भाषेतून शिक्षणाची सुविधा देऊन पूर्व प्राथमिक शिक्षण आंतराष्ट्रीय दर्जाचे करण्याचा प्रयत्न केला आहे. शिक्षणाचे ५ ३ ३ ४ हे नवे सूत्र १०वी आणि १२वी बोर्डाचे महत्त्व कमी करणारे आहे. मुळात १०वी आणि १२वीचे शिक्षण हे शालेय शिक्षण अंगभूत शिक्षण म्हणून कौशल्य विकासात करण्याच्या दृष्टिकोनातून देणारे शिक्षण नव्या शैक्षणिक धोराणामुळे शक्य होणार आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०बाबत कस्तुरीरंगन समितीचा अहवाल स्वीकारून भारताने भविष्यकालीन योजना जाहीर केली आहे. १९६६ मध्ये कोठारी आयोगाने शिक्षणावर एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या (जीडीपी) किमान ६ टक्के खर्च व्हावा, अशी शिफारस केली होती. परंतु, त्याची अंमलबजावणी अद्याप होऊ शकली नाही. नवीन शैक्षणिक धोरणामध्ये शिक्षणावर ६ टक्के खर्च व्हावा, असे आवर्जून म्हटले आहे. मागील ३८ वर्षांत शिक्षणाची सुमार गुणवत्ता, पदवीधारकांच्या हाती कौशल्ये नसणे, शिक्षणामध्ये गळतीचे प्रमाण, योग्य मूल्यमापनाची प्रक्रिया नसणे, या सर्वच बाबींचा नवीन शैक्षणिक धोरण आणताना विचार केला आहे.

### यावर स्पष्टता हवी

ग्रंथालयामध्ये वापरल्या जाणारे विविध सॉफ्टवेअरस, ऑनलाइन उपलब्ध असणारे संसाधने, कॉपी राइट, ग्रंथालयात देण्यात येणाऱ्या वेगवेगळ्या सेवामध्येही नावीन्यपूर्ण बदल करणे, ग्रंथालयांची बदलती भूमिका, नवीन शैक्षणिक धोरणामध्ये ग्रंथपालांची किंवा ग्रंथालय शास्त्रातील सर्व घटकांची नेमकी भूमिका काय असणार आहे हा संभ्रम दूर होण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरणात ग्रंथालयाविषयी किंवा ग्रंथालय शास्त्राविषयी धोरणात्मक सखोल चर्चा होणे गरजेचे आहे. हे आणि अजून बरेचसे प्रश्न या नवीन शैक्षणिक धोरणाच्या उंबरठ्यावर आ वासून उभे आहेत त्या सर्वांची सखोलपणे चर्चा होणे गरजेचे आहे.



प्रा. भगवान गावित
ग्रंथपाल, नसरापूर

Hello Pune
Page No. 7 Feb 23, 2023
Powered by: erelego.com

# Library a key parameter for NAAC rating

Kevin.Mendonsa
@timesgroup.com

**Mangaluru:** A peer team from the National Assessment and Accreditation Council (NAAC), which recently visited several colleges in the state, stressed the importance of a library as a key component in one's academic journey, be it students or faculty members.

NAAC, for the past eight years, has been stressing on library as one of the important parameters to assess an institution for its ratings.

PS Yadapadithaya, vice-chancellor, Mangalore University, and chairman of one of the NAAC peer teams, said: "NAAC aims to create a 'pull effect', whereby students follow teachers, when they visit the library. There is a need for repurposing libraries, particularly in relation to e-resources," he said.

A college principal said though e-resources are available in the public domain, NAAC wants students to visit libraries for their academic work. "NAAC is particular about maintaining data on students visiting the library," he said.

# *News Paper Clippings During February 2023*

## *Section: Education*

सकाळ

# शैक्षणिक धोरणासाठी स्वतंत्र संहिता विकसित

## सात घटकांचा समावेश : एकूण ४०७ अध्यादेशांचा अभ्यास

**पुणे, ता. २३ :** राज्यात नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी करता यावी, या उद्देशाने राज्य सरकारने राज्य शैक्षणिक संहिता विकसित केली आहे. ही संहिता विकसित करण्यासाठी एक समिती नियुक्त करण्यात आली होती. या समितीने राज्यातील शिक्षणविषयक ४०७ अध्यादेशांचा अभ्यास करून या अभ्यासाच्या माध्यमातून शैक्षणिक धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी एक सप्तसूत्री (विविध सात घटक) केली आहे. या सप्तसूत्रीत ४२ कार्यघटक (टास्क) निश्चित करण्यात आले आहेत. या सप्तसूत्रीत शाळा नियमन, शाळा संचलन, शिक्षक, विद्यार्थी, अभ्यासक्रम मूल्यमापन आणि एमआयएस (मॅनेजमेंट इन्फॉर्मेशन सिस्टिम) या प्रमुख सात घटकांचा समावेश करण्यात आला आहे.

महाराष्ट्रात नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठीचे राज्याचे स्वतंत्र धोरण असावे, या उद्देशाने राज्य सरकारने पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आयुष प्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली राज्य अभ्यासक्रम आराखडा समन्वय समिती स्थापन केली होती.

या समितीने धोरण अंमलबजावणीचे घटक आणि उपघटक निश्चित करण्यासाठी राज्याच्या शिक्षण विभागाने मागील ५७ वर्षांत प्रसिद्ध केलेल्या विविध ४०७ अध्यादेशांचा अभ्यास करून ही राज्य शैक्षणिक संहिता विकसित केली आहे.

केंद्र सरकारने २०२० मध्ये देशाचे नवीन शैक्षणिक धोरण मंजूर केले आहे. देशातील सर्व राज्यांवर या नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्याचे बंधन आहे. त्यामुळे राज्य सरकारने ही अभ्यासक्रम आराखडा समन्वय समिती स्थापन केली होती. या समन्वय समितीने आणखी एका अभ्यासगटाची स्थापना केली होती. या समितीने व या अभ्यासगटाने १९६५ ते २०२२ या ५७ वर्षांत शिक्षण विभागाने प्रसिद्ध केलेल्या सर्व अध्यादेशांचा अभ्यास करून याबाबतचा अहवाल २४ जुलै २०२२ ला शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांच्याकडे सादर केला होता.

**'शिक्षण'च्या अध्यादेशांची वर्गवारी**

| | | |
|---|---|---|
| **४०७** अभ्यासगटाने अभ्यास केलेल्या अध्यादेशांची संख्या | **२६१** एकूणपैकी नवीन शैक्षणिक धोरणांशी पूर्णपणे सुसंगत अध्यादेश | **०२** भाष्य करता येणार नसलेले अध्यादेश |
| **३०** नवीन शैक्षणिक धोरणाशी पूर्णपणे असहमत अध्यादेश | **११४** नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाशी अंशतः सहमत असलेले | |

Pune, Main
24/02/2023 Page No. 5

लोकमत

# शाळा, कॉलेज वाटपाच्या खिरापती कधी थांबणार?

## पुण्यात अकरावीच्या तीस हजार जागा रिक्त

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहरात विविध शाळा, महाविद्यालयांमध्ये गतवर्षी अकरावीच्या सुमारे तीस हजार जागा रिक्त राहिल्या. अकरावीसह अभियांत्रिकी शाखेच्या अभ्यासक्रमासाठी मोठ्या प्रमाणात जागा रिक्त राहत असतानाच राज्य सरकारकडून सर्रासपणे शाळा-महाविद्यालये वाटपाच्या खिरापती सुरू आहेत.

शिक्षणासाठी पुणे हे विद्यार्थ्यांचे आवडते शहर आहे. शिक्षणासाठी दरवर्षी पुण्यात राज्यासह देशभरातून लाखो विद्यार्थी येतात. अकरावीसाठी १ लाख १२ हजार ३० विद्यार्थी प्रवेश क्षमता आहे. मात्र, सन २०२२ मध्ये १ लाख ९५१ अर्ज आले होते. तसेच सर्व प्रवेशफेरी अखेर ८४ हजार ८५१ जणांनी प्रवेश घेतला होता. सुमारे तीस हजार जागा रिक्त राहिल्या होत्या.

पहिल्या तीन फेऱ्यांअखेर तब्बल ३५ ते ४० हजार जागा रिक्त राहिल्या होत्या तसेच मागील काही वर्षांनंतरही सर्वाधिक संख्या असल्याचे दिसून आले होते. अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना परीक्षा देण्याची संधी दिली जाते, त्यात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी अखेरच्या विशेष प्रक्रियेव्दारे प्रवेश घेतला त्याद्वारे काही हजार जागा भरल्या जातात.



### विद्यार्थ्यांचा ओढा विशिष्ट महाविद्यालयांकडेच

शहरातील काही नावाजलेल्या शाळा, महाविद्यालयात प्रवेश मिळावा यासाठी पालकांसह विद्यार्थी आग्रही असतात. त्यामुळे इतर शैक्षणिक संस्थांमधील महाविद्यालयात विद्यार्थी प्रवेश घेत नाहीत आणि जागा रिक्त राहत असल्याचे दिसून येते.

### अकरावीच्या २७ हजार जागा रिक्त

पुणे शहरात ३१९ शाळा-महाविद्यालये असून, गतवर्षी शहरात अकरावीच्या तीस हजारपेक्षा जास्त जागा रिक्त राहिल्याचे निदर्शनास आले होते.

### अभ्यासक्रम कसा पूर्ण करायचा

पुण्यात गतवर्षी अनेक शाळांमध्ये मोठ्या प्रमाणात जागा रिक्त राहिल्या होत्या. प्रवेशप्रक्रिया लांबली होती. त्यात मोजके विद्यार्थी आणि एक दोन महिन्यांत अभ्यासक्रम कसा पूर्ण करायचा यामुळे शिक्षकांच्या चिंतेत भर पडली होती.



Hello Pune
Page No. 4 Feb 24, 2023
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During February 2023*

## *Section: Education*

सकाळ

### संरक्षण सेवा परीक्षेसाठी विद्यापीठात प्रशिक्षण वर्ग

**पुणे, ता. २४ :** स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनाच्या धर्तीवर यंदाच्या वर्षीपासून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात संयुक्त संरक्षण सेवा (सीडीएस) परीक्षेसाठी प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यात येणार आहे, अशी माहिती विद्यापीठाच्या स्पर्धा परीक्षा केंद्राचे संचालक व माजी पोलिस महासंचालक जयंत उमराणीकर यांनी दिली.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात नागरी सेवा परीक्षांसाठी (एमपीएससी, यूपीएससी) स्पर्धा परीक्षा केंद्र स्थापन केले आहे. या केंद्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना नागरी सेवा परीक्षांसाठी मार्गदर्शन करण्यात येते. याच धर्तीवर आता केंद्रात संयुक्त संरक्षण सेवा परीक्षेसाठी प्रशिक्षण वर्ग घेण्यात येणार आहेत.



विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. कारभारी काळे यांच्या मार्गदर्शनाखाली तज्ज्ञांच्या मदतीने या प्रशिक्षण वर्गासाठी आठ महिन्यांचा अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. यात प्रवेश परीक्षेसाठी प्रशिक्षण आणि स्टाफ सिलेक्शन बोर्ड स्क्रिनिंगसाठी शारीरिक व मानसिक प्रशिक्षण देण्यात येणार आहे. यासाठी ५० विद्यार्थी क्षमता असून यासाठी माफक शुल्क आकारण्यात येणार असल्याचेही उमराणीकर यांनी सांगितले.

या प्रशिक्षण वर्गात नियमित मार्गदर्शनपर वर्ग, अभ्यासिका, ग्रंथालय, मुलाखतीसाठी आवश्यक मार्गदर्शन आदींचा समावेश असेल. तसेच उमराणीकर यांच्यासह कॅप्टन प्रा. चंद्रशेखर चितळे (निवृत्त), कर्नल एस. हसबनीस (निवृत्त) व लष्करी अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळणार आहे.

> विद्यापीठाने काही महिन्यांपूर्वी विद्यापीठात एनसीसी सुरू केले असून या विद्यार्थ्यांना सीडीएस प्रशिक्षणाचा फायदा होईल. येत्या एप्रिल महिन्यापासून हे प्रशिक्षण वर्ग सुरू करण्याचे नियोजन आहे.
> **- डॉ. संजीव सोनवणे,**
> प्र- कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Pune, Pune-Today
25/02/2023 Page No. 1

### प्रश्नपत्रिकांतील चुकांबाबत कारवाई?

राज्य मंडळाच्या निर्णयाकडे लक्ष

**पुणे :** राज्य मंडळाकडून घेण्यात येत असलेल्या बारावीच्या परीक्षेत इंग्रजी आणि हिंदी विषयांच्या प्रश्नपत्रिकांमध्ये चुका झाल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे या चुकांबाबत राज्य मंडळाकडून संबंधितांवर काय कारवाई केली जाणार हा प्रश्न असून, राज्य मंडळाच्या निर्णयाकडे लक्ष लागले आहे.

इंग्रजी विषयाच्या प्रश्नपत्रिकेत तीन प्रश्नांमध्ये चूक झाल्याचे समोर आले. त्यात प्रश्नपत्रिकेतील ए ३ आणि ए ५ या प्रश्नांसाठी केवळ सूचना नमूद केलेल्या होत्या, तर ए ४ या प्रश्नात प्रश्नाऐवजी थेट उत्तरच देण्यात आले होते. तर हिंदीच्या प्रश्नपत्रिकेत विरुद्धार्थी आणि समानार्थी शब्दांसाठीचे अनुक्रमांकर चुकले होते. प्रश्न क्रमांक दोनमध्ये विरुद्धार्थी शब्दांसाठी १,२,१,२ असे देण्यात आले होते. समानार्थी शब्दांसाठी १,१,१,१ असे क्रमांक देण्यात आले होते.

प्रश्नपत्रिकांतील चुकांसंदर्भातील कारवाईबाबत राज्य मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी म्हणाले, की मुख्य नियामकांच्या अहवालानंतर कारवाईबाबतचा निर्णय घेतला जाईल. मात्र सकृतदर्शनी या चुका मुद्रणाच्या स्तरावर झाल्याचे दिसते. त्यामुळे मुद्रकाला दंड केला जाऊ शकतो. प्रश्नपत्रिकांचे मुद्रण करणारा मुद्रक बऱ्याच वर्षांपासून काम करत आहे. त्यामुळे प्रश्नपत्रिकांची गोपनीयता राखली गेली आहे. पुढील काही दिवसांत या बाबत निर्णय घेण्यात येईल. विद्यार्थ्यांच्या गुणांबाबत अन्याय होणार नाही याची दक्षता घेतली जाईल.

लोकसत्ता Sat, 25 February 2023 https://epaper.loksatta.com/c,

# *News Paper Clippings During February 2023*

## *Section: Education*

पुढारी

# संलग्न महाविद्यालयांवर बडगा !

## प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मागता येणार दाद

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांबाबत आता तक्रार प्राप्त झाल्यास विद्यापीठस्तरावर अशा तक्रारींची चौकशी करून संबंधित महाविद्यालयांची मान्यता काढणे किंवा शिस्तभंगविषयक कारवाई केली जाणार आहे. त्यामुळे महाविद्यालयांवर कारवाई करण्यास टाळटाळ करणारे विद्यापीठ प्रशासन आता कारवाईचा बडगा उगारणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.**



विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.प्रफुल्ल पवार यांनी जाहीर केलेल्या परिपत्रकानुसार, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न व स्वायत्त महाविद्यालये/ मान्यताप्राप्त परिसंस्थांमधील अध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या विविध तक्रारी प्राप्त होतात. यामध्ये साधारणत: वेतन न मिळणे, वेतन कमी मिळणे, सेवापुस्तक, वेतन चिठ्ठी न मिळणे, वरिष्ठांकडून त्रास, नोकरीतून काढून टाकणे इत्यादी व्यक्तिगत स्वरूपाच्या तक्रारी असतात. अध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे आणि त्यांचे संबंधित व्यवस्थापन यांच्यामधील सेवासंबंधीची गाऱ्हाणी किंवा तक्रारींच्या निवारणासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मध्ये तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये/ मान्यताप्राप्त परिसंस्थातील अध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आता संबंधित प्राधिकरणाकडे दाद मागता येणार आहे.

संलग्न महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था यामध्ये प्रशासकीय विद्याविषयक अथवा वित्तीय कामकाजासंबंधी अनियमितता किंवा विवाद असेल व त्यामुळे तेथे कार्यरत असलेल्या अध्यापकवर्गाच्या व अध्यापकेतर कर्मचारीवर्गाच्या हितास बाधा येत असेल, तर अशा सामाईक स्वरूपाच्या तक्रारी विद्यापीठास प्राप्त झाल्यास, विद्यापीठस्तरावर अशा तक्रारींची चौकशी करून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२० नुसार संलग्नीकरण अथवा मान्यता काढून घेण्याची किंवा सन २०१९ चा एकरूप परिनियम क्र.१ नुसार संबंधित कसूरदार संलग्न महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्यावर शास्तीभंगविषयक कारवाई केली जाणार आहे. त्याचबरोबर प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना विविध प्राधिकरणांकडे त्यांच्या तक्रारींसाठी आता दाद मागता येणार आहे.

### कुणाकडे मागता येणार दाद

१) विद्यापीठाशी संलग्न व स्वायत्त महाविद्यालयांचे आणि मान्यताप्राप्त संस्थांचे अध्यापक व इतर कर्मचारी आणि संबंधित व्यवस्थापन यांच्यामधील विवादांसाठी विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरणाकडे दाद मागता येणार आहे.

२) विद्यापीठाशी संलग्न व स्वायत्त महाविद्यालयांचे आणि मान्यताप्राप्त संस्थाचे अध्यापक व इतर कर्मचारी यांच्या राज्य शासन व त्यांचे अधिकारी यांच्या विरुध्दच्या तक्रारी व्यतिरिक्त इतर सर्व प्रकारच्या तक्रारींसाठी तक्रार निवारण समितीकडे दाद मागावी लागणार आहे.

३)व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणारी महाविद्यालये मान्यताप्राप्त परिसंस्थांतील अध्यापक व इतर कर्मचारी यांच्या तक्रारींसाठी एआयसीटीई अन्वये गठित संबंधित महाविद्यालय पातळीवरील समितीकडे दाद मागता येणार आहे.

My Pune Edition
Feb 25, 2023 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During February 2023*

## *Section: Education*

लोकमत

### विज्ञान दिनानिमित्त आज विद्यापीठात 'ओपन डे'

#### व्याख्याने, विज्ञान प्रदर्शन, स्पर्धांचे आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : देशभरात २८ फेब्रुवारी हा 'राष्ट्रीय विज्ञान दिन' म्हणून साजरा केला जातो. यानिमित्त सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात विविध विभागांमार्फत विज्ञान विषयक स्पर्धा, व्याख्याने, विज्ञान प्रदर्शन आदी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हे सर्व कार्यक्रम सर्वसामान्य नागरिकांना खुले आहेत.

रसायनशास्त्र विभागात सकाळी १० ते ४ या वेळेत विज्ञान उपयोगी उपकरणांचे प्रदर्शन आहे. तर 'इंटर डिसीप्लिनरी स्कूल ऑफ सायन्सेस' येथे विज्ञान विषयक काम करणाऱ्या संशोधक महिलांची व्याख्यानमाला आयोजित केली आहे. दुपारी ३ वाजता मृगनयनी कोटेचा यांचे व्याख्यान होईल. तसेच काही विद्यार्थी त्यांचे प्रयोगही सादर करणार आहेत, असे रसायनशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. अविनाश कुंभार यांनी सांगितले.

- विद्यापीठातील 'सायन्स पार्क' मध्येही विज्ञान दिवसानिमित्त सकाळी ११ ते ५ या वेळेत 'ओपन डे' असणार आहे. महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादितचे संचालक विवेक सावंत यांच्या उपस्थितीत वक्तृत्व स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात येणार आहे.

भौतिकशास्त्र विभागात सकाळी ९ ते सायं. ५ या वेळेत वैज्ञानिक प्रयोग, स्पर्धा, व्याख्यान आणि वैज्ञानिक खेळ असे कार्यक्रम होणार आहेत. तसेच 'नासा'तील निवृत्त वैज्ञानिक डॉ. रवी मार्गसहायम यांचे विशेष व्याख्यान होणार आहे असे विभागप्रमुख डॉ. संदेश जाडकर यांनी सांगितले.

Pune Main
Page No. 2 Feb 28, 2023
Powered by: erelego.com

### विद्यापीठाकडून महाविद्यालयांवर कारवाई

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांबाबत आता तक्रार दाखल झाल्यास विद्यापीठ स्तरावर तक्रारींची चौकशी करून संबंधित महाविद्यालयांची मान्यता रद्द करणे, शिस्तभंगाची कारवाई केली जाणार आहे. तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना विविध संबंधित प्राधिकरणांकडे दाद मागता येणार आहे.

विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी या संदर्भातील परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न आणि स्वायत्त महाविद्यालये, संस्थांतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडून विविध तक्रारी दाखल होतात. त्यात वेतन न मिळणे, वेतन कमी मिळणे, सेवापुस्तक, वरिष्ठांकडून त्रास दिला जाणे, नोकरीतून काढून टाकणे आदी स्वरुपाच्या तक्रारींचा समावेश असतो. शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, संबंधित व्यवस्थापन यांच्यातील सेवेसंबंधीची गाऱ्हाणी किंवा तक्रारींच्या निवारणासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायद्यात तरतूद आहे. त्यामुळे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये, संस्थांतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना संबंधित प्राधिकरणाकडे दाद मागता येईल.

विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये, स्वायत्त महाविद्यालय आणि मान्यताप्राप्त संस्थांचे अध्यापक, इतर कर्मचारी आणि संबंधित व्यवस्थापन यांच्यामधील विवादांसाठी विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरणाकडे, राज्य शासन आणि त्यांचे अधिकाऱ्या विरोधातील व्यतिरिक्त इतर सर्व प्रकारच्या तक्रारींसाठी तक्रार निवारण समितीकडे, व्यावसायिक अभ्यासक्रम चालवणाऱ्या महाविद्यालये मान्यता प्राप्त परिसंस्थांतील अध्यापक आणि व इतर कर्मचारी यांच्या तक्रारींसाठी एआयसिटीई अन्वये गठित संबंधित महाविद्यालय पातळीवरील समितीकडे दाद मागता येणार आहे.

संलग्न महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था यामध्ये प्रशासकीय विद्याविषयक अथवा वित्तीय कामकाजासंबंधी अनियमितता किंवा विवाद असेल व त्यामुळे तेथे कार्यरत असलेल्या अध्यापक वर्गाच्या व अध्यापकेतर कर्मचारी वर्गाच्या हितास बाधा येत असेल तर अशा सामाईक स्वरूपाच्या तक्रारी विद्यापीठास प्राप्त झाल्यास, विद्यापीठ स्तरावर अशा तक्रारींची चौकशी करून विद्यापीठ कायद्यातील तरतुदीनुसार संबंधित संलग्न महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्यावर कारवाई केली जाईल.

ताबा नोटीस

लोकसत्ता Tue, 28 February 2023
https://epaper.loksatta.com/c/71800192

## *News Paper Clippings During February 2023*

### *Section: Education*

**लोकमत**

# डीम्ड युनिव्हर्सिटीसाठीही स्कॉलरशिप

## उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा दिलासा, विद्यापीठांना सूचना

**सीमा महांगडे**
लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** डीम्ड युनिव्हर्सिटीमध्ये विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना राज्याची प्रचलित राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्कॉलरशिप मिळू शकणार आहे. या संदर्भातील शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून जाहीर करण्यात आला असून, त्यासंदर्भात काय आणि कशी कार्यवाही करावी, याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. आतापर्यंत राज्य सरकार निधीचा अभाव असल्याचे कारण पुढे करत अभिमत विद्यापीठातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती नाकारत होते.

### अभिमत विद्यापीठांना सूचना

- युजीसीच्या अभिमत विद्यापीठांच्या नियमावलीप्रमाणे अभिमत विद्यापीठांनी त्यांचे अभ्यासक्रम, शिक्षण शुल्क व प्रवेशित विद्यार्थी यांची माहिती राज्य शासनाच्या विभागांना देणे बंधनकारक आहे.
- अभिमत विद्यापीठांनी त्यांच्या विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेची माहिती संबंधित संचालनालयांना देणे बंधनकारक.
- अभिमत विद्यापीठांनी त्यांच्या अखत्यारितील महाविद्यालये, संस्था, शुल्क, माहितीपुस्तिका हे सारे संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे आवश्यक.
- अभिमत विद्यापीठांनी त्यांचे निधी, लेखापरीक्षण, वार्षिक अहवाल याचा लेखाजोखा तयार ठेवून अँटीरॅगिंग इ बाबत व्यवस्था कक्ष ही स्थापित करावा.

राज्यात २१ अभिमत विद्यापीठे आहेत. या विद्यापीठांमध्ये व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना या निर्णयाने मोठा दिलासा मिळणार आहे. आतापर्यंत शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजना राज्यातील अभिमत विद्यापीठात शिकणाऱ्यांना ला[...] नव्हती. याविरोधात मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आली होती.

Pune Main
Page No. 5 Feb 28, 2023
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During February 2023*

### *Section: Education*

# परदेशी विद्यापीठे भारताच्या दारात

■ ॲड. विलास पाटणे

अमेरिकेतील एमआयटी, स्टॅनफर्ड, हार्वर्ड तर इंग्लंडमधील केंब्रिज, ऑक्सफर्ड अशी विद्यापीठे भारताच्या उंबरठ्यावर आहेत. मग भारतातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी परदेशात जाण्याची गरज पडणार नाही. परदेशातील विद्यापीठे भारतात आपल्या संस्था इथे सुरू करणार आहेत. या विद्यापीठांना सुरुवातीला दहा वर्षांसाठी मान्यता देण्यात येणार असल्याची माहिती यूजीसीचे अध्यक्ष एम. जगदीश कुमार यांनी दिली. परदेशी विद्यापीठांची दारे आपल्या मुलांना खुली होण्याच्या दृष्टीने हे मोठे पाऊल पडते आहे. यूजीसीने याबाबत नियमावलीचा अंतरिम मसुदा जाहीर केला आहे. देशाच्या शैक्षणिक क्षेत्रावर या निर्णयाचा दूरगामी परिणाम होणार आहे. भारतीय विद्यापीठे जगातल्या पहिल्या पाचशे विद्यापीठांमध्ये नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. जगाच्या तुलनेत उच्च शिक्षणाच्या विकासात आपण अविकसित आहोत. या परदेशी विद्यापीठांना शुल्क ठरवण्याचे स्वातंत्र्य असेल. त्यांची प्रवेश पद्धती तेच निश्चित करतील. मिळणाऱ्या उत्पन्नाचा भाग भारतातच खर्च करण्याचे बंधन वगळले जाईल, ही या नव्या मसुद्याची काही वैशिष्ट्ये आहेत.

**मसुद्यामधील ठळक मुद्दे**

- जागतिक क्रमवारीत पहिल्या पाचशेमध्ये स्थान असलेली विद्यापीठे भारतात शाखा उघडण्यास पात्र आहेत.
- कुणाला परवानगी द्यायची हे यूजीसीच्या स्थायी समितीचे सदस्य ठरवतील.
- प्रथम दहा वर्षांसाठी परवानगी, नवव्या वर्षानंतर पुन्हा अर्ज करावा लागेल.
- प्रत्यक्ष भारतात येऊन शिकवण्याचे बंधन असेल. ऑनलाइन अभ्यासक्रम चालणार नाहीत.
- भारतातल्या संकुलात परदेशी शिक्षक नेमण्यास अनुमती असेल.
- या विद्यापीठांना भारतातून मिळणारे उत्पन्न भारतातच खर्च करण्याचे बंधन नसेल. फक्त या पैशांचे व्यवहार 'फेमा' कायद्यात बसतात का, यावर देखरेख व दंडाचा अधिकार राहील.
- परदेशी विद्यापीठांमध्ये आरक्षण व्यवस्था लागू नसेल. शिवाय, अध्यापकांची निवड करण्याचे स्वातंत्र्य असेल. विद्यापीठांचा अभ्यासक्रम भारताच्या धोरणांशी सुसंगत असावा, अशी अपेक्षा आहे. फीचे स्वातंत्र्य असले तरी शुल्कधोरण ठरवताना न्याय आणि पारदर्शकता यांचे भान राखावे लागेल.

जगातील किमान ८५ देशांमध्ये आज भारतातील सुमारे १८ लाख विद्यार्थी शिकत आहेत. यंदा तब्बल साडेचार लाख विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी विदेशात गेले. जवळपास चार ते पाच हजार कोटींची वार्षिक उलाढाल या शैक्षणिक स्थलांतरामुळे गमवावी लागते. परदेशी विद्यापीठे देशातच आली तर विद्यार्थ्यांचा हा खर्चही वाचेल. भारतात पायाभूत सोयी उभ्या केल्यानंतर प्रत्यक्ष अध्यापनासाठीचा वेळ लक्षात घेतला तर या वर्षी विद्यापीठांनी अर्ज केला तरी प्रत्यक्ष सन २०२५ पासून प्रवेश सुरू होण्याची शक्यता आहे. विद्यापीठांना त्यांच्या देशातील व भारतातील विद्यापीठातील पदवी समकक्ष ठेवावी लागेल.



**परदेशांतील नामांकित विद्यापीठे आता भारतात येत आहेत. त्यासाठीची, प्रक्रिया पुरी होते आहे. या विद्यापीठांवर अनेक अटी असतील. मात्र, त्यांच्या येण्याने भारतातील उच्च शिक्षणाचे चित्र पुरते बदलून जाणार आहे. भारतीय विद्यार्थी, परदेशी विद्यापीठे आणि भारतातील विद्यापीठे या नव्या घडामोडीला कसा प्रतिसाद देतात, हे पाहावे लागेल...**

परदेशी विद्यापीठांना मुक्तद्वार दिल्यास देशातील उच्च शिक्षण आणि संस्थांवर विपरीत परिणाम होईल, अशी भीती काही शिक्षणतज्ज्ञांना वाटते. यूजीसीच्या मसुद्याबाबत विद्यापीठ महासंघाचे डॉ. माणिकराव साळुंके म्हणतात, 'परदेशी विद्यापीठांना भारतात मिळणाऱ्या सुविधा देशातील आघाडीच्या विद्यापीठांना दिल्या पाहिजेत; अन्यथा विद्यापीठांमध्ये दरी निर्माण होईल.' 'ज्यांना आर्थिकदृष्ट्या परवडते तेच विद्यार्थी परदेशी शिक्षणासाठी जातात. त्यामुळे गुणवत्तापूर्ण आणि किफायतशीर शिक्षण देणाऱ्या देशातील विद्यापीठांना काळजीचे कारण नाही. तसेच, शिक्षण आंतरराष्ट्रीय दर्जाचे करणे आवश्यक आहे,' असे माजी कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर यांनी म्हटले आहे. देशातील विद्यापीठांना नियमांमध्ये बांधून ठेवायचे आणि परदेशी विद्यापीठांना मोकळीक द्यायची, हा विरोधाभास मसुद्यात आहे, असे 'नॅक'चे कार्यकारी अध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन यांनी म्हटले आहे.

परदेशी विद्यार्थ्यांनाही ही विद्यापीठे प्रवेश देऊ शकतील. परदेशातील विद्यापीठांमध्ये गुणवत्तेने पात्र ठरणाऱ्या मात्र अवाढव्य खर्च पेलू न शकणाऱ्या विद्यार्थ्यांना यामुळे निश्चित दिलासा मिळू शकेल. मात्र, त्याच वेळी विद्यापीठाच्या मूळ संकुलाप्रमाणेच शिक्षण भारतीय संकुलातही मिळू शकेल का, हा प्रश्न अनुत्तरित आहे. खरे पाहता, हार्वर्ड, ऑक्सफर्ड, केम्ब्रिज आदींच्या अमेरिका, इंग्लंड येथील विद्यापीठांतील शिक्षणाचा दर्जा आणि भारतातील त्यांच्या उपशाखांचा दर्जा एकच हवा. परंतु आयोग नियमावलीत 'मूळ संकुलाप्रमाणेच दर्जा राखला जावा' असे मोघमपणे नमूद करतो.

भारतासह आशियातील देशांतील विद्यार्थ्यांचे ग्राहक म्हणून मूल्य लक्षात घेऊन परदेशी विद्यापीठे भारतात पाऊल टाकण्याचा नक्कीच विचार करतील. आवश्यक पायाभूत सुविधांची निर्मितीही करतील. मात्र, अध्यापक वर्गाचे काय? त्या विद्यापीठांतील अध्यापक वर्ग देशीच असेल काय? भारत आणि इतर विकसित देशांतील शैक्षणिक वातावरणात तसेच येथील मानसिकतेतही मूलभूत फरक आहेत. परदेशात अनेक नोबेल पारितोषिक प्राप्त संशोधक हे तेथील विद्यापीठात सन्मान आणि स्वेच्छेने अध्यापक म्हणून काम करतात. भारतात प्राध्यापक संशोधन करत नाहीत. संशोधक अध्यापन करत नाहीत. भारतातील बहुतेक विद्यापीठांत पीएच.डी.चे प्रमाणपत्र सर्वोत्तम पात्रतेचा दाखला मानला जातो. आपल्या विद्यापीठांना नव्या कल्पना सुचत नाहीत; तसेच प्रयोगशीलता नसते. अशा वेळी 'नॅक'चा भूलभुलय्या चालूच राहतो.

या नव्या प्रवाहाकडे पाहताना काही संदर्भ दुर्लक्षिण्याजोगे नाहीत. एकीकडे विद्यापीठांचा शैक्षणिक दर्जा, पायाभूत सुविधा, संशोधनासाठी पोषक वातावरण यांचा विचार करून भारतातील विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी परदेशी विद्यापीठांना गालिचे घालायचे आणि दुसरीकडे भारतातील विद्यापीठांचे प्रश्न प्रलंबित ठेवण्यात काही अर्थ नाही. अर्थात, भारतातील विद्यापीठे या स्पर्धेतच नाहीत. उत्कृष्टतेबरोबर परदेशी विद्यापिठांनी इथल्या मातीतील संकल्पना राबविल्या पाहिजेत. इथले प्रश्न समजून घेतले पाहिजेत. प्रामाणिक असतील तेच टिकतील. मुख्य म्हणजे पालकांना एक चांगला पर्याय उपलब्ध राहील. येत्या काळात सर्वाधिक मनुष्यबळ असणाऱ्या भारतात शिक्षणाचा बाजारपेठ म्हणून विचार करणे हे योग्य असले तरी केवळ बाजारपेठेचा विचार करणे सयुक्तिक होणार नाही. जागतिक 'प्रतिभा स्पर्धात्मकता निर्देशांकात' १३३ देशांत आपला क्रमांक १०१वा लागतो. असे असले तरी शिक्षणव्यवस्था अधिक सक्षम करण्याला पर्याय नाही हे आपण लक्षात घ्यावे लागेल. अर्थात, किफायतशीर खर्चात दर्जेदार शिक्षण देणारा देश अशी प्रतिमा सुखावणारी स्वागतार्ह आहे, हे निश्चित.

**(लेखक शिक्षणव्यवस्थेचे अभ्यासक आहेत.)**

Maharashtra Times 28.2.2023

## *News Paper Clippings During February 2023*

### *Section: Education*



# C-DAC releases two software tools critical for research in life sciences

TIMES NEWS NETWORK

**Pune:** Two products that would handle large genomics data and biomolecular structural data securely have been developed by Centre for Development of Advanced Computing (C-DAC) on Monday. Both were launched by the bioinformatics group during a three-day symposium in Accelerating Biology 2023: Discovery to Delivery.

Rajendra Joshi, senior director and head of the department of HPC Medical and Bioinformatics Applications in C-DAC, said, "The bioinformatics group in C-DAC has been focusing on cutting-edge research. It provides high-end solutions to various academia and industries using high-end supercomputing facility to the researchers working in bioinformatics and also serves as a platform for a number of national and international collaborations."

This data is also crucial for novel drug and vaccine development that leads to effective and precise public healthcare solutions. India needs to build a strong capability to develop such large facilities with modern hardware and software, which is capable of handling large genomics data, he said.

Integrated Computing Environment, one of the products introduced on Monday, is an indigenous cloud-based genomics computational facility for bioinformatics.

It integrates ICE-cube, a hardware infrastructure, and ICE flakes, a software component that will help store and analyze petascale to exascale of genomics data in a secure manner. ICE will help researchers to uncover the complete potential of the data to deliver India-specific products and solutions in healthcare, agriculture, livestock, and the environment.

The second product would enable biologists to visualize and analyze large volumes of biomolecular structural data resulting from experiments and simulations would surely accelerate the research in the field of computational drug discovery.

The use of high-performance computing to analyze this large time-scale relationship data through the rapid rendering of structures in 3D space would give the finest understanding of biology for new discoveries.

**EMINENT SCIENTISTS FROM ACADEMIA, INDUSTRY**

- The symposium will address challenges in in-silico drug discovery and repurposing, designing blockbuster, quantum and exascale computing, multiomics in healthcare, ayurveda and traditional medicine, biological data integrators, artificial intelligence in biology and medicine and collaborations, industry and startups
- Life science data generated from Indian studies on humans, animals, plants and microbes, is of strategic importance to national security, experts said

The Times of India 28.2.2023

## *News Paper Clippings During February 2023*

### *Section: Miscellaneous*

# ग्रंथालये कुतूहल जागे ठेवतात

## लेखक अच्युत गोडबोले यांचे मत

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

'शिक्षण घेत राहणे आणि कुतूहल जागृत ठेवणे, ही माणसाच्या जिवंतपणाची लक्षणे आहेत. कुतूहल जागे ठेवण्याचे काम ग्रंथालये करीत आहेत. यातून नागरिकांत वाचनसंस्कृती जोपासली जात आहे,' असे मत प्रसिद्ध लेखक अच्युत गोडबोले यांनी मंगळवारी व्यक्त केले.

पुणे नगर वाचन मंदिराच्या १७५व्या वर्धापनदिनानिमित्त देण्यात आलेल्या विविध पुरस्कारांचे वितरण गोडबोले यांच्या हस्ते करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते. संस्थेच्या कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमाला अध्यक्ष मधुमिलिंद मेहेंदळे, कार्यवाह सुवर्णा जोगळेकर उपस्थित होते. जीवन इंगळे यांना 'कै. आर. एल. नगरकर प्रतिष्ठान' पुरस्कृत डॉ. श्री. व्यं. केतकर पुरस्कार', डॉ. मिलिंद भोई यांना 'ॲड. शरद तपस्वी पुरस्कार' आणि मुकुंद दातार यांना 'कवी ह. स. गोखले पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

'साहित्य या कलेची व्याप्ती एवढी मोठी आहे की, आपल्याला इतिहास आणि भूगोल या एकाच कलेच्या माध्यमातून अनुभवता येतात. अलीकडे तंत्रज्ञानामुळे माध्यमे बदलत आहेत. सध्या डिजिटल पद्धतीने पुस्तके वाचली जात आहेत. मात्र, येत्या काळात पुन्हा एकदा हातात पुस्तक घेऊन वाचण्याचे प्रमाण वाढेल. माझी पसंती कागदी पुस्तकांना असेल,' असे गोडबोले म्हणाले.

'वाचन चळवळीमुळे सकारात्मक येते. व्यक्तीमध्ये सकारात्मक फरक पडतो, हे मी अनुभवले आहे. वाईटातील चांगुलपणा शोधण्याचे काम आपण केले पाहिजे. हे वाढविण्याचे काम वाचन संस्कृतीतून होत आहे,' मत भोई यांनी व्यक्त केले. इंगळे आणि दातार यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यवाह सुवर्णा जोगळेकर यांनी प्रास्ताविक केले. संगीता पुराणिक यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. गायत्री सावंत यांनी उपस्थितांचे आभार मानले.

Maharashtra Times 8.2.2023

## *News Paper Clippings During February 2023*

### *Section: Miscellaneous*

पुढारी

# दीड हजार शाळांमध्ये डिजिटल लायब्ररी !

## शाळांना टॅबदेखील मिळणार, विद्यार्थी वाचणार ई-पुस्तके

**पुढारी विशेष**

गणेश खळदकर
पुढारी प्रतिनिधी

**पुणे : राज्यातील १ हजार ५२५ शासकीय तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये आता डिजिटल लायब्ररी तयार करण्यात येणार आहे. त्याचबरोबर शाळांना मोठ्या प्रमाणात टॅबदेखील देण्यात येणार आहेत. त्यामुळे विद्यार्थी आता पाठ्यपुस्तकांबरोबरच ई-पुस्तके वाचणार आहेत. यासाठी तब्बल २५ कोटी ६२ लाख रुपये खर्च करण्यात येणार असल्याचे समग्र शिक्षा महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेचे राज्य प्रकल्प संचालक कैलास पगारे यांनी स्पष्ट केले आहे.**

पगारे यांनी राज्यातील सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि महानगरपालिकांच्या आयुक्तांना दिलेल्या निर्देशानुसार, मुलांच्या वाचनात भर पडण्यासाठी व त्यांना विविध विषयांची पूरक वाचनाची ई-पुस्तके उपलब्ध करून देऊन त्यांच्या शैक्षणिक संपादणूक पातळी वृद्धिंगत होण्याच्या दृष्टीने डिजिटल लायब्ररी हा उपक्रम राबविण्यास सुरुवात झाली आहे. त्याची प्रायोगिक तत्त्वावर दोन शाळांमध्ये अंमलबजावणीही करण्यात आली आहे. मुलांच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ होऊन वर्गातील शैक्षणिक वातावरण अधिक उत्साही राहील आणि विद्यार्थी सतत क्रियाशील राहतील यासाठी शाळांमध्ये डिजिटल लायब्ररी स्थापित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.



विद्यार्थ्यांचा वयोगट व विविध विषयांतील अध्ययन निष्पतीचा विचार करून डिजिटल लायब्ररी विकसित करण्याच्या प्रस्तावास केंद्र शासनाने मान्यता दिली. जेणेकरून विद्यार्थ्यांच्या विविध भाषा विषयांतील दृढीकरण व समज दृढ होईल. तसेच त्याचे उपयोजना आणि कौशल्यात रूपांतर करण्यास उपयुक्त ठरेल.

राज्यातील निवडक १ हजार ५२५ शाळांना डिजिटल लायब्ररी उपलब्ध देण्याचे निश्चित करण्यात आले. त्यामध्ये १०० पेक्षा कमी पटसंख्या असणाऱ्या १ हजार २५५ शाळांमध्ये १० टॅबसह आणि १०० पेक्षा जास्त पटसंख्या असणाऱ्या २७० शाळांमध्ये २० टॅबसह डिजिटल लायब्ररी उपलब्ध करण्यासाठी पुरवठाधारकाची निवड करण्यात आली आहे. या पुरवठाधारकांमार्फत शाळांमध्ये डिजिटल लायब्ररी स्थापित करण्यात येणार आहे.

### शैक्षणिक गुणांकनात वृध्दी होण्यासाठी मदतगार

डिजिटल लायब्ररीचे हार्डवेअर व सॉफ्टवेअरच्या शाळेतील प्रभावी वापरामुळे केंद्र शासनाच्या पीजीआय इंडेक्समधील राज्याच्या शैक्षणिक गुणांकनात वृध्दी होण्यासाठी मदत होणार आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या विविध विषयांतील प्रभुत्व आणि संपादणूक पातळीत वाढ करण्यासाठी तसेच आगामी राष्ट्रीय शैक्षणिक संपादणूक सर्वेक्षण आणि विद्यार्थ्यांच्या अन्य विविध स्पर्धा परीक्षांकरिता व अभ्यासक्रमातील अपेक्षित असणारी अध्ययन निष्पत्ती मुले सहजतेने साध्य करतील, असेदेखील पगारे यांनी स्पष्ट केले.

Pune Edition
Feb 20, 2023 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During February 2023*

### *Section: Miscellaneous*

# महाराष्ट्र साहित्य परिषदेचे संशोधक घडविणारे संदर्भ ग्रंथालय

महाराष्ट्र टाइम्स
माझे पुणे
विश्व ग्रंथालयांचे

Chintamani.Patki
@timesgroup.com
Tweet : @ChintamaniPMT

### वा. गो. आपटे संदर्भ ग्रंथालयाचा इतिहास

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या घटनेचा पहिला मसुदा वा. गो. आपटे यांनी लिहिला. ते परिषदेचे पहिले चिटणीस होते. त्यांनी दहा वर्षे चिटणीसपद भूषविले. वा. गो. आपटे यांच्या नावाचा 'वा. गो. आपटे इस्टेट ट्रस्ट' सदाशिव पेठेत होता. मसापचे तत्कालीन कार्याध्यक्ष श्री. म. माटे यांनी ट्रस्टच्या विश्वस्तांशी संपर्क साधून १९४९मध्ये दहा हजार रुपयांची देणगी मिळवली. ट्रस्टच्या अटीनुसार आपटे यांच्या स्मरणार्थ संदर्भ ग्रंथालय उभारण्यात आले. मे १९५१मध्ये वा. गो. आपटे संदर्भ ग्रंथालयाची प्रतिष्ठापना झाली. या ग्रंथालयातून दुर्मीळ आणि संदर्भात्मक ग्रंथ सोडून अन्य कोणतेही पुस्तक सभासद घरी वाचण्यासाठी नेऊ शकतात.




महाराष्ट्र साहित्य परिषदेचे संदर्भ ग्रंथालय.

### आज उद्घाटन

महाराष्ट्र साहित्य परिषदेतील नूतनीकरण झालेल्या ऐतिहासिक माधवराव पटवर्धन सभागृहाचे, कार्यालयाचे व ग्रंथालयाचे उद्घाटन आज, मंगळवारी सकाळी ११ वाजता सरस्वती सन्मान समितीचे प्रमुख डॉ. सुरेश ऋतुपर्ण यांच्या हस्ते होणार आहे. हा कार्यक्रम एस. एम. जोशी सभागृहात होणार आहे.

**पुणे :** महाराष्ट्र साहित्य परिषदेचे (मसाप) वैभव असलेले वा. गो. आपटे संदर्भ ग्रंथालय मराठी साहित्यिक, संशोधक आणि अभ्यासकांच्या दृष्टीने आकर्षणाचा केंद्रबिंदू राहिले आहे. या ग्रंथालयाचे नूतनीकरण करण्यात आले असून, अनेक दुर्मीळ ग्रंथांचे डिजिटायझेशन करण्यात आले आहे.

एक लाख ग्रंथसंख्या असलेल्या या ग्रंथालयाचे लवकरच संगणकीकरण करण्यात येईल. अभ्यास किंवा संशोधनकार्यात महत्त्वाचा संदर्भ हवा असेल, तर आपटे ग्रंथालयाच्या बैठकीत तो मिळतोच मिळतो. अनेक पीएचडीधारकांना या ग्रंथालयाने संशोधकांचा मान दिला आहे.

शतकोत्तर दशकपूर्तीचा टप्पा पार केलेल्या आणि 'महाराष्ट्रातील आद्य साहित्य संस्था' असा नावलौकिक असलेल्या 'मसाप'च्या वा. गो. आपटे संदर्भ ग्रंथालयात १८०० सालापासूनच्या दुर्मीळ ग्रंथांचा समावेश आहे. एक लाख मौलिक संदर्भग्रंथांनी समृद्ध असलेल्या या ग्रंथालयात साहित्यप्रेमी वाचकांबरोबरच स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांचा नेहमीच राबता असतो. दुबईस्थित उद्योजक विनोद जाधव यांच्या देणगीतून ग्रंथालयाचे नूतनीकरण करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांसाठी कल्याणराव जाधव अभ्यासिका सुरू करण्यात आली आहे. आधुनिक आसन व्यवस्था आणि वातानुकूलित व्यवस्थेबरोबरच ग्रंथालयाचे लवकरच संगणकीकरण करण्यात येणार आहे. पुस्तकांची संपूर्ण माहिती संगणकावर मिळणार असल्याने हवे ते पुस्तक शोधणे सोयीचे होणार आहे, अशी माहिती परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी दिली.

एक लाख ग्रंथांपैकी दुर्मीळ ग्रंथांच्या डिजिटायझेशनचे काम भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिराच्या सहकार्याने सुरू आहे. पहिल्या टप्प्यात पाचशे ग्रंथांचे डिजिटायझेशन पूर्ण झाले आहे. हे ग्रंथ वाचकांच्या मागणीनुसार ई-मेलद्वारे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. साहित्य परिषदेच्या सुमारे २० हजार सभासदांना ग्रंथालयाची सेवा मिळते. वाचक, पीएचडीचे विद्यार्थी, संशोधक, अभ्यासक, स्पर्धा परीक्षांचे विद्यार्थी यांना नाममात्र दरात ग्रंथालयाची सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे, असे ग्रंथालय विभागाचे कार्यवाह वि. दा. पिंगळे यांनी सांगितले.

Maharashtra Times 21.02.2023

# News Paper Clippings During February 2023

## Section: Miscellaneous

लोकमत

दृष्टिक्षेप

### जगात सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या भाषा

१ इंग्रजी — English

२ चायनीज — 漢 汉

३ हिंदी — हिंदी

४ स्पॅनिश

५ फ्रेंच — Je parle français

६ अरेबिक — العربية

७ बंगाली — বাংলা

८ रशियन — А Б В Г Д Е Ё Ж З И Й К Л М Н О П Р С Т У Ф Х Ц Ч

९ पोर्तुगीज

१० उर्दू — اُردُو



इंग्रजी पहिल्या क्रमांकावर, तर हिंदी तिसरी !

**संदर्भ :** एथनोलॉग आणि वर्ल्ड इंडेक्स

आज जागतिक मातृभाषा दिवस आहे. जागतिकीकरणानंतर जगभरात इंग्रजीचे वर्चस्व वाढून स्थानिक भाषांना ज्या ज्या देशात अधिक घरघर लागली, त्यात भारताचा क्रमांक बराच वरचा आहे. पण, आपण आपल्या स्थानिक भाषणाची हेळसांड केल्याची खंतही आता समाजात मोठ्या प्रमाणात मूळ धरू लागली आहे, हेही काही कमी नव्हे! जगात सर्वाधिक बोलली जाणारी भाषा अर्थातच इंग्रजी असली, तरी हिंदीचा तिसरा क्रमांक आहे, हेही महत्त्वाचेच !

Pune Main
Page No. 6 Feb 21, 2023
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During February 2023

## Section: Miscellaneous

पुढारी

पुढारी ANCHOR

# ग्रंथालयांच्या सदस्यसंख्येत १५ टक्क्यांनी घट

सुवर्णा चव्हाण
पुढारी प्रतिनिधी

**पुणे : सोशल मीडियामुळे सहज उपलब्ध होणारे ई-बुक आणि ऑडिओ बुक, कोरोनामुळे दोन वर्षे बंद असलेली ग्रंथालये अन् आर्थिक निधीची कमतरता, अशा विविध कारणांमुळे राज्यभरातील ग्रंथालयांतील वाचकांच्या सदस्यसंख्येत १५ टक्क्यांनी घट झाली आहे. त्यामुळे सदस्यसंख्या टिकविण्याचे मोठे आव्हान सार्वजनिक ग्रंथालयांसमोर उभे राहिले आहे.**

## कोरोनामुळे दोन वर्षे ग्रंथालये बंद असल्याचा परिणाम

पुणे, मुंबई, नागपूर, सोलापूर, कोल्हापूर, नाशिक, सातारा आदी जिल्ह्यांमधील अनेक ग्रंथालयांच्या सदस्यसंख्येत मोठी घट झाली आहे. सदस्यसंख्येत घट होण्यात कोरोना महामारी हे मोठे कारण असून, सदस्यसंख्या वाढविण्यासाठी ग्रंथालयांकडून घरपोच पुस्तकसेवेसह वाचनकट्टा, व्याख्याने, पुस्तक मेळावे आयोजित केले जात आहेत.




पुणे असो वा मुंबई, प्रत्येक जिल्ह्यातील शहरी असो वा ग्रामीण भागातील ग्रंथालयांच्या सदस्यसंख्येत फरक पडला असून, काही ग्रंथालयांची सदस्यसंख्या ५० हजारांवरून थेट २५ हजार अशी निम्म्यावर पोहचली आहे. सदस्यसंख्या टिकविण्यासाठी आता ग्रंथालयांकडून घरपोच पुस्तकसेवाही सुरू करण्यात आली. परंतु, राज्यभरातील काही ग्रंथालयांना आर्थिक निधीअभावी असे उपक्रम राबविण्यासाठी अडचणी येत आहेत.

सोमवारी (दि. २७) साजऱ्या होणाऱ्या मराठी भाषा गौरव दिनानिमित्त दै. 'पुढारी'ने याविषयीचा आढावा घेतला. याविषयी पुणे मराठी ग्रंथालयाचे अध्यक्ष धनंजय बर्वे म्हणाले की, सध्या ग्रंथालयाचे ६ हजार ४०० सदस्य आहेत. पण, आम्ही सदस्यसंख्या वाढविण्यासाठी अनेक उपक्रम राबवीत आहोत. घरपोच पुस्तकसेवेसह आम्ही सदस्यसंख्या टिकविण्यासाठी जनजागृती करीत आहोत. त्वष्टा कासार समाज संस्था वाचनमंदिराचे आमोद वडके म्हणाले की, आमच्या ग्रंथालयात ७० हजारांहून अधिक पुस्तके आहेत. कोरोनाच्या आधी निश्चितच ग्रंथालयाची ४० हजार हून अधिक सदस्यसंख्या होती. पण, आता सदस्यसंख्या २५ हजारांवर पोहचली आहे. आता हळूहळू सदस्यसंख्येत वाढ होत आहेत.

" पुणे, मुंबई, नागपूर, कोल्हापूर, अमरावती, नाशिक आदी जिल्ह्यांमध्ये ग्रंथालयातील सदस्यसंख्या अधिक आहे. पण, ग्रंथालये दोन वर्षे बंद होती. त्याचा परिणाम सदस्यसंख्येवर निश्चितच झाला आहे. राज्यभरातील ग्रंथालयातील सदस्यसंख्येत १५ टक्क्यांनी घट झाली आहे. महाराष्ट्रात साडेबारा हजार नोंदणीकृत सार्वजनिक ग्रंथालये आहेत. त्यांना पुरेसे अनुदान मिळत नाही. अनुदानात वाढ केली पाहिजे.

- **डॉ. गजानन कोटेवार,** अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ

### सदस्यसंख्या कमी होण्याची कारणे

- ग्रामीण भागातील ग्रंथालये आर्थिक अडचणीत
- ग्रंथालये आर्थिकदृष्ट्या सक्षम नाहीत

### ग्रंथालयांचे उपक्रम

- घरपोच पुस्तकसेवा
- वाचन कट्टे आणि वाचक मेळावे
- माहिती मोबाईलवर
- संकेतस्थळावर पुस्तकांची माहिती उपलब्ध

My Pune Edition
Feb 27, 2023 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During February 2023*

## *Section: Miscellaneous*

नवभारत

हॉबी

कोरोना में दो वर्ष तक लाइब्रेरीज बंद रहने का दुष्परिणाम

# लाइब्रेरी कल्चर को जिंदा रखना बनी चुनौती

## पुस्तकालय के लद गए दिन

**पुणे.** नवभारत न्यूज नेटवर्क. सोशल मीडिया के जरिए सहज उपलब्ध होने वाले ई बुक और ऑडियो बुक, कोरोना की वजह से दो वर्ष बंद रही लाइब्रेरी और फंड के अभाव जैसे विभिन्न कारणों की वजह से राज्य सहित पुणे के लाइब्रेरी में पाठकों की संख्या में 15 फीसदी की कमी आई है. ऐसे में पाठकों की संख्या को बनाए रखने सार्वजनिक लाइब्रेरी के समक्ष एक बड़ी चुनौती बन गई है. पुणे, मुंबई, नागपुर, सोलापुर, कोल्हापुर, नासिक, सातारा आदि जिलों में लाइब्रेरी के पाठकों की संख्या में भारी कमी आई है. पाठकों कर संख्या कम होने के पीछे कोरोना एक बड़ी वजह रही है. पाठकों की संख्या बढ़ाने के लिए लाइब्रेरी की तरफ से पुस्तक घर पहुंचाने के साथ वाचनकट्टा, व्याख्यान, पुस्तक मेलावा आयोजित किया जा रहा है.

## ग्रंथालयों में पाठकों की संख्या 15 फीसदी तक घटी



हम पाठकों की संख्या बढ़ाने के लिए कई उपक्रम चलाए जा रहे है. घर तक पुस्तक पहुंचाने के साथ पाठकों की संख्या को बनाए रखने के लिए हम कई उपक्रम चला रहे है. त्वष्टा कासार समाज संस्था वाचन मंदिर के आमोद बडके ने बताया कि हमारे ग्रंथालय में 70 हजार से अधिक पुस्तकें है.

### संख्या 40 हजार से 25 तक पहुंच गई है

कोरोना से पहले पाठकों की संख्या 40 हजार से अधिक थी. लेकिन अब पाठकों की संख्या 25 हजार तक पहुंच गई है. अब धीरे धीरे पाठकों की संख्या में बढ़ोतरी हो रही है.

पुणे हो या मुंबई, शहरी हो या ग्रामीण हर जगह के लाइब्रेरी के पाठकों की संख्या में अंतर आया है. कुछ लाइब्रेरी में पाठकों की संख्या 50 हजार से सीधे 25 हजार पर पहुंच गया है. राज्य की कुछ लाइब्रेरी फंड के अभाव में घर तक पुस्तक पहुंचाने के उपक्रम में मुश्किल आ रही है. इस संबंध में पुणे मराठी ग्रंथालय के अध्यक्ष धनंजय बर्वे ने कहा कि फिलहाल लाइब्रेरी में सदस्यों की संख्या 6 हजार 400 है. हम पाठकों की संख्या बढ़ाने के लिए कई उपक्रम चलाए जा रहे है.

### सरकारी अनुदान बढ़ाया जाना चाहिए

*पुणे, मुंबई, नागपुर, कोल्हापुर, अमरावती, नासिक आदि जिलों के ग्रंथालय में पाठकों की संख्या अधिक है. लेकिन लाइब्रेरी दो वर्ष बंद थे. इसका असर निश्चित रूप से पाठकों की संख्या पर हुआ है. राज्य भर के लाइब्रेरी में पाठकों की संख्या 15 फीसदी तक कम हुई है. महाराष्ट्र रजिस्टर साढ़े 12 हजार लाइब्रेरी है. इसे पर्याप्त अनुदान नहीं मिल रहा है. अनुदान बढ़ाया जाना चाहिए.*

*– डॉ. गजानन कोटेवार, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ*

Pune Edition
28-february-2023 Page No. 5
epaper.enavabharat.com

# *Upcoming Events*

## *March 2023*

| Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 ***Yashwantrao Chavan Jayanti***  | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 ***Shahid Din***   | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |




*Other than the Photos of Modern College Pune-5, Event Photos, Newspaper clipping images, all other images in this Bulletin Issue are downloaded from Google Images., Pinterest, Freepik.Com.*